# अनुक्रमणिका


| नियम क्र. | वर्णन | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | शिर्षक. | १ |
| २. | पात्रता. | १ |
| ३. | कोणतीही नोकरी वगळण्यास महानगरपालिका सक्षम आहे. | १ |
| ४. | अंमलबजावणीची / प्रभावाची तारीख. | २ |
| ४अ. | अग्निशामक दलातील कर्मचाऱ्यांना निवड करण्याचा हक्क | ४ |
| ४ब. | अंशदायी भविष्य निर्वाह निधीस अंशदान (वर्गणी) करणाऱ्यांना निवड करण्याचा हक्क. | ४ |
| ४क. | सुधारित कुटुंब निवृत्तिवेतन योजना (१९६५) खाली कर्मचाऱ्यांना निवड करण्याचा हक्क. | ५ |
| ४ड | दि. १-१-६७ रोजी कायम असणाऱ्या कर्मचाऱ्यांना सुधारित कुटुंब निवृत्तिवेतनत योजना (१९६५) खाली निवड करण्याचा हक्क. | ५ |
| ४इ. | दि. १-१०-६८ रोजी कायम असणाऱ्या कर्मचाऱ्यांना सुधारित कुटुंब निवृत्तिवेतन योजना (१९६५) खाली निवड करण्याचा हक्क | ७ |
| ४फ. | कर्मचाऱ्याच्या कुटुंबाला निवड करण्याचा हक्क | ८ |
| ४ग. | दि. १-४-१९७२ रोजी कायम असणाऱ्या कर्मचाऱ्यांना सुधारित कुटुंब निवृत्तिवेतन योजना (१९६५) अन्वये निवड करण्याचा हक्क | ९ |
| ४ह. | अंशदायी भविष्य निर्वाह निधीस अंशदान (वर्गणी) देणाऱ्या, दि. १-४-१९७५ रोजी कायम असलेल्या कर्मचाऱ्यांना निवड करण्याचा हक्क | ९ |
| ४ज. | अंशदायी भविष्य निर्वाह निधीस अंशदान (वर्गणी) देण्याऱ्या कायम कर्मचाऱ्यांना निवड करण्याचा हक्क. | ९ |
| ४क. | अंशदायी भविष्य निर्वाह निधीस अंशदान (वर्गणी) करणाऱ्या, दि. ३१-३-१९७९ रोजी कायम असलेल्या कर्मचाऱ्यांना निवड करण्याचा हक्क | ११ |


निवृत्ति वेतन-११११६ (म-२)

| नियम क्र. | वर्णन | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ४ल. | महानगरपालिका मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाला निवड करण्याचा हक्क | ११ |
| ४एम. | – , , – | १२ |
| ५. | व्याख्या. | १२ |
| ५अ. | एखाद्या बेकायदेशीर संपामध्ये भाग घेणे. | १९ |
| ६. | अर्थ लावण्याचा अधिकार. | १९ |
| ७. | अधिकारांचे प्रत्यायोजन. | १९ |
| ८. | वैद्यकीय मंडळ. | १९ |
| ८अ. | निवृत्तिवेतनाची प्रकरणे निकालात काढण्यासाठी पद्धत. | १९ |
| | **विभाग दोन - सर्वसाधारण अटी** | |
| ९. | निवृत्ती वेतन मंजूर करणारा सक्षम प्राधिकारी. | २० |
| १०. | विशेष प्रकरणांमध्ये निवृत्तिवेतन मंजूर करण्याचे अधिकार महानगरपालिकेला आहेत. | २० |
| ११. | जे महानगरपालिका कर्मचारी गैरवर्तणुकीमुळे नोकरीमधून सेवानिवृत्त झाले असतील, ते निवृत्तिवेतनास पात्र नाहीत. | २० |
| १२. | परकीय (फॉरीन) नोकरीमध्ये असताना, नियतवयोमानापूर्वी नोकरीमधून सेवानिवृत्त झाल्याचे निवृत्तीवेतन मिळणार नाही. | २१ |
| १३. | निवृत्तिवेतन कमी करणे. | २१ |
| १४अ | निवृत्तिवेतन मिळण्याकरिता चांगली वागणूक अभिप्रेत आहे. | २१ |
| १४ब | नोकरीमधील खंड क्षमापित करण्याबाबत | २२ |
| १५. | नोकरीमधील (कालावधीची) कमतरता क्षमापित करणे. | २४ |
| १५अ. | अर्हकारी नोकरीमधील खंड. | २४ |
| १६. | निवृत्तिवेतनासाठी रीतसर अर्ज. | २५ |

| नियम क्र. | वर्णन | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १७. | खाते प्रमुखांनी अर्जाचा नमुना भरणे. | २५ |
| १७अ. | नोकरीसंबंधीचे नियमित सेवा अभिलेख (सर्व्हिस रेकॉर्ड) उपलब्ध नसतील तर लेखी निवेदन स्वीकारणे. | २६ |
| १८. | प्रमुख लेखापाल यांच्याकडे अर्ज पाठविणे. | २७ |
| १९. | असनर्थता निवृत्तिवेतनाच्या अर्जाबरोबर वैद्यकीय प्रमाणपत्र आधार म्हणून असले पाहिजे. | २७ |
| २०. | वैद्यकीय प्रमाणपत्राचे प्रपत्र. | २७ |
| २१. | जेव्हा एखादा महानगरपालिका कर्मचारी शस्त्रक्रिया करून घेण्याचे नाकारतो तेव्हा. | २९ |
| २२. | असमर्थतेबद्दल वैद्यकीय प्रमाणपत्र देणे. | ३० |
| २३. | जखम किंवा इजा निवृत्तिवेतनाच्या बाबतीत चौकशी. | ३० |
| २४. | कुटुंब निवृत्तिवेतनाच्या बाबतीत चौकशी. | ३० |
| २५. | अनुज्ञेय असलेले निवृत्तिवेतन देण्याबदद्ल प्रमुख लेखापाल यांनी दाखला देणे. | ३१ |
| २६. | जास्त दिलेले पैसे वसूल करता येतील. | ३१ |
| २७. | उपदान हे एक रकमी दिले पाहिजे. | ३१ |
| २८. | निवृत्तिवेतन हे दरमहा दिले पाहिजे. | ३१ |
| २९. | ज्या वेळेला निवृत्तिवेतन घेतले जात नाही तेव्हा. | ३२ |
| ३०. | कायदेशीर वारसदारांना निवृंत्तिवेतनाचे पैसे देणे. | ३२ |
| ३१. | कायदेशीर अधिकार पत्र सादर करणे. | ३३ |
| | **विभाग तीन - निवृत्तिवेतनाचे प्रकार** | |
| ३२. | निवृत्तिवेतनाचे प्रकार. | ३४ |

| नियम क्र. | वर्णन | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | **विभाग चार - विशेष अटी** | |
| ३३. | नियतसेवावधी निवृत्तिवेतनाविषयी. | ३६ |
| ३४. | पूर्णसेवा निवृत्तिवेतनाविषयी | ३६ |
| ३५. | असमर्थता निवृत्तिवेतनाविषयी. | ३६ |
| ३६. | ज्यांना नोकरीमधून काढून टाकण्यात आलेले आहे अशांच्या बाबतीत असमर्थता निवृत्तिवेतन नाही. | ३७ |
| ३७. | जर कर्मचाऱ्यांच्या अनियमित सवयींमुळे वगैरे असमर्थता असेल तर असमर्थता निवृत्तिवेतन मिळणार नाही. | ३७ |
| ३८. | भरपाई निवृत्तिवेतनाविषयी. | ३७ |
| ३९. | जर इजा ही गंभीर स्वरुपाची असेल तरच जखम निवृत्तिवेतन. | ३८ |
| ४०. | जखम निवृर्त्तिवेतन हे हयातभर असणार नाही. | ३८ |
| ४१. | जखम निवृत्तिवेतन केव्हा देता येईल. | ३८ |
| ४२. | दुखापतीमुळे जर कायम स्वरुपाची असमर्थता आली असेल तर त्याबाबतीत निवृत्तिवेतन. | ३८ |
| ४३. | अनुकंपा निवृत्तिवेतनाविषयी | ३९ |
| ४४. | कुटुंब निवृत्तिवेतनाविषयी | ३९ |
| ४५. | कुटंब निवृत्तिवेतनाविषयीच्या अटी-महानगरपालिका ठरवील. | ३९ |
| ४५अ | खात्यांतर्गत/न्यायिक कार्यवाही चालू असतांना द्यावयाचे तात्पुरते निवृत्तिवेतन. | ३९ |
| | **विभाग पाच - निवृंत्तिवेतनाची रक्कम** | |
| ४६. | वेतन आणि नोकरी या गोष्टी लक्षात घेऊन निवृत्तिवेतन ठरविण्यात येईल. | ४१ |
| ४७. | ५ नव्या पैशाच्या जवळच्या पटींमध्ये निवृत्तिवेतनाचा हिशेब केला जाईल. | ४१ |

| नियम क्र. | वर्णन | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ४८. | नियतसेवावधी निवृत्तिवेतन, असमर्थता निवृत्तिवेतन, भरपाई निवृत्तिवेतन या बाबतची रक्कम. | ४२ |
| ४९. | भरपाई निवृत्तिवेतनास पात्र असणारा कर्मचारी जेव्हा दुसरे पद स्विकारतो तेव्हा. | ४३ |
| ५०. | वगळण्यात आला. | ४३ |
| ५१. | जखम किंवा इजा निवृत्तिवेतनाची रक्कम | ४३ |
| ५२. | असमर्थता-उपदान हे निवृत्तिवेतनासाठी केव्हा बदलता येईल. | ४४ |
| ५३. | कामगार भरपाई अधिनियम, १९२३ जिथे लागू होतो. | ४४ |
| ५४. | अनुकंपा निवृत्तिवेतनाची रक्रम. | ४४ |
| ५५. | कुटुंब निवृत्तिवेतनाची रक्कम | ४५ |
| ५५अ. | उपदानाच्या अधिदानास झालेल्या विलंबा बाबत द्यावयाचे व्याज | ४५ |
| ५५ब. | मासिक निवृत्तिवेतनाच्या अधिदानास झालेल्या विलंबा बाबत द्यावयाचे व्याज | ४७ |
| ५६. | निवृत्तिवेतनामध्ये हंगामी वाढ. | ४८ |
| | **विभाग सहा - मृत्यू नि सेवानिवृत्ति उपदान** | |
| ५७. | मृत्यू-नि-सेवानिवृत्ती उपदान ह्या संबंधीच्या अटी व रक्कम | ४९ |
| ५८. | मृत्यू-नि-सेवानिवृत्ती उपदान यासाठी नामनिर्देशन करणे | ५२ |
| ५८अ. | निवृत्तिवेतनाच्या हयातभरच्या थकबाकीसाठी नामनिर्देशन | ५५ |
| | **विभाग सात-कुटुंब निवृत्तिवेतन** | |
| ५९. | कुटुंब निवृत्तिवेतनासंबंधीच्या अटी आणि रक्कम | ५७ |
| | **विभाग आठ - निवृत्तिवेतनाचे पैसे देणे** | |
| ६०. | निवृत्तिवेतन कोणत्या तारखेपासून सुरू होते. | ६२ |
| ६१. | जखम इत्यादी निवृत्तिवेतन कोणत्या तारखेपासून सुरू होते. | ६२ |
| ६२. | कोणत्या तारखेपर्यंत निवृत्तिवेतन देणे. | ६२ |
| ६३. | महानगरपालिकेच्या कोषागारात निवृत्तिवेतन दिले पाहिजे. | ६३ |
| ६४. | एखाद्या वेड्या इसमास द्यावयाची रक्कम. | ६३ |

| नियम क्र. | वर्णन | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | **विभाग नऊ - अंशराशीकरण करणे** | |
| ६५. | सक्षम प्राधिकारी अंशराशिकरण मंजूर करील. | ६४ |
| ६६. | अंशराशिकरण करण्यासंबंधीचा अर्ज विहित प्रपत्रामध्ये असला पाहिजे. | ६५ |
| ६७. | पूर्ण करावयाच्या अटी. | ६६ |
| ६७अ. | नियतवयोमानानुसार किंवा ५८ वर्षे वय पूर्ण केल्यानंतर सेवानिवृत्त झाल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत निवृत्तिवेतनाचे अंशराशिकरण. | ६६ |
| ६८. | द्यावयाच्या ठोक रकमेसंबंधी अर्जदाराला कळविले पाहिजे. | ६८ |
| ६९. | द्यावयाच्या ठोक रकमेचा हिशेब. | ७० |
| ६९अ. | अंशराशीकरणामुळे निवृत्तिवेतनात होणारी कपात प्रभावाचा दिनांक | ७० |
| ७०. | वैद्यकीय तपासणी | ७० |
| ७१. | मृत्यू उद्‌भवल्यास अंशराशित रक्कम कायदेशिर वारसदारांना देणे. | ७३ |
| ७२. | अंशराशिकरण रद्द करता येणार नाही. | ७३ |
| ७२अ. | अंशराशीकरणाची पुनर्स्थापना | ७३ |
| | **विभाग दहा - अग्निशामक दल कर्मचारी** | |
| ७३. | या विभागातील नियम हे अग्निशामक दलातील कर्मचाऱ्यांना लागू आहेत. | ७४ |
| ७४. | अग्निशामक दल शल्यचिकित्सक यांच्याकडून वैद्यकीय प्रमाणपत्र घेता येईल. | ७४ |
| ७५. | २० वर्षाच्या नोकरीनंतर मिळणारे पूर्ण सेवा निवृत्तिवेतन. | ७४ |
| ७६. | नियतसेवावधी निवृत्तिवेतन, असमर्थता आणि भरपाई निवृत्तिवेतन यांच्या रकमा. | ७४ |
| ७७. | कुटुंब निवृत्तिवेतनाचे प्रमाण. | ७५ |
| ७८. | मृत्यू-नि-सेवानिवृत्ती उपदानाची रक्कम. | ७७ |
| ७९. | १५ वर्षांच्या नोकरीनंतर कुटुंब निवृत्तिवेतन. | ७८ |

| नियम क्र. | वर्णन | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | **विभाग अकरा - निवृत्तिवेतनधारकांनी परत नोकरी धरणे** | |
| ८०. | सर्वसाधारणपणे दुसरे निवृत्तिवेतन अनुज्ञेय नाही. | ७९ |
| ८१. | जखम निवृत्तिवेतन परत नोकरी धरली असताना चालू राहील. | ७९ |
| ८२. | भरपाई किंवा असमर्थता उपदान मिळाणाऱ्या निवृत्तिवेतनधारकाने परत नोकरी धरणे. | ७९ |
| ८३. | भरपाई किंवा असमर्थता निवृत्तिवेतन मिळणाऱ्या  निवृत्तिवेतनधारकाने परत नोकरी धरणे. | ८० |
| ८४. | पूर्वीची नोकरी हिशेबात धरण्याची निवड. | ८२ |
| ८५. | नियतसेवावधि निवृत्तिवेतन किंवा पूर्णसेवा निवृत्तवेतन मिळणाऱ्या निवृत्तिवेतनधारकाने परत नोकरी धरणे. | ८२ |
| ८६. | परत नोकरी धरणाऱ्या एखाद्या निवृत्तिवेतनधारकाने जर आपल्या निवृत्तिवेतनाच्या काही भागाचे अंशराशिकरण केले असेल तर निवृत्तिवेतनाची रक्कम. | ८२ |
| ८७. | सेवानिवृत्तिनंतर खाजगी नोकरी. | ८२ |
| | **विभाग बारा - सुधारित कुटुंब निवृत्तिवेतन योजना, १९६५** | |
| ८८. | अंशदायी कुटुंब निवृत्तिवेतन योजना, १९६५ | ८६ |
| | **विभाग तेरा - अंतिम फायदे.** | |
| ८९. | वगळण्यात आला. | ९६ |
| | **विभाग चौदा** | |
| | महानगरपालिका कर्मचाऱ्यांकरिता मुदतपूर्व स्वेच्छा सेवानिवृत्ति योजना. (नियम ३४ (१) | ९७ |
| | परिशिष्टे : १ ते १० | १०१ |

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## निवृत्तिवेतन नियम (१९५३)
## (भाषांतरित)

---

**दिनांक ३१ मार्च २००० पर्यंत सुधारित**

निवृत्ति वेतन-११११६ (म-२)

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## निवृत्तिवेतन नियम (१९५३)
## (भाषांतरित)

**दिनांक ३१ मार्च २००० पर्यंत सुधारित**

निवृत्ति वेतन-११११६ (म-२)

# बृहन्मुंबई महानगरपालिका

### निवृत्तिवेतन नियम, (१९५३)

## विभाग एक - प्रारंभिक

**१.** या नियमांना मुंबई महानगरपालिका निवृत्ती वेतन नियम (१९५३) असे संबोधण्यात यावे.

*२. (१) : ज्यामध्ये जेथे अन्यथा नमूद केले अथवा ध्वनित केले असेल ते सोडून, आणि या नियमाच्या उप-नियम (२) च्या तरतुदींसापेक्ष ज्यांचा कायम पदावर धारणाधिकार आहे असे कर्मचारी किंवा जर महानगरपालिका सेवा नियमावलीखाली ज्यांचा धारणाधिकार निलंबित केला नसता तर ज्यांचा धारणाधिकार अशा पदावर राहिला असता अशा महानगरपालिकेच्या सर्व कर्मचाऱ्यांना हे नियम लागू होतील. (दिनांक ३१.१.२००० पासून प्रभाव्य)

(२) या नियमान्वये किंवा या नियमांखाली कोणत्याही प्रकरणी अन्यथा स्पष्टपणे तरतुद केली नसेल तर, हे नियम खालील कर्मचाऱ्यांना लागू नाहीत.

(अ) रोजंदारीवर असलेले महानगरपालिका कर्मचारी.

(ब) केवळ स्वत:च्या पदाच्या कर्तव्यांसाठी संपूर्णपणे ज्यांचा वेळ अर्पण केला जात नाही असे महानगरपालिका कर्मचारी.

(क) महानगरपालिकेच्या नोकरीमधील शासकीय कर्मचारी, आणि

(ड) कोणत्याही अंशदायी भविष्य निर्वाह निधीची वर्गणी देणारे किंवा कोणत्याही इतर सार्वजनिक संस्थेच्या निवृत्तिवेतन नियमाच्या फायद्यास पात्र असणारे वा पात्र झालेले, महानगरपालिका कर्मचारी.

**३.** कोणत्याही वेळी कोणत्याही पदावरील किंवा आस्थापनेवरील नोकरी या नियमांच्या फायद्यांपासून महानगरपालिका वगळू शकेल.

---

* महानगरपालिका ठराव क्र. ९६० दि. २१ डिसेंबर, १९९२ अन्वये नियम क्र. २ (१) सुधारण्यात आला आणि सुधारीत तरतुदी शासकीय ठराव क्र. बीएमसी-१३९३/६६७/सीआर / १२५/९३/-युडी-२१ दि. ३१ जानेवारी, २००० पासून अंमलात आल्या.

४. (१) हे नियम दि. १ एप्रिल १९५३ पासून अंमलात आल्याचे मानण्यात येईल.

(२) मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम ८१ (२) अन्वये राज्य शासनाने या नियमाना निश्चिती दिलेल्या तारखेला (दि. ६-६-५५ या तारखेचा यापुढे ''ठरविलेली तारीख'' असा उल्लेख केला आहे.) जो महानगरपालिका कर्मचारी नोकरीत असेल अथवा जो कर्मचारी दि. १-४-१९५३ नंतर परंतु ठरविलेल्या तारखेपूर्वी सेवानिवृत्त झाला असेल त्याला या नियमाखाली राहण्याचा किंवा त्याला लागू असलेल्या नियमांखाली राहण्याच्या पर्यायाची निवड करता येईल.

* ठरविलेल्या तारखेपासून १२ महिन्यांच्या आत ही पर्यायाची निवड कार्यान्वित केली पाहिजे. विहित कालावधीमध्ये जर एखाद्या महानगरपालिका कर्मचाऱ्याने ही पर्यायाची निवड उपयोगात आणली नाही तर विद्यमान नियमांखाली राहण्याचे त्याने पसंत केले आहे असे समजण्यात येईल. एकदा कार्यान्वित केलेली पर्यायाची निवड अंतिम म्हणून समजली जाईल.

** (३) वरील उप-नियम (१) आणि (२) यामध्ये काहीही असले तरी, नियम क्र. ५ (१) (फ) यामध्ये व्याख्या दिल्याप्रमाणे, अर्हकारी सेवा निश्चित करण्यासाठी आवश्यक असलेले संपूर्ण नोकरीचे अभिलेख उपलब्ध नसल्याचे, महानगरपालिका आयुक्त यांची खात्री झाल्यास, ज्या तारखेला हे नियम अंमलात आले त्या तारखेला अंशदायी भविष्य निर्वाह निधीची वर्गणी देणाऱ्या कोणत्याही महानगरपालिका कर्मचाऱ्यास या नियमाखाली येण्यास महानगरपालिका आयुक्त प्रतिबंध करु शकतील. जर वरील उप-नियम (२) अन्वये, अशा एखाद्या कर्मचाऱ्याने सदर पर्यायाची निवड जाहीर केली असेल तर ती कार्यन्वित नाही, असे समजण्यात येईल.

* स्थायी समिती ठराव क्र. १६०३ दि. २४ नोव्हेंबर, १९५५ अन्वये नियम ४(२) हा सुधारण्यात आला व महानगरपालिका ठराव क्र. १००९ दि. ५ डिसेंबर, १९५५ आणि शासकीय ठराव, स्थानिक स्वराज्य शासन व सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक बीएमसी/५९५५-ई, दि. २० डिसेंबर, १९५५ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

** महानगरपालिका ठराव क्र. १६५८ दि. १९-३-१९५६ या खाली व स्थानिक स्वराज्य व सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. बीएमसी/५९५६-ई दि. ९ नोव्हेंबर, १९५६ या अन्वये नियम क्र. ४ चा उप-नियम (३) अंतर्भूत केला आहे.

* (४) विस्तारित उपनगरांमधील भूतपूर्व स्थानिक संस्थांमध्ये नोकरीत असणाऱ्या दि. १ फेब्रुवारी १९५७ या विलीनिकरणाच्या दिवशी महानगरपालिकेच्या नोकरीमध्ये घेण्यात आलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना या नियमाखाली येण्याच्या पर्यायाची निवड करता येईल. मात्र,

(अ) शासनाने या उप-नियमास ज्या तारखेला मान्यता दिली त्या तारखेला जर कर्मचारी कायम नेमणुकीवर असेल तर त्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत त्याने ह्या पर्यायाची निवड केली पाहिजे.

(ब) शासनाने ह्या उप-नियमास ज्या तारखेला मान्यता दिली त्या तारखेला जर कर्मचारी हंगामी नेमणुकीवर असेल तर, महानगरपालिकेच्या नोकरीत कायम झाल्याच्या आदेशाच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्याने ह्या पर्यायाची निवड केली पाहिजे. मात्र, नोकरीत खंड झालेला असता कामा नये.

* (५) दि. ६ जून १९५५ पूर्वी ज्या महानगरपालिका कर्मचाऱ्याने महानगरपालिकेत नोकरी धरली आहे परंतु या तारखेस जो हंगामी नेमणुकीवर होता, अशा महानगरपालिका कर्मचाऱ्यास, त्याच्या नोकरीत जर खंड पडला नसेल तर, महानगरपालिकेच्या नोकरीत कायम झाल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत, या नियमांखाली येण्याच्या पर्यायाची त्याला निवड करता येईल.

** (६) राज्य शासनाने सुधारित नियम ५९ (१) याला ज्या तारखेला मंजुरी दिली त्या तारखेला जो महानगरपालिका कर्मचारी नोकरीत आहे व जो भविष्य निर्वाह निधी नियमांखाली आहे त्याला या नियमांखाली येण्याची किंवा त्याला लागू असलेल्या विद्यमान नियमाखाली राहण्याच्या पर्यायांची निवड करता येईल.

---

* महानगरपालिका ठराव क्र. ३२८ दिनांक ३० जून १९५८ या अन्वये, उप नियम (४) व (५) अंतर्भूत केले आहे. व स्थानिक शासन, व सार्वजनिक आरोग्य विभाग ठराव क्र. बीएमसी/८९५८-क दिनांक ८ ऑक्टोबर १९५८ या अन्वये त्यांना निश्चिती देण्यात आली.

** महानगरपालिका ठराव क्र. २६६ दि. १३ मे १९५९ या अन्वये व शासकीय ठराव, नगर विकास आणि सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. बीएमसी/५३५९/३७२४२ क्र. दि. ३ ऑगस्ट, १९६० या अन्वये उप-नियम (६) अंतर्भूत केला आहे.

शासनाने सुधारणा मंजुर केल्याच्या तारखेपासून बारा महिन्यांच्या आत ह्या पर्यायाची निवड कार्यवाहीत आणली पाहिजे. विहित केलेल्या मुदतीत जर एखाद्या महानगरपालिका कर्मचाऱ्याने ह्या पर्यायाची निवड केली नाही तर विद्यमान नियमांखाली राहण्याचे त्याने पसंत केले आहे असे समजले जाईल. एकदा केलेल्या पर्यायाची निवड अंतिम म्हणून समजली जाईल.

*** ४ अ** अग्निशामक दलाच्या कार्यक्षेत्रावर नोकरीत असलेल्या व मुंबई महानगरपालिका निवृत्ती वेतन नियम (१९५३) या खाली राहण्यास पात्र असलेल्या महानगरपालिका कर्मचाऱ्यास या नियमांखाली येण्याची किंवा त्याला लागू असलेल्या विद्यमान नियमांखाली राहण्याच्या पर्यायाची निवड करता येईल.

शासनाने या नियमास मंजुरी दिल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत ह्या पर्यायाची निवड कार्यवाहीत आणली पाहिजे.

(**टीप** - हा नियम दि. २ जानेवारी, १९६० पासून अंमलात आणला जाईल.)

**** ४ ब** नियम ४ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या महानगरपालिका कर्मचाऱ्याने मुंबई महानगरपालिका भविष्य निर्वाहनिधी नियमांच्या नियम १५ खाली अंशदायी भविष्य निर्वाह निधीची वर्गणी भरली होती व मुंबई महानगरपालिका निवृत्ति वेतन नियम (१९५३) या खाली येण्याची निवड त्या नियमांच्या नियम ४ खाली कोणत्याही तरतुदीनुसार दि. १०-१२-१९५९ पूर्वी केली होती, अशा महानगरपालिका कर्मचाऱ्यास अंशदायी भविष्य निधी नियमांखाली येण्याच्या पर्यायाची निवड करता येईल. मात्र, राज्य शासनाने या नियमाला मान्यता दिल्याच्या तारखेपासून बारा महिन्यांच्या आत या पर्यायाची कार्यवाही त्याने केली पाहिजे.

(दि. २६-४-१९६२ पासून अंमल)

---

* महानगरपालिका ठराव क्र. ८६७ दि. २२-९-१९६० अन्वये नियम ४अ अंतर्भूत करण्यात आलेला आहे आणि नगर विकास आणि सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. बीएमसी/५३६०/३८२१२-क दि. १६ जानेवारी, १९६१ आणि क्र. बीएमसी/५३६०/७६३१-क मार्च १९६१ या अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

** महानगरपालिका ठराव क्र. १५६२ दि. ९ फेब्रुवारी १९६२ या अन्वये नियम क्र. ४ ब अंतर्भूत केला आहे आणि शासकीय ठराव, नगर विकास आणि सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. बीएमसी/५३६२/६८८९-क दि. २६-४-१९६२ या अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

*** ४ क** (नवीन नियम) ४, ४अ आणि ४ब या नियमांमध्ये कोणत्याही गोष्टींचा अंतर्भाव असला तरीसुद्धा, सुधारित कुटुंब निवृत्तिवेतन योजना (१९६५) (विभाग १२) या संबंधीच्या नियमांना राज्य शासनाकडून मान्यता मिळाली त्या तारखेला (दि. ७-१२-१९६५) जो महानगरपालिका कर्मचारी कायम स्वरूपाच्या नोकरीत असेल त्याला खालील पर्यायांची निवड करता येईल. उदा :--

(एक) जर तो अंशदायी भविष्य निर्वाह निधी नियम अथवा मुंबई महानगरपालिकेच्या निवृत्तिवेतन इत्यादी नियमावलींखाली येत असेल तर त्याला सुधारित कुटुंब निवृत्ति वेतन योजना, १९६५ या बरोबर मुंबई महानगरपालिका निवृत्तिवेतन नियम (१९५३) याची निवड करता येईल.

आणि

(दोन) जर तो मुंबई महानगरपालिका निवृत्तिवेतन नियम (१९५३) खाली येत असेल तर, विभाग सात मध्ये अंतर्भूत असलेल्या कुटुंब निवृत्तिवेतनाच्या फायद्यांऐवजी, विभाग बारा नुसार सुधारित कुटुंब निवृत्ती वेतन योजना, १९६५ चे फायदे त्याला घेता येतील.

विभाग बारामध्ये अंतर्भूत असलेल्या नियमांना शासनाची मान्यता मिळाल्याच्या तारखेपासून बारा महिन्यांच्या आत वरील पयार्याच्या निवडीची कार्यवाही झाली पाहिजे. या बाबतीत एकदा केलेली पयार्याची निवड अंतिम असेल. विभाग बारामध्ये अंतर्भूत असलेल्या नियमांना शासनाची मान्यता मिळाल्याच्या तारखेनंतर महानगरपालिकेच्या नोकरीत कायम होणारा, आणि अशा तऱ्हेने कायम झाल्यावर मुंबई महानगरपालिका निवृत्तिवेतन नियम (१९५३) या खाली येणारा महानगरपालिका कर्मचारी विभाग सातमध्ये अंतर्भूत असलेल्या नियमांखाली न येता, आपोआपच सुधारित कुटुंब निवृत्ति वेतन योजना, १९६५ या खाली येईल.

**** ४ ड** नियम ४, ४अ, ४ब, आणि ४क या मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीसुद्धा जो महापालिका कर्मचारी दि. १ जानेवारी १९६७ रोजी नोकरीत कायम आहे व मुंबई महानगरपालिका निवृत्ति वेतन नियम (१९५३) या मधील विभाग बारामध्ये अंतर्भूत असलेल्या सुधारित कुटुंब निवृत्ति वेतन योजना १९६५ च्या फायद्यास पात्र नाही, त्याला खालील पर्यायाची निवड करता येईल. उदा :--

---

** महानगरपालिका ठराव क्र. १६५९ दि. १६ फेब्रुवारी, १९६८ अन्वये नियम क्र. ४ड चा अंतर्भाव करण्यात आला आणि शासकीय ठराव, नगरविकास आणि सार्वजनिक आरोग्य व गृहनिर्माण विभाग क्र. बीएमसी/५३६८/२६८७०-क दि. १२ जुलै १९६२ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

* महानगरपालिका ठराव क्र. ३७५ दि. २४ जून, १९६५ अन्वये नियम क्र. ४क चा अंतर्भाव करण्यात आला आणि शासकीय ठराव, नगरविकास आणि सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. बीएमसी/५८६५/४५९३९-क, दि. ७ डिसेंबर १९६५ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

(एक) जर तो अंशदायी भविष्य निर्वाह निधी नियम किंवा मुंबई महानगरपालिका निवृत्ति वेतन इत्यादी नियमावली येत असेल तर त्याला सुधारीत कुटुंब निवृत्ती वेतन योजना, १९६५ यासह मुंबई महानगरपालिका निवृत्ति वेतन नियम (१९५३) या खाली येण्याची निवड करता येईल.

आणि

(दोन) जर तो विभाग सात मधील कुटुंब निवृत्ति वेतन योजनेसह मुंबई महानगरपालिका निवृत्ति वेतन नियम (१९५३) या खाली येत असेल तर त्याला खालील निवड करता येईल. :--

अ. विभाग सात प्रमाणे, कुटुंब निवृत्ति वेतनाचे फायदे घेण्याचे चालू ठेवणे, किंवा

ब. सुधारित कुटुंब निवृत्ति वेतन योजना, १९६५ खाली येणे.

या नियमाला शासनाची मंजुरी मिळाल्याच्या तारखेपासून बारा महिन्यांच्या आत वरील पर्यायाची निवड केली पाहिजे. एकदा केलेली पर्यायाची निवड अंतिम असेल. वर पोटकलम (दोन) मध्ये उल्लेख केलेल्या कर्मचाऱ्यांनी विहीत कालावधीमध्ये जर आपली पर्यायाची निवड केली नाही आणि जर ते विहीत कालावधी संपण्याच्या तारखेला महानगरपालिकेच्या नोकरीत असतील तर ते विभाग सात मधील कुटुंब निवृत्ती वेतनाच्या फायद्याऐवजी सुधारित कुटुंब निवृत्ती वेतन योजना, १९६५ या खालील फायद्यास पात्र आहेत असे समजण्यात येईल.

* मात्र, विभाग सात मधील कुटुंब निवृत्ति वेतन योजनेसह मुंबई महानगरपालिका निवृत्ती वेतन नियम (१९५३) या खाली येणाऱ्या आणि पर्याय कालावधी संपण्यापूर्वी पर्यायाची निवड न करता मृत्यू पावलेल्या महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या प्रकरणी, मृत महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाला वरील पर्याय देण्यात येईल. या परंतुकाला शासनाने मंजुरी दिल्याच्या तारखेपासून बारा महिन्यांच्या आत संबंधित कुटुंबाला पर्यायाची निवड करावी लागेल.

---

* महानगरपालिका ठराव क्र. ४२० दि. २५ जून, १९७० या अन्वये नियम क्र. ४ ड ला परंतुक जोडण्यात आले आणि शासकीय ठराव, नगर विकास, सार्वजनिक आरोग्य व गृहनिर्माण विभाग क्र. बीएमसी/५३७०/४२५९१-क, दि. २९ डिसेंबर, १९७० खाली त्याला निश्चिती देण्यात आली.

*** ४ इ** नियम ४, ४ अ, ४ ब, ४ क आणि ४ ड यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, जो महानगरपालिका कर्मचारी दि. १ ऑक्टोबर, १९६८ रोजी कायम स्वरुपाच्या नोकरीत आहे आणि अंशदायी भविष्य निर्वाह निधीच्या नियमांना पात्र आहे किंवा जो मुंबई महानगरपालिका निवृति वेतन इत्यादी नियमाखाली येत असेल तर अशा महानगरपालिका कर्मचाऱ्याला या नियमांनी नियमित होणाऱ्या पर्यायाची निवड करता येईल. त्याने ही पर्यायाची निवड या नियमाला शासनाने मान्यता दिल्याच्या तारखेपासून बारा महिन्यांच्या आत केली पाहिजे. एकदा केलेली पर्यायाची निवड अंतिम असेल. या नियमांमधील पर्याय स्वीकारणारा महानगरपालिका कर्मचारी सुधारित कुटुंब निवृति वेतन योजना, १९६५ या खाली येईल.

** मात्र, वरील पर्यायाच्या वापरासाठी पात्र असलेला एखादा कर्मचारी पर्याय कालावधीमध्ये मृत्यू पावल्यास त्या प्रकरणी त्या कर्मचाऱ्याच्या कुटुंबाला खालील अटींसापेक्ष हा पर्याय मिळू शकेल :--

टीप १ :- या बाबतीत महानगरपालिका कर्मचाऱ्याने वैध रीतीने नामनिर्देशित केलेल्या नामनिर्देशित व्यक्तिने/नामनिर्देशित व्यक्तिंनी तशी विनिर्दिष्ट विनंती महानगरपालिका आयुक्तांना केली पाहिजे; किंवा जर असे नामनिर्देशित नसतील तर मुंबई महानगरपालिका भविष्य निर्वाह निधी नियमांखाली 'कुटुंब' या संज्ञेच्या व्याख्येमध्ये अंतर्भाव केलेल्या कुटुंबियांनी तशी विनंती करावयास हवी. जर अशी विनंती करणे नामनिर्देशित व्यक्तिना मान्य नसेल तर या नियमाखाली पर्याय अनुज्ञेय होणार नाही.

टीप २ :- या परंतुकास शासनाकडून मान्यता मिळाल्याच्या तारखेपासुन बारा महिन्यांच्या आत हा पर्याय कुटुंबाने स्वीकारावयास हवा.

---

* महानगरपालिका ठराव क्र. ९६७ दि. ४ डिसेंबर, १९६९ या अन्वये नियम क्र. ४ इ चा अंतर्भाव करण्यात आला आणि शासकीय ठराव, नगर विकास, गृहनिर्माण विभाग क्र. बीएमसी/ ५३७०/१४९४६-क, दि. १० डिसेंबर, १९७० खाली त्याला निश्चिती देण्यात आली.

** महानगरपालिका ठराव क्र. ५०३ दि. २७ जून, १९७२ आणि महानगरपालिका ठराव क्र. २२२२ दि. २९ जानेवारी, १९७३ अन्वये नवीन नियम ४ई ला परंतुक जोडण्यात आले आणि शासकीय ठराव, नगर विकास, सार्वजनिक आरोग्य आणि गृहनिर्माण विभाग क्र. बीएमसी/५३७२/ ६६०१३-क, दि. ३ ऑगस्ट १९७३ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

* **४ फ** अंशदायी भविष्य निर्वाह निधी योजनेखाली येणारा एखादा महानगरपालिका कर्मचारी नोकरीत असताना मृत्यू पावल्यास त्याच्या कुटुंबाला खाली नमूद केलेल्या अटीसापेक्ष सुधारित कुटुंब निवृत्ति वेतन योजना, (१९६५) सह मुंबई महानगरपालिका निवृत्ति वेतन नियम (१९५३) या पर्यायाची निवड करता येईल. मात्र, महानगरपालिका कर्मचारी निवृत्ति वेतन नियम (१९५३) यांच्या फायद्यास अन्यथा अपात्र असता कामा नये.

(एक) या बाबतीत महानगरपालिका कर्मचाऱ्याने वैध रीतीने नामनिर्देशित केलेल्या नामनिर्देशित व्यक्तिने/नामनिर्देशित व्यक्तिंनी तशी विनिर्दिष्ट विनंती महानगरपालिका आयुक्तांना केली पाहिजे.

किंवा, जर असे नामनिर्देशन नसेल तर मुंबई महानगरपालिका भविष्य निर्वाह निधी नियमांमधील 'कुटुंब' या संज्ञेच्या व्याख्येमध्ये अंतर्भाव केलेल्या सर्व कुटुंबियांनी तशी विनंती करावयास हवी.

(दोन) महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या मृत्यूच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत किंवा जेथे या नियमाला राज्य शासनाने मंजुरी देण्याच्या पूर्वी मृत्यू झालेला आहे अशा प्रकरणी, राज्य शासनाने या नियमाला मंजुरी दिल्यापासून सहा महिन्यांच्या आत या पर्यायाचा वापर केला पाहिजे.

(हा नियम दि. १ ऑगस्ट १९७२ पासून अंमलात आला.)

मात्र योग्य प्रकरणामध्ये महानगरपालिका आयुक्त त्यांच्या स्वविवेकानुसार, सहा महिन्यांची वरील मर्यादा पुढील सहा महिन्यांपर्यंत वाढवू शकतील.

---

* महानगरपालिका ठराव क्र. ५०३ दि. २७ जून, १९७२ आणि महानगरपालिका ठराव क्र. २२२२ दि. २९ जानेवारी, १९७३ अन्वये नवीन नियम ४ फ चा अतंर्भाव करण्यात आला आणि शासकीय ठराव, नगर विकास, सार्वजनिक आरोग्य आणि गृहनिर्माण विभाग क्र. बीएमसी/५३७२/६६०१३-क, दि. ३ ऑगस्ट १९७३ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली, आणि महानगरपालिका ठराव क्र. ४९१ दि. ६ सप्टेंबर, १९७६ आणि महानगरपालिका ठराव क्र. ७५५ दि. २६ नोव्हेंबर, १९७६ अन्वये तो पुढे आणखी सुधारण्यात आला आणि शासकीय ठराव, नगर विकास, आणि सार्वजिनक आरोग्य विभाग क्र. बीएमसी/१८७६/६८१४/युडी/३ दि. २८ मार्च, १९७७ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

(हे परंतुकदेखील दि. १ ऑगस्ट, १९७२ पासून अंमलात आले.)

*** ४ ग** नियम ४, ४अ, ४ब, ४क, ४ड, ४इ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीसुद्धा जो महानगरपालिका कर्मचारी दि. १ एप्रिल १९७२ रोजी कायम नोकरीत आहे आणि जो मुंबई महानगरपालिका भविष्य निर्वाह निधी नियमांखाली येत असेल त्याला सुधारित कुटुंब निवृत्ति वेतन योजना, १९६५ यासह या नियमांखालील पर्याय देण्यात येईल. पर्यायाचा वापर या नियमाला शासनाने मंजुरी दिल्याच्या तारखेपासून बारा महिन्यांच्या आत केला पाहिजे. एकदा स्वीकारलेला पर्याय अंतिम असेल.

**** ४ ह** नियम ४, ४ अ, ४ ब, ४ क, ४ ड, ४ इ आणि ४ ग यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीसुद्धा जो महानगरपालिका कर्मचारी दि. १ एप्रिल १९७५ रोजी कायम नोकरीत आहे आणि जो मुंबई महानगरपालिका अंशदायी भविष्य निर्वाह निधी नियमांखाली येत असेल त्याला सुधारित कुटुंब निवृत्ति वेतन योजना, १९६५ यासह या नियमांखालील पर्याय देण्यात येईल. पर्यायाचा वापर या नियमाला शासनाने निश्चिती दिल्याच्या तारखेपासून बारा महिन्यांच्या आत केला पाहिजे. एकदा स्वीकारलेला पर्याय अंतिम असेल.

***** (नवीन नियम) ४ ज** - नियम ४, ४अ, ४ब, ४क, ४ड, ४इ, ४ग, ४ह आणि ४आय यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीसुद्धा जो महानगरपालिका कर्मचारी अंशदायी भविष्य निर्वाह निधी नियमांखाली येत असेल त्याला सुधारित कुटुंब निवृत्ति वेतन योजना, (१९६५) (यानंतर अंशदायी कुटुंब निवृत्ति वेतन योजना असे संदर्भित केले आहे.) सह या नियमांखालील पर्याय देण्यात येईल. सेवानिवृत्तीच्या तारखेपूर्वी कोणत्याही वेळी किंवा या नियमांना शासनाने निश्चिती दिल्याच्या तारखेपासून बारा महिन्यांच्या आत, यापैकी जी तारीख नंतरची असेल त्यावेळी पर्याय वापरता येईल. एकदा निवडलेला पर्याय अंतिम असेल.

(दिनांक ३१ ऑगस्ट, १९७८ पासून प्रभाव्य)

---

* महानगरपालिका ठराव क्र. ४७३ दि. २७ ऑगस्ट, १९७३ अन्वये नवीन नियम ४ ग चा अतंर्भाव करण्यास आला आणि शासकीय ठराव, नगर विकास, सार्वजनिक आरोग्य आणि गृहनिर्माण विभाग क्र. बीएमसी/१०७३/७३६५०-क, दि. १० जानेवारी, १९६४ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

** महानगरपालिका ठराव क्र. १३५६ दि. १० फेब्रुवारी १९७७ अन्वये नवीन नियम ४ ह चा अतंर्भाव करण्यास आला आणि शासकीय ठराव, नगर विकास, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. बीएमसी/१३७७/१६३९/एच. डी. दि. ३ जुलै १९७७ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

*** महानगरपालिका ठराव क्र. १४ दि. २५ एप्रिल १९७८, अन्वये नवीन नियम ४ ज चा अंतर्भाव करण्यात आला आणि शासकीय ठराव, नगरविकास सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. बीएमसी/१३७८/१८५३/युडी-३ दि. ३१ ऑगस्ट १९७८ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

* मात्र, जो महानगरपालिका कर्मचारी दि. १ जानेवारी, १९७५ रोजी महानगरपालिकेच्या कायम नोकरीत आहे व ज्याला अंशदायी भविष्य निर्वाह निधी नियम लागू होते/आहेत त्याला वैद्यकीय प्राधिकाऱ्याने पुढील काळातील सेवेकरिता असमर्थ घोषित केल्याच्या परिणामी, त्याची सेवा समाप्त झाल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत या नियमांचा पर्याय (विभाग बारामध्ये अंतर्भूत असलेल्या सुधारित कुटुंब निवृत्ति वेतन योजना, १९६५ च्या लाभासह) वापरण्यास महानगरपालिका आयुक्त परवानगी देऊ शकतील. पुढे आणखी अशी तरतूद केलेली आहे की, या परंतुकाला शासनाची निश्चिती मिळाल्याच्या तारखेपूर्वी ज्या महानगरपालिका कर्मचाऱ्याला महानगरपालिकेच्या सेवेकरिता असमर्थ ठरविण्यात आलेले आहे, त्याला या नियमाला शासनाची निश्चिती मिळाल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत या पर्यायाचा वापर करण्याची परवानगी देण्यात येईल. एकदा निवडलेला पर्याय हा अंतिम असेल. मात्र, वरील परंतुकाखालील पर्यायाचा वापर करणाऱ्या महानगरपालिका कर्मचाऱ्याला अंशदायी भविष्य निर्वाह निधी नियम, इत्यादींमुळे अगोदर प्राप्त झालेली महानगरपालिका अंशदानांची संपूर्ण रक्कम त्याचप्रमाणे जर कोणती अधिक असेल तर ती रक्कम, महानगरपालिका तिच्या कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधीवर प्रति वर्षी मंजूर करीत असलेल्या व्याजाच्या दरांसह पर्याय कालावधी संपण्यापूर्वी एक रक्कमी परत करावी लागेल.

जर कोणते महानगरपालिका अंशदान इत्यादी असेल तर ते पर्याय कालावधीमध्ये परत केल्यानंतरच वरील पर्याय विधीग्राह्य बनेल.

पर्याय-कालावधी संपण्यापूर्वी किमान एक महिना अगोदर पर्यायाचा वापर केल्यास आणि हा पर्याय विधिग्राह्य बनल्यामुळे अगोदरच प्राप्त झालेल्या महानगरपालिका अंशदान इत्यादीच्या रक्कमेच्या परतफेडीकरिता निवृत्ति वेतनाच्या थकबाकीच्या विनियोगाला महानगरपालिका आयुक्त त्यांच्या स्वविवेकानुसार योग्य त्या जुन्या प्रकरणांमध्ये परवानगी देतील; ज्यामुळे परताव्याची संपूर्ण रक्कम पर्याय - कालावधी संपण्यापूर्वी मिळविता येऊ शकेल.

---

* स्थायी समिती ठराव क्र. १५९९ दि. १३ ऑक्टोबर, १९८२, महानगरपालिका ठराव क्र. ७०५ दि. २३ नोव्हेंबर १९८२ आणि शासकीय ठराव, नगर विकास क्र. बीएमसी/१३८३/८४१/युडी, ३ दि. २ सप्टेंबर १९८३ अन्वये नियम ४ ज मध्ये परंतुकाचा समावेश करण्यात आला.

* स्थायी समिती ठराव क्र. १४६२ दि. ५ मार्च १९८६, महानगरपालिका ठराव क्र. ६७ दि. ८ मे १९८६ आणि शासकीय ठराव, नगर विकास क्र. बीएमसी/१३८६/१९५५/सीआर्-४७३/८६/युडी, ३ दि. ३ जानेवारी १९८९ अन्वये नियम ४ ज मध्ये बदल करण्यात आला.

*** (नवीन नियम) ४ क** - नियम ४, ४अ, ४ब, ४क, ४ड, ४इ, ४ग, ४ह, ४आय, ४ ज यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीसुद्धा जो महानगरपालिका कर्मचारी दि. ३१ मार्च, १९७९ रोजी कायम नोकरीत होता आणि जो दि. १ एप्रिल १९७९ रोजी किंवा त्यानंतर अंशदायी भविष्य निर्वाह निधी नियमांखाली सेवानिवृत्त झाला आहे त्याला अंशदायी कुटुंब निवृत्तिवेतन योजनेसह या नियमाखालील पर्याय देण्यात येईल. या नियमाला शासनाने मंजूरी दिल्याच्या तारखेपासून बारा महिन्यांच्या आत पर्यायाचा वापर केला पाहिजे. एकदा स्वीकारलेला पर्याय अंतिम असेल.

**** ४ ल.** मुंबई महानगरपालिका निवृत्तिवेतन इत्यादी नियमावली लागू असलेला महानगरपालिका कर्मचारी सेवेमध्ये असताना मृत्यू पावल्यास त्याच्या कुटुंबाला खाली नमूद केलेल्या अटीं सापेक्ष अंशदायी/सुधारित कुटुंब निवृत्ति वेतन योजना (१९६५ सह) मुंबई महानगरपालिका निवृत्ति वेतन (१९५३) ची निवड करण्याचा पर्याय देण्यात येईल.

महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या मृत्युच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत किंवा जिथे या नियमाला राज्य शासनाने निश्चिती देण्यापूर्वी मृत्यू झालेला आहे अशा प्रकरणामध्ये या नियमाला राज्य शासनाने निश्चिती दिल्यापासून सहा महिन्यांच्या आत त्याच्या कुटुंबाने लेखी स्वरुपात पर्यायाची निवड करणे आवश्यक आहे. मात्र महानगरपालिका आयुक्त योग्य प्रकरणांमध्ये वरील ६ महिन्यांची कालमर्यादा पुढील ६ महिन्यांपर्यंत स्वविवेकानुसार वाढवू शकतील.

(दिनांक १-१०-१९८० पासून प्रभाव्य.)

---

* महानगरपालिका ठराव क्र. १९७३ दि. २१ फेब्रुवारी, १९८० अन्वये नवीन नियम ४ क अतंर्भाव करण्यास आला आणि शासकीय ठराव, नगरविकास, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. बीएमसी/१३८०/१६४१/युडी/३ दि. २८ मे, १९८० अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

** महानगरपालिका ठराव क्र. ३६३ दि. २३ जुलै, १९८१ व शासकीय ठराव, नगरविकास, क्र. बीएमसी/१३८१/६३४/युडी/३ दि. १३ एप्रिल १९८३ अन्वये नवीन नियम ४ ल चा अंतर्भाव करण्यात आला.

*** (नवीन नियम) ४ एम** - नियम ४, ४अ, ४ब, ४क, ४ड, ४इ, ४ग, ४ह, ४ज, ४क आणि ४ल मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी सुधारीत कुटुंब निवृत्तीवेतन योजना (जी या आधी अंशदायी कुटुंब निवृत्ती वेतन योजना म्हणून संदर्भित असलेली) जी यापुढे सुधारित कुटुंब निवृत्तीवेतन योजना १९६५ म्हणून संबोधिण्यात येत होती. त्याला सुधारित कुटुंब निवृत्त वेतन योजना (१९६४) म्हणून संबोधिण्यात यावी आणि दि. १-१-१९६४ पासून अंमलात आली असे समजण्यात यावे. (ज्या दिनांकापासून राज्य शासनाने ही योजना सुरु केली) आणि ती दि. १-१-१९६४ रोजी कायम सेवेत असणाऱ्याना कर्मचाऱ्यांना लागू करण्यात यावी.

**५. (१)** विषयात किंवा संदर्भात एतद्विरुद्ध काहीही नसेल तर, या नियमात दिलेल्या संज्ञांच्या व्याख्या, या नियमांमध्ये खालील अर्थाने वापरलेल्या आहेत.

**(अ)** 'सक्षम प्राधिकारी' म्हणजे -

(एक) ज्यांची नेमणूक करण्याचे अधिकार स्थायी समिती किंवा महानगरपालिका यांना आहेत, अशा महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, स्थायी समिती.

आणि

(दोन) इतर सर्व महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या बाबतीत बृहन्मुंबईचे महानगरपालिका आयुक्त.

**(ब)** 'खाते प्रमुख' म्हणजे -

(एक) महानगरपालिका चिटणीस यांच्या नियंत्रणाखाली काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, महानगरपालिका चिटणीस.

(दोन) महानगरपालिका प्रमुख लेखा परीक्षक यांच्या नियंत्रणाखाली काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, महानगरपालिका प्रमुख लेखा परीक्षक.

(तीन) इतर सर्व महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, महानगरपालिका आयुक्त यांच्याकडून अधिकारी म्हणून मान्यता मिळालेले असे अधिकारी.

---

* प्रशासकांचा (स्थायी समिती) ठराव क्र. १५७७ दि. १६ मार्च १९८५, प्रशासकांचा (महानगरपालिका) ठराव क्र. १६६२ दि. २७ मार्च १९८५ अन्वये नवीन नियम क्रमांक ४ एम् चा अंतर्भूत करण्यात आला आणि शासन ठराव क्र. बीएमसी/१३८५/४०१४/युडी-३ दि. १२ मे १९८६ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

* **(क)** 'वैद्यकीय प्राधिकारी' म्हणजे

(एक) ज्या महानगरपालिका कर्मचाऱ्यांची किमान वेतनश्रेणी ही मुख्य लिपीकाच्या किमान वेतनश्रेणीपेक्षा अधिक आहे अशांच्या बाबतीत नियम क्र. ८ अन्वये स्थापन झालेले वैद्यकीय मंडळ, आणि

(दोन) इतर महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या बाबतीत महानगरपालिका वैद्यकीय परीक्षक.

(दिनांक ८ सप्टेंबर १९८३ पासून प्रभाव्य)

**(ड)** 'निवृत्ति वेतनामध्ये' उपदानाचा समावेश आहे. जिथे 'मृत्यू नि सेवानिवृत्ति उपदान' या विरोधात 'निवृत्ति वेतन' ही संज्ञा वापरली असेल ते सोडून, 'निवृत्ति वेतन' यामध्ये 'मृत्यू नि सेवानिवृत्ति' नि उपदान याचा देखील अंतर्भाव होतो.

*** ५ (१) (इ)**

**'निवृत्तिवेतनदेय वेतन'** म्हणजे महानगरपालिका कर्मचाऱ्याने आपल्या नोकरीत अखेरच्या दहा महिन्यामध्ये मिळविलेले सरासरी वेतन होय. या व्याख्येच्या प्रीत्यर्थ, **'वेतन'** या संज्ञेचा अर्थ खालीलप्रमाणे असून त्यात, महानगरपालिका कर्मचाऱ्याने महिन्याला घेतलेल्या खालील रकमेचा अंतर्भाव आहे :--

(एक) महानगरपालिका कर्मचाऱ्याने कायम स्वरुपात किंवा स्थानापन्न पध्दतीने धारण केलेल्या किंवा संवर्गातील त्याच्या दर्जाने तो पात्र असलेल्या पदाकरिता मंजूर करण्यात आलेले मूळ वेतन होय. (दोन) सुधारीत वेतन व जुने वेतन ह्यांच्यातील फरकाचा ठोक फायदा.

(तीन) जे महानगरपालिका कर्मचारी दि. १-७-१९८५ रोजी महानगरपालिकेच्या सेवेत आहेत आणि दि. १-७-१९८५ नंतर सेवानिवृत्त झाले आहेत/सेवानिवृत्त होतील अशा महानगरपालिका वेतनश्रेणीतील महानगरपालिका कर्मचाऱ्यांनी दि. १-१-१९८५ पूर्वी घेतलेला महागाई भत्ता तांत्रिक वेतन, विशेष वेतन, वैयक्तिक भत्ता एकत्रित वैयक्तिक भत्ता.

---

* स्थायी समितिचा ठराव क्र. १४६२, दि. ५ मार्च, १९८६ महानगरपालिकेचा ठराव क्र. ६७ दि. ८ मे १९८६ अन्वये नियम ५(१) (क) सुधारण्यात आला व दिनांक ८ सप्टेंबर १९८३ च्या प्रभावाने लागु करण्यात आला.

(चार) जे महानगरपालिका कर्मचारी दि. १-१-१९८६ रोजी महानगरपालिकेच्या सेवेत आहेत आणि दि. १-७-१९८६ नंतर सेवानिवृत्त झाले आहेत/सेवानिवृत्त होतील अशा विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतन श्रेण्यांमधील महानगरपालिका कर्मचाऱ्यांनी दि. १-१-१९८६ पूर्वी घेतलेल्या तदर्थ महागाई भत्त्यासह महागाई भत्ता, विशेष वेतन तांत्रिक वेतन, वैयक्तिक भत्ता, एकत्रित वैयक्तिक भत्ता, अंतरिम सहाय्य.

(पाच) खाजगी व्यवसाय हानी भत्ता.

**टीप (१) :-** जर महानगरपालिका कर्मचारी त्याच्या नोकरीच्या अखेरच्या १० महिन्यांच्या कालावधीमध्ये, असाधारण रजेव्यतिरिक्त इतर प्रकारच्या रजेवर असल्याने कामावर गैरहजर असेल तर त्याचे वेतन, जर तो कामावर गैरहजर नसता तर त्याला जे (वेतन) मिळाले असते ते धरावे. मात्र उच्च पदाच्या बाबतीतील स्थानापन्नता वेतन हे, जर तो रजेवर गेला नसता तर त्याच पदावर (पदांवर) स्थानापन्न म्हणून काम करीत राहिला असता असे प्रमाणपत्र मिळाल्याखेरीज, हिशेबात धरण्यात येऊ नये.

**टीप (२) :-** जर एखाद्या महानगरपालिका कर्मचाऱ्यास त्याच्या नोकरीच्या अखेरच्या १० महिन्यातील कोणत्याही कालावधीमध्ये वेतन किंवा रजेचा पगार (लिव्ह सॅलरी) मिळाला नसेल तर तो कालावधी हिशेबातून वगळण्यात येईल व त्या अखेरच्या १० महिन्याच्या निकट पूर्वीच्या तेवढ्याच कालावधीतील त्याने मिळविलेले वेतन हिशेबात घेतले जाईल.

**टीप (३) :--**महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या अखेरच्या दहा महिन्यांच्या कालावधीतील कामावरुन निलंबित केल्याचा कोणताही कालावधी जर नोकरीचा काल म्हणून धरण्यात आला असेल तर अशा प्रकारच्या काळातील त्याचे वेतन, तो नोकरीवरून निलंबित केला गेला नसता तर त्याला जेवढे वेतन मिळाले असते तेवढे धरावे. जर हा निलंबित केल्याचा कालावधी असाधारण रजेव्यतिरिक्त इतर कोणत्याही रजेमध्ये रुपांतरित केला गेला असेल तर ह्या कालावधीमधील त्याचे वेतन टीप (१) नुसार गणण्यात यावे जर हा कामावरून निलंबित केल्याचा कालावधी असाधारण रजेत रुपांतरित करण्यात आला असेल किंवा हा कालावधी कामाचाही नाही आणि रजेचाही नाही असे समजण्यात आले असेल तेव्हा तेवढा (कालावधी) निवृत्तीवेतन हे वेतनाच्या हिशेबामधून वगळण्यात यावा आणि शेवटच्या दहा महिन्यांच्या त्वरित अगोदरच तेवढाच काळ विचारात घ्यावा.

---

* महानगरपालिका ठराव क्र. ३१९ दि. १ सप्टेंबर १९८९ अन्वये नियम ५(१) (इ) पुढे आणखी सुधारण्यात आला नियम ५(१) (इ) ला महाराष्ट्र शासनाने निश्चिती दिलेली नसुन सदर नियम महानगरपालिकेने अंमलात आणला आहे.

**टीप (४) :--**महानगरपालिका कर्मचाऱ्याने परकीय सेवेवर असताना घेतलेले वेतन हे निवृत्तीवेतनाकरिता हिशेबात धरले जाणार नाही. अशा प्रकरणांमध्ये, त्या महानगरपालिका कर्मचाऱ्याला जर परकीय सेवेवर पाठविले नसते तर त्याने महानगरपालिकेच्या नोकरीमध्ये जे वेतन घेतले असते केवळ तेच वेतन निवृत्तीवेतनार्ह वेतनाकरिता हिशेबात धरण्यात येईल.

**टीप (५) :--**वगळण्यात आली आहे.

(महानगरपालिका वेतनश्रेणीमधील महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, सुधारित नियम ५ (१) (इ) चा प्रभाव दि. १-७-१९८५ पासून देण्यात येईल आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेणीमधील महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्याबाबतीत दि. १-१-१९८६ पासून देण्यात येईल.)

*** ५ (१) (फ)** ''अर्हकारी सेवा'' याचा अर्थ खालीलप्रमाणे असून, खालील गोष्टींचा त्यामध्ये समावेश होतो :--

(एक) कायम पदावर केलेली सेवा.

(दोन) एखाद्या कायम पदावर नंतर कायम झाल्यास त्या पदावर स्थानापन्न स्वरुपाने किंवा हंगामी स्वरुपाने किंवा परिविक्षाधिन म्हणून केलेली सेवा.

(तीन) एखाद्या कायम पदावर धारणाधिकार ठेवून किंवा त्या पदावरील धारणाधिकार निलंबित केला असताना, स्थानापन्न स्वरुपाने किंवा हंगामी स्वरुपाने केलेली सेवा.

(चार). परकीय सेवेत असताना ज्या परकीय सेवेबद्दल महानगरपालिका सेवानियमावलीनुसार निवृत्तिवेतनासाठी अंशदान दिले आहे. किंवा त्याने पैसे भरले आहेत अशी परकीय सेवेतील नोकरी.

---

महानगरपालिका ठराव क्र. ३३८ दि. ३० जून, १९५८ अन्वये नियम क्र. ५ सुधारण्यात आला आणि शासकीय ठराव, स्थानिक स्वराज्य शासन आणि सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. बीएमसी/५३५८/क, दि. १५ डिसेंबर, १९५८ अन्वये त्या निश्चित देण्यात आली. महानगरपालिका ठराव क्र. १८२१, दि. ९ फेब्रुवारी १९६१ अन्वये तो पुढे आणखी सुधारण्यात आला आणि नगरविकास, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. बीएमसी-५५६१/१६१८६-क, दि. २९ डिसेंबर, १९६१ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

* महानगरपालिका ठराव क्र. ३७५ दि. २४ ऑगस्ट १९६५ अन्वये नियम ५ (१) (फ) सुधारण्यात आला आणि शासन ठराव, नगरविकास आणि सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. बीएमसी/५८६५/४५९९३/क दि. ७ डिसेंबर १९६५ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

(पाच). नंतर सेवा किंवा रजा म्हणून मानण्यात आली असेल तर, असा कामावरुन निंलबित केल्याचा कोणताही कालावधी.

* (सहा). रोजंदारीवर येण्यापूर्वी अगदी अगोदर, जर एखादा कर्मचारी वेतनाच्या समय श्रेणीमध्ये कायम पदावर कायम स्वरुपाने असेल तर, जिथे रोजंदारीवर वेतन दिले जाते अशा एखाद्या कार्यालयात केलेली नोकरी (अगदी प्रथम पासून हे पोटकलम अस्तित्वात आहे, असे समजण्यात येईल.)

** (सहा) (अ). समय वेतन श्रेणीतील अखंडित सेवेच्या लगत अगोदर दैनिक वेतनावरील आस्थापनेमध्ये केलेली ५० टक्के अखंडीत सेवा. मात्र, महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या बाबतीत हे नियम लागू असले पाहिजेत. (दिनांक १-१०-१९८२ पासून प्रभाव्य).

(या नियमाचा प्रभाव दि. १ ऑक्टोबर, १९८२ पासून देण्यात आलेला आहे. याचाच अर्थ असा की, दि. १ ऑक्टोबर, १९८२ रोजी किंवा तद्नंतर सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना या नियमाचा फायदा अनुज्ञेय होईल).

(सात). अखंड (सलग) नोकरीच्या कालावधीमधील असाधारण रजेसह सर्व प्रकारची रजा.

(आठ). सुट्टी विभागातील महानगरपालिका कर्मचाऱ्याने घेतलेली सुट्टी.

*** टीप - वयाच्या १८ वर्षापूर्वी केलेली नोकरी ही अर्हकारी सेवेच्या गणनेसाठी वगळण्यात येईल.

---

* महानगरपालिका ठराव क्र. ७४८ दि. १९ नोव्हेंबर १९६२ अन्वये (सहा) अंतर्भूत करण्यात आले. आणि शासन ठराव, नगरविकास आणि सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. बीएमसी/१०८२/५२९५३/क दि. २७ एप्रिल १९६३ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

*** महानगरपालिका ठराव क्र. १६५९ दि. १६ फेब्रुवारी १९६८ अन्वये नियम ५ (१) (फ) ची टीप सुधारण्यात आली व शासन ठराव, नगरविकास आणि सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. बीएमसी/५३६८/२६८७०/क दि. १२ जुलै १९६८ अन्वये तिला निश्चिती देण्यात आली.

** स्थायी समिती ठराव क्र. १८५५ दिनांक ८ मार्च १९८९, महानगरपालिका ठराव क्र. २०९ दि. २९ ऑगस्ट १९८९, अन्वये नवीन नियम ५ (१) (फ) (सहा) (अ) अंतर्भाव करण्यात आले. आणि शासकीय क्र. बीएमसी/१३८९/४२००/सीआर-४५२/युडी/२१ दि. ३१ ऑक्टोबर १९९० अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

** (नऊ) (अ) ज्या व्यक्तिंनी मान्यता प्राप्त युद्धसेवा केली आहे व ज्यांची नेमणूक दि. १ एप्रिल, १९४७ पूर्वी मुंबई महानगरपालिकेमध्ये रिकाम्या पदावर झाली आहे, त्यांच्या बाबतीत दि. ३ सप्टेंबर, १९३९ (किंवा, ज्या विशिष्ट पदावर त्यांची नेमणूक झाली आहे त्या नोकरीच्या विशिष्ट पदासाठी विहित केलेल्या किमान वयोमर्यादेवर ते येतील ती तारीख, यापैकी जी नंतरची असेल ती तारीख) आणि दि. १ एप्रिल, १९४६ या दोहोंमधील कालावधीमध्ये त्यांनी केलेल्या युद्धसेवेच्या ४/५ एवढी नोकरी कमाल ४ वर्षाच्या कालावधीसापेक्ष, निवृत्ति वेतनासाठी हिशोबात धरण्यास परवानगी द्यावी. मात्र त्यांना लष्करी नोकरीमधून काढल्याच्या दिवशी वा त्यानंतर त्यांना निवृत्ति वेतनासाठी कोणतेही निवृत्तिवेतन वा उपदान मिळालेले असता कामा नये आणि जर त्यांना असे कोणतेही उपदान वा बोनस मिळालेला असेल तर तो त्यांनी महानगरपालिकेच्या कोषागारात जमा केला पाहिजे.

* (दहा) अग्निशामक दलामधील अ - कार्यक्षेत्र विभागात नेमणूक झालेला महानगरपालिका कर्मचारी अग्निशामक दलाच्या कार्यक्षेत्र विभागात घेतला गेल्यास, त्याचा अकार्यक्षेत्र विभागामधील नोकरीचा कालावधी कार्यक्षेत्र विभागामधील नोकरीमध्ये ३:२ या प्रमाणात रूपांतरीत करून, कार्यक्षेत्र विभागामधील निवृत्तिवेतनासाठी अर्हकारी नोकरी ठरविण्याकरिता त्यात मिळविण्यात यावा, आणि हीच पद्धत उलट रितीने वापरण्यात यावी.

*** (अकरा) ज्या महानगरपालिका कर्मचाऱ्याने 'भारतीय स्वातंत्र्य संग्रामात' भाग घेतला आहे आणि भारतीय स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतल्याबद्दल महाराष्ट्र राज्य शासनाने त्याच्या सन्मानार्थ गौरव प्रमाणपत्र (सन्मान पत्र) प्रदान केले आहे आणि महानगरपालिकेच्या सेवेत त्याची

---

** महानगरपालिका ठराव क्र. २२६१ दि. ३१ मार्च, १९६६ अन्वये कंडिका (नऊ) अंतर्भूत करण्यात आली आणि शासकीय ठरावच, नगर विकास सार्वजनिक आरोग्य विभाग व गृहनिर्माण विभाग क्र. बीएमसी/५३६६/२९६७९/क, दि. २२ जुलै १९६६ अन्वये निश्चिती देण्यात आली. दि. १ एप्रिल, १९५३ पासून अंमल द्यावयाचा आहे.

* महानगरपालिका ठराव क्र. १७११ दि. १७ डिसेंबर १९७० अन्वये कंडिका (दहा) चा अंतर्भाव करण्यात आला व शासकीय ठराव, नगर विकास, सार्वजनिक आरोग्य विभाग आणि गृहनिर्माण विभाग क्र. बीएमसी/५३७०/२६६६-क दि. १३ एप्रिल, १९७१ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली. दि. १ मार्च, १९६५ पासून अंमल देण्यात आलेला आहे.

*** स्था. स. ठ. क्र. १४७५ दि. २९ सप्टेंबर, १९८३ आणि महानगरपालिका ठराव क्र. ९८७ दि. २२ नोव्हेंबर, १९८३ व शासकीय ठराव, नगर विकास, सार्वजनिक आहोग्य विभाग बीएमसी-१३८४/१९०७/युडी-३ दि. २५ मे, १९८४ अन्वये नियम ५ (१) (फ) (अकरा) चा समावेश करण्यात आला.

प्रारंभी ज्या पदावर नेमणूक केलेली आहे त्याकरिता असलेली उच्चत्तर वयोमर्यादेची अट शिथिल करण्याच्या सवलतीचा फायदा घेऊन जो महानगरपालिकेच्या सेवेत आलेला आहे त्याला वयाच्या ५८ व्या वर्षी नियतवयोमानानुसार निवृत्तिवेतनाकरिता (नियतसेवावधी निवृत्तिवेतन) याची सातत्याची अर्हकारी सेवा घेण्यास अनुमती देण्यात यावी. (परंतु इतर कोणत्याही प्रकारच्या निवृत्ति वेतनाकरिता नाही.) त्याच्या प्रत्यक्ष अर्हताकारी सेवेचा चौथा हिस्सा किंवा नियुक्तिचे वेळी त्याचे वय २५ वर्षापेक्षा जेवढ्या कालावधीमध्ये जास्त होते तेवढा कालावधी किंवा ५ वर्षाचा कालावधी यापैकी जो सर्वात कमी कालावधी असेल तेवढा प्रत्यक्ष कालावधी धरण्यात यावा. (वरील नवीन नियमाचा अंमल दि. १ एप्रिल, १९५३ पासून देण्यात आलेला आहे.)

**टीप (अ) :-** सैन्यामध्ये असताना ज्यांची नोकरी निवृत्ति वेतनाकरिता पात्र नव्हती त्यांनाही जास्तीत जास्त ४ वर्षाच्या अटीसापेक्ष, लष्करी नोकरी हिशोबात धरण्याचा फायदा देण्यात येईल.

**(ब)** दि. १ एप्रिल, १९४७ नंतर युद्ध सेवेतील ज्या उमेदवारांना महानगरपालिकेच्या नोकरीत नेमले आहे त्यांना निवृत्ति वेतनाच्या हिशोबासाठी त्याच मान्य युद्ध सेवेच्या किंवा इतर लष्करी नोकरीला जोडून त्याच्या १/२ एवढी नोकरी हिशोबात धरण्यास परवानगी द्यावी.

मात्र,

(एक). लष्करी नोकरीसाठी त्या कर्मचाऱ्याला कोणतेही निवृत्ति वेतन मिळालेले असता कामा नये.

(दोन). ज्यावर कर्मचाऱ्याची नेमणूक झाली आहे त्या नोकरीसाठी वा पदांकरिता भरती करण्यासाठी विहित केलेल्या कमीत कमी वयाच्या पूर्वी त्याने केलेली नोकरी निवृत्ति वेतनासाठी हिशेबात घेतली जाणार नाही.

(तीन). भारताच्या सशस्त्र सैन्यामध्ये किंवा एखाद्या साम्राज्य (कॉमनवेल्थ) देशाच्या तत्सम सैन्यामध्ये केलेली नोकरी निवृत्ति वेतनासाठी त्याप्रमाणे हिशोबात घेतली जाईल.

(चार). युद्ध व युद्धोत्तर काळ, या दोन्हीचा समावेश होणाऱ्या नोकरीसाठी मंजूर केलेले जर असेल तर, निवृत्ति वेतन उपदान सोडून, युद्ध सेवेच्या बाबतीत दिलेल्या बोनस व उपदानाची रक्कम परत मागता कामा नये.

(पाच). लष्करी नोकरी-युद्ध सेवा आणि महानगरपालिकेची नोकरी यामधील एक वर्षापर्यंतचा खंडित काळ (ब्रेक) हा आपोआप माफ केलेला कालावधी म्हणून धरण्यात येईल.

मात्र, एक वर्षापेक्षा जास्त पण तीन वर्षापेक्षा जास्त नाही एवढा खंडीत काळ, अपवादात्मक परिस्थितीमध्ये, स्थायी समिती माफ करु शकेल.

(क) एखाद्या महानगरपालिका कर्मचाऱ्याने दि. ३ सप्टेंबर १९३९ आणि दि. १ एप्रिल १९४६ यामध्ये केलेल्या युद्ध सेवेच्या बाबतीत, जर तो वरील कंडिका (अ) मधील सवलतींना पात्र असेल तर त्याबाबतीत, युद्ध सेवेसह आपल्या संपूर्ण लष्करी नोकरीच्या बाबतीत त्याने वरील कंडिका (ब) मधील सवलतीचा फायदा घ्यावा किंवा वरील कंडिका (अ) खाली निवृत्तिवेतनासाठी युद्ध कालावधीमध्ये केलेली नोकरी आणि युद्ध कालावधीच्या अगोदर किंवा नंतर केलेली उर्वरित नोकरी, त्या नोकरीच्या अर्ध्या एवढ्या प्रमाणात त्याने हिशोबात धरावी.

२. मुंबई महानगरपालिका अधिनियम किंवा महानगरपालिका सेवा नियमावली यामध्ये व्याख्या दिल्याप्रमाणे, या नियमांमध्ये आणलेल्या इतर कोणत्याही शब्दाचा अर्थ त्याच अर्थाने या ठिकाणी घेण्यात आलेला आहे.

*** ५ अ.** एखाद्या बेकायदेशिर संपामध्ये सहभाग घेणे हा नोकरीमधील खंडित काल म्हणून समजण्यात येईल, तथापि, विशेष परिस्थितीमध्ये महानगरपालिकेला अशा खंडित सेवेचा कालावधी माफ करता येईल.

**६.** या नियमांचा अर्थ लावण्याचा अधिकार महानगरपालिका स्वत:कडे राखून ठेवित आहे.

**७.** या नियमान्वये मिळालेले कोणतेही अधिकार आपल्या नियंत्रणाखालील कोणत्याही अधिकाऱ्याकडे, सक्षम अधिकारी, ज्या अटी विहीत करण्यात येतील त्या अटींवर सोपवू शकेल.

**८.** या नियमांच्या प्रयोजनार्थ, एक वैद्यकिय मंडळ असेल. महानगरपालिका आयुक्त महानगरपालिकेच्या मंजुरीने सदर मंडळाच्या (घटना) स्थापनेसंबंधी आणि अधिकार क्षेत्रासंबंधी वगैरे नियम तयार करतील.

****८ अ.** निवृत्ती वेतनाची प्रकरणे निकालात काढण्यासाठी वेळोवेळी योग्य वाटतील अशा पध्दती महानगरपालिका आयुक्त या नियमांखाली घालून देतील आणि या संबंधीच्या प्रतिज्ञापत्रांचे नमुने विहित करतील.

---

* महानगरपालिका ठराव क्र. १७५१ दि. १८ फेब्रुवारी, १९६० अन्वये नियम ५अ चा अंतर्भाव करण्यात आला आणि शासकीय ठराव, नगर विकास, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. बीएमसी/ ५३६०- दि. ३१ मे, १९६० अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली. दि. १ एप्रिल, १९५७ पासून त्याचा अंमल देण्यात आलेला आहे.

** महानगरपालिका ठराव क्र. ४७७ दि. ९ ऑगस्ट, १९७१ अन्वये नियम ८अ चा अतंर्भाव करण्यात आल व शासकीय ठराव, नगर विकास व गृहनिर्माण विकास क्र. बीएम्सी / १०७१/५५३२८-क, दि. ७ जानेवारी १९७२ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

## विभाग दोन

# सर्वसाधारण अटी

**९.** या नियमामध्ये कोणत्याही बाबतीत अन्यथा काही स्पष्टपणे नमूद केले नसेल तर, या नियमांन्वये फक्त स्पष्टपणे आणि काटेकोरपणे अनुज्ञेय होण्याजोगे असलेले प्रमुख लेखापाल यांनी प्रमाणित केल्याप्रमाणे असलेले कोणतेही निवृत्तिवेतन सक्षम प्राधिकारी मंजुर करू शकतील.

***१० :** या नियमामधील कोणत्याही विशिष्ट अशा तरतुदीखाली जर कोणत्याही बाबतीत निवृत्तीवेतन देता येत नसेल तर, महानगरपालिका, अत्यंत अपवादात्मक अशी परिस्थिती सोडून, या नियमान्वये अनुज्ञेय असलेल्या किमान मासिक निवृत्ती वेतनापेक्षा जास्त नाही एवढे निवृत्तीवेतन मंजूर करील किंवा, या नियमांच्या सर्वसाधारण हेतूस या देण्यामुळे बाधा येत नसेल तर, नियम ६९ या खाली विहित केलेल्या सारणीनुसार काढलेल्या अशा निवृत्तिवेतन मूल्यापेक्षा जास्त नाही एवढे उपदान मंजूर करील.

अशा प्रकरणांमध्ये नियम ५७ (५) नुसार, मृत्यू किंवा अवशिष्ट उपदान किंवा नियम ५९ किंवा ८८ या खाली कुटुंब निवृत्तिवेतन यांचा फायदा देता येणार नाही.

(दिनांक १ जानेवारी १९८६ पासून प्रभाव देण्यात येईल).

**११ अ.** गैर वर्तणुक किंवा दिवाळे निघाल्यामुळे जर एखाद्या महानगरपालिका कर्मचाऱ्याला नोकरीमधून निवृत्त व्हावे लागले तर त्याला अनुकंपा निवृत्ति वेतन सोडून इतर कोणतेही निवृत्ति वेतन देता येणार नाही.

**ब.** अकार्यक्षमतेमुळे जर एखाद्या महानगरपालिका कर्मचाऱ्याला नोकरीमधून निवृत्त होणे भाग पडले तर, जर तो नियतसेवा आधी निवृत्ति वेतन किंवा सेवानिवृत्ति वेतनास पात्र असेल तर, त्याला असे निवृत्ति वेतन देण्यात यावे. जर तो अशा निवृत्ति वेतनास पात्र नसेल तर त्याला, अनुकंपा निवृत्ति वेतन सोडून, निवृत्ति वेतन देता येणार नाही.

---

* स्थायी समिती ठराव क्र. १६०३ दि. २४ नोव्हेंबर, १९५५ अन्वये नियम १० सुधारण्यात आला आणि महानगरपालिका ठराव क्र. १००९ दि. ५ डिसेंबर, १९५५ आणि शासकीय ठराव, स्थानिक शासन आणि सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. बीएमसी/५९५५-ई दि. २० डिसेंबर, १९५५ अन्वये मंजुर करण्यात आला.

* महानगरपालिका ठराव क्र. ३१९ दि. १ सप्टेंबर, १९८९ अन्वये नियम क्र. १० सुधारण्यात आला व शासकीय ठराव क्र. बीएमसी-१३९३/६६९/सीआर /१२५/९३/-युडी-२१ दि. ३१ जानेवारी, २००० अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

**१२.** ज्या महानगरपालिका कर्मचाऱ्याला परकीय सेवेवर पाठविण्यात आले आहे, त्याला तो परकीय सेवेवर असताना, महानगरपालिकेच्या नोकरीमधून स्वखुषीने निवृत्त झाल्यावर, निवृत्ति वेतन देता येणार नाही. या नियमाच्या प्रयोजनार्थ, जर महानगरपालिका कर्मचाऱ्याला नोकरीमधून निवृत्त होण्यास सांगितले नसेल तर, परंतु महानगरपालिका सेवा नियमावलीनुसार त्याला नोकरीमधून निवृत्त होण्यास भाग पाडण्यापूर्वी तो सेवानिवृत्तीवेतनावर जर नोकरीमधून निवृत्त झाला असेल तर ही सेवानिवृत्ति ऐच्छिक समजण्यात येईल.

**१३.** ज्या महानगरपालिका कर्मचाऱ्याची नोकरी संपूर्णपणे समाधानकाकर नसेल त्याच्या बाबतीत, सक्षम प्राधिकाऱ्याला योग्य वाटेल त्या प्रमाणात, तो सक्षम प्राधिकारी त्या कर्मचाऱ्याचे निवृत्ती वेतन कमी करु शकेल.

**टीप** : नियम क्र. २० चा उपनियम (क) आणि नियम क्र. ११ आणि ३७ याखालील टीप पहावी.

**१४** वगळण्यात आला.

(दि. १-८-१९८७ पासून प्रभाव्य).

*** नवीन नियम १४ अ.**

(१) प्रत्येक निवृत्तिवेतन देण्यामागे पुढील काळातील चांगली वर्तणूक ही गर्भित शर्त असेल. जर निवृत्तिवेतनधारकाला गंभीर गुन्ह्याबद्दल किंवा गंभीर गैरवर्तणुकीबद्दल अपराधी ठरविले असेल तर सक्षम प्राधिकारी, लेखी आदेशाद्वारे निवृत्तिवेतन किंवा त्याचा काही भाग, कायमचा किंवा विशिष्ट कालावधीसाठी रोखून धरू शकेल किंवा काढून घेऊ शकेल.

मात्र, निवृत्तिवेतनाचा काही भाग रोखून ठेवला असेल किंवा काढून घेतला असेल तेव्हा उरलेल्या निवृत्तिवेतनाची रक्कम, ठरवून दिलेल्या किमान निवृत्तिवेतनाच्या रकमेहून कमी केली जाणार नाही.

(२) न्यायालयाने निवृत्तिवेतनधारकाला गंभीर गुन्ह्याबद्दल अपराधी ठरविले असेल तेव्हा, अशा अपराधसिध्दी संबंधीच्या न्यायालयाच्या निर्णयाच्या संदर्भात पोटनियम (१) अन्वये, कार्यवाही केली जाईल.

---

* स्थायी समिती ठराव क्र. १४९३ दि. ५ फेब्रुवारी १९९२ व महानगरपालिका ठराव क्र. ९६० दि. २१ डिसेंबर, १९९२ अन्वये नियम १४ वगळण्यात आला नवीन नियम क्र. १४अ व १४ब यांचा निवृत्तिवेतन नियमांमध्ये अंतर्भाव करण्यात आला आणि शासकीय ठराव क्र. बीएमसी-१३९३/६६७/सीआर/१२५/९३/-युडी-२१ दि. ३१ जानेवारी, २००० अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

(३) पोट नियम (२) खाली न येणाऱ्या प्रकरणात, सक्षम प्राधिकारी पोट नियम (१) अन्वये आदेश काढण्यापूर्वी, वेतन अथवा दर्जा कमी करण्याची (रिडक्शन) शिक्षा देण्यासाठी, खात्यांतर्गत चौकशी आयोजित करण्याकरिता विहित केलेल्या कार्यपध्दतीचे अनुपालन करील.

*** नवीन नियम १४ ब.**

**(१)** निवृत्तिवेतनधारक हा, त्याच्या सेवेच्या कालावधीत, तसेच सेवानिवृत्त होऊन पुनर्नियुक्तिनंतरच्या त्याच्या सेवेच्या कालावधीत गंभीर गैरवर्तणुकीबद्दल किंवा निष्काळजीपणाबद्दल अपराधी असल्यास कोणत्याही खात्यांतर्गत किंवा न्यायिक कार्यवाहीमध्ये दिसून आले तर, सक्षम प्राधिकाऱ्याला लेखी आदेशाव्दारे, निवृत्तिवेतन किंवा त्याचा कोणताही भाग कायमचा किंवा विशिष्ट कालावधीसाठी रोखून ठेवता येईल किंवा काढून घेता येईल आणि महानगरपालिकेला झालेल्या कोणत्याही आर्थिक नुकसानीची वसुली देखील अशा निवृत्तिवेतनातून पूर्ण किंवा अंशत: करण्याचा सक्षम प्राधिकारी आदेश देईल.

मात्र निवृत्तिवेतनाचा कोणताही भाग रोखून ठेवला असेल किंवा काढून घेतला असेल तेव्हा, उरलेल्या निवृत्तिवेतनाची रक्कम ठरवून दिलेल्या किमान रकमेपेक्षा कमी केली जाणार नाही.

**(२)** (अ) महानगरपालिका कर्मचारी सेवानिवृत्त होण्यापूर्वी किंवा पुनर्नियुक्त झाल्यानंतर सेवेत असताना त्याच्या विरुध्द पोटनियम (१) मध्ये उल्लेखिलेली खात्यांतर्गत कार्यवाही करण्यात आली असेल तर, ती कार्यवाही महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या निवृत्तिनंतर, या नियमाखालील कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल आणि महानगरपालिका कर्मचारी सेवेत राहिला असता तर, ज्या पध्दतीने ती चालू ठेवण्यात आली असती त्याच पध्दतीने, ज्या प्राधिकाऱ्याने सुरू केली त्याच्या कडून चालू ठेवली जाईल व समाप्त केली जाईल.

(ब) महानगरपालिका कर्मचारी सेवानिवृत्त होण्यापूर्वी किंवा पुनर्नियुक्त झाल्यानंतर सेवेत असताना त्याच्याविरुध्द खात्यांतर्गत कार्यवाही चालू झाली नसेल तर–

(एक) सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजुरीशिवाय ती चालू केली जाणार नाही.

(दोन) अशी कार्यवाही सुरू करण्यापूर्वीच्या चारपेक्षा अधिक वर्षाच्या कालावधीत घडलेल्या घटनेसंबंधातील ती असता कामा नये, आणि

---

* स्थायी समिती ठराव क्र. १४९३ दि. ५ फेब्रुवारी १९९२ व महानगरपालिका ठराव क्र. ९६० दि. २१ डिसेंबर, १९९२ अन्वये नियम १४ वगळण्यात आला नवीन नियम क्र. १४अ व १४ब यांचा निवृत्तिवेतन नियमांमध्ये अंतर्भाव करण्यात आला आणि शासकीय ठराव क्र. बीएमसी-१३९३/६६७/सीआर/१२५/९३/-युडी-२१ दि. ३१ जानेवारी, २००० अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

(तीन) सक्षम प्राधिकारी निर्देशित करील अशा प्राधिकाऱ्याकडून व अशा ठिकाणी आणि ज्या खात्यांतर्गत कार्यवाहीमध्ये म. न. पा. कर्मचारी सेवेत असताना त्यांचे वेतन अथवा दर्जा कमी करण्याचा आदेश देता येईल अशा खात्यांतर्गत कार्यवाहीच्या पध्दतीनुसार चालवण्यात येईल.

**(३)** म. न. पा. कर्मचारी सेवानिवृत्त होण्यापूर्वी किंवा पुनर्नियुक्त झाल्यानंतर सेवेत असताना त्याच्याविरुध्द एखादी न्यायिक कार्यवाही सुरु केलेली नसेल तर, अशी कोणतीही न्यायिक कार्यवाही, ती सुरु करण्यापूर्वी चार पेक्षा अधिक वर्षाच्या कालावधीत उद्‌भवलेल्या वादकारणासंबंधात किंवा घडलेल्या घटनेसंबंधात, सुरु केली जाणार नाही.

**(४)** जो म. न. पा. कर्मचारी नियत वयोमान होताच किंवा अन्यथा सेवानिवृत्त झाला असेल आणि ज्याच्या विरुध्द कोणतीही खात्यांतर्गत किंवा न्यायिक कार्यवाही सुरु केली असेल किंवा पोटनियम (२) खाली खात्यांतर्गत कार्यवाही पुढे चालू ठेवण्यात आली असेल त्याच्याबाबतीत, नियम ४५ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे तातुरते निवृत्तिवेतन मंजूर करण्यात येईल.

**(५)** निवृत्तिवेतन रोखून ठेवावयाचे नाही किंवा काढून घ्यावयाचे नाही असे सक्षम प्राधिकाऱ्याने ठरविले असेल, परंतु निवृत्तिवेतनातून आर्थिक नुकसानीची वसुली करावयाची असा आदेश दिला असेल तेव्हा, या नियमाच्या पोटनियम (१) च्या तरतुदींच्या अधीन राहून, सामान्यपणे म. न. पा. कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तिच्या दिनांकास अनुज्ञेय असलेल्या निवृत्तिवेतनाच्या एकतृतीयांशाहून अधिक दराने वसुली केली जाणार नाही.

**(६)** या नियमाच्या प्रयोजनासाठी–

(अ) म. न. पा. कर्मचाऱ्यास किंवा निवृत्तिवेतनधारकास ज्या तारखेला आरोपपत्र देण्यात आले असेल त्या तारखेस, किंवा म. न. पा. कर्मचाऱ्याला आधीच्या ज्या तारखेपासून निलंबनाधीन ठेवले असेल अशा तारखेस, खात्यांतर्गत कार्यवाही सुरु केली असल्याचे समजण्यात येईल.

(ब) न्यायिक कार्यवाही –

(एक) फौजदारी कार्यवाहीच्याबाबतीत, दंडाधिकारी जिची दखल घेतो अशी तक्रार किंवा प्रतिवेदन पोलिस अधिकाऱ्याने ज्या तारखेस दाखल केले असेल त्या तारखेस सुरु केली असल्याचे मानण्यात येईल, आणि

(दोन) दिवाणी कार्यवाहीच्या बाबतीत वादपत्र न्यायालयात ज्या तारखेस सुरु केले असल्याचे मानण्यात येईल.

(नियम १४ अ आणि १४ ब चा प्रभाव दि. १-८-१९८७ पासून).

**१५.** जी कारणे दफ्तरी लेखी नमूद करावयाची आहेत अशा विशेष कारणास्तव, स्थायी समिती -

१. महानगरपालिका कर्मचाऱ्याला सेवा निवृत्तिवेतन किंवा उपदानापासून विभिन्न असलेले निवृत्तिवेतन मिळावे या दृष्टीने सर्वसाधारणपणे एक वर्षापेक्षा जास्त नाही एवढी अर्हकारी सेवेतील कमतरता माफ करू शकेल, किंवा,

२. सर्वसाधारणपणे एक वर्षापेक्षा जास्त नाही एवढी वाढ निवृत्त होणाऱ्या महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या अर्हकारी सेवेमध्ये मिळवू शकेल आणि ही वाढ या नियमांच्या तरतुदींनुसार निवृत्तिवेतनासाठी अर्हकारी सेवा म्हणून समजण्यात येईल.

***१५ अ** :- खालील घटनांमुळे अर्हकारी सेवेत खंड पडेल :–

(एक) राजीनामा

(दोन) नोकरीमधून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे.

(तीन) सेवेमधील खंड समजण्याचा आदेश देण्यात आलेली रजेविना अनुपस्थिती.

**टीप :–**महानगरपालिका माध्यमिक शाळेव्यतिरिक्त, बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये योग्य त्या परवानगीने कायम अथवा हंगामी अशा दुसऱ्या सेवेवर नियुक्त होण्यासाठी दिलेला राजीनामा हा सेवेमधील खंड समजण्यात येणार नाही.

**टीप १ :--** वगळण्यात आली आहे. (दिनांक ३१-१-२००० पासून)

**टीप २ :--** वगळण्यात आली आहे. (दिनांक ३१-१-२००० पासून)

***१५ ब**

(१) महानगरपालिका आयुक्त हे, प्रत्येक प्रकरणामध्ये योग्य वाटतील अशा अटींवर अर्हताकारी सेवेमधील कोणताही खंड क्षमापित करु शकतील. मात्र,

---

* महानगरपालिका ठराव क्र. १२०० दि. ९ डिसेंबर, १९७१ अन्वये नवीन नियम १५अ चा अंतर्भाव करण्यात आला आणि शासकीय ठराव, नगर विकास, सार्वजनिक आरोग्य व गृहनिर्माण विभाग क्र. बीएमसी/५३७२/५४४३-क दि. १० मार्च, १९७२ अन्वये मंजुर करण्यात आला आणि दि. १ एप्रिल, १९७० च्या पूर्वलक्षी प्रभावाने त्याचा अंमल देण्यात आला.

* महानगरपालिका ठराव क्र. ९६० दि. २१ डिसेंबर, १९९२ अन्वये नियम १५ (अ) सुधारण्यात आला व नवीन नियम १५ब चा अंतर्भाव करण्यात आला. नियम १५ मधील टीप (१) (२) वगळण्यात आली आणि व शासकीय ठराव क्र. बीएमसी-१३९३/६६७/सीआर /१२५/९३/-युडी-२१ दि. ३१ जानेवारी, २००० अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

अ) असा खंड महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या आटोक्याबाहेरील कारणांमुळे पडलेला असला पाहिजे.

(ब) जिच्या संबंधातील सेवानिवृत्ति लाभ गमावले जातील अशी एकूण सेवा, कोणतेही एक किंवा दोन खंड असल्यास ते वगळता, पाच वर्षापेक्षा कमी असता कामा नये.

आणि

(क) सेवेत दोन किंवा अधिक खंड पडलेले असतील तर, अशा खंडाचा एकूण कालावधी एक वर्षापेक्षा अधिक असता कामा नये.

(२) पोटनियम (१) खाली क्षमापित केलेला खंडाचा कालावधी अर्हताकारी सेवा म्हणून हिशेबात घेतला जाणार नाही.

**१६.** प्रत्येक महानगरपालिका कर्मचाऱ्याने निवृत्ति वेतनासाठी ठराविक अर्ज सादर केला पाहिजे. त्याने निवृत्ति वेतनासाठी सदर औपचारिक अर्ज आपल्या स्वत:च्या हिताच्या दृष्टिने आपल्या सेवा निवृत्तिच्या तारखेपूर्वी दोन महिने अगोदर खाते प्रमुखांना सादर केला पाहिजे.

मात्र –

(एक) ज्या प्रकरणांमध्ये सेवानिवृत्तिची तारीख दोन महिने अगोदर ठरविता येत नाही त्या प्रकरणांमध्ये सेवानिवृत्तिची तारीख ठरल्याबरोबर ताबडतोब सदर अर्ज सादर केला पाहिजे. आणि –

(दोन) दोन महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी सेवानिवृत्तिपूर्व रजेवर जाणाऱ्या महानगरपालिका कर्मचाऱ्याने अशा तऱ्हेच्या रजेवर जाण्याच्या वेळी सदर अर्ज सादर केला पाहिजे.

**टीप** : निवृत्ति वेतनाचा हक्क निकालात काढण्यासाठी होणारा विलंब टाळण्याकरिता तसेच आपणास निवृत्ति वेतन मिळाले आहे अशा गैर समजुतीने महानगरपालिका कर्मचाऱ्याने नोकरीमधून निवृत्त होऊ नये. कारण त्यानंतर हे निवृत्ति वेतन अनुज्ञेय होत नाही असे आढळते या हेतुसाठी हा नियम आहे.

**१७.** सदर औपचारिक अर्ज मिळाल्यानंतर खाते प्रमुखांनी ताबडतोब परिशिष्ट १ मध्ये नमुद केलेल्या प्रपत्रामध्ये खालीलप्रमाणे सदर अर्ज भरला पाहिजे.

(एक) त्यांनी सदर प्रपत्रामध्ये नोकरी, रजा इत्यादी संबंधीचा संपूर्ण तपशिल दिला पाहिजे.

(दोन) सक्षम प्राधिकाऱ्याने सदर अर्जाचा अनुकूलदृष्टया विचार करण्यासाठी अर्जदाराचे चारित्र्य, वर्तणुक आणि गतसेवा त्या दृष्टीने समाधानकारक होती किंवा नाही हे त्यांनी त्या प्रपत्रामध्ये नमूद केले पाहिजे.

(तीन) जो कालावधी अर्हकारी सेवा म्हणून समजण्यात येत नाही अशा तऱ्हेच्या रजेचा सर्व कालावधी, कामावरून निलंबित केल्याचा कालावधी वगैरे गोष्टी, त्यांनी त्या प्रपत्रामध्ये नमुद केल्या पाहिजेत.

(चार) जर हा अर्ज असमर्थता निवृत्ति वेतनासाठी असेल तर, सदर अर्जाला आवश्यक ते वैद्यकिय प्रमाणपत्र जोडले पाहिजे.

**टीप** : एखादा महानगरपालिका कर्मचारी दोन महिन्यांच्या कालावधीमध्ये सेवानिवृत्त होणार आहे हे समजल्याबरोबर खाते प्रमुखांनी परिशिष्ट १ मध्ये दिलेले प्रपत्र भरण्याचे काम हाती घेतले पाहिजे व निवृत्ति वेतनासाठी महानगरपालिका कर्मचाऱ्याने प्रत्यक्ष औपचारिक अर्ज सादर करेपर्यंत ह्या गोष्टीला विलंब लावू नये.

**१७ अ** - नियम क्र. १७ मध्ये विहीत केल्याप्रमाणे कार्यालयामधील कागदपत्रांवरुन जर नोकरी, रजा इत्यादी बाबतचा तपशिल कोणत्याही प्रकरणी देता येत नसेल तर, साध्या कागदावर अर्जदाराकडून लेखी निवेदन घेण्यात यावे. (इंडियन स्टँप ॲक्ट, (२), १८९९, अनुसूची १, क्रमांक ४ (क) पहावा.) तसेच मिळविता येण्याजोगा आनुषंगिक पुरावा जमविण्यात यावा. उदाहरणार्थ, एखाद्या अधिकाऱ्याने दुय्यम कर्मचाऱ्याला कार्यालय सोडताना दिलेला दाखला आणि त्याजबरोबर असलेल्या समकालिन महानगरपालिका कर्मचाऱ्यांनी सादर केलेला पुरावा, वगैरे.

वरिलप्रमाणे प्रमाणित केलेली नोकरी स्विकारण्याचा अधिकार सक्षम प्राधिकाऱ्याचा आहे.

---

* स्थायी समिती ठराव क्र. ९९० दि. २८ ऑगस्ट १९५६ अन्वये नियम क्र. १७अ चा अंतर्भाव करण्यात आला आणि महानगरपालिका ठराव क्र. ९०१ दि. ऑक्टोबर १९५६, शासकीय ठराव, स्थानिक शासन आणि सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. बीएमसी/ ५९५६-ई दि. १४ सप्टेंबर १९७० अन्वये निश्चित करण्यात आला.

**१८.** (अ) पूर्व नियमामध्ये विहित केलेल्या पध्दतीप्रमाणे सदर अर्ज संपूर्णपणे भरल्यावर खालील दस्तऐवजांसह तो प्रमुख लेखापाल यांच्याकडे पाठविण्यात यावा.

१. जर ठेवले असेल तर, अर्जदाराचे नोकरीविषयक पुस्तक.

* २. अर्जदाराच्या डाव्या हाताचा अंगठा आणि बोटांचे ठसे व खाते प्रमुखांनी साक्षांकित केले आहे असे अर्जदाराच्या नमुन्याच्या सहीचे कार्ड, परंतु कर्मचारी त्यांच्या नावाची इंग्रजी, हिंदी किंवा कार्यालयीन प्रादेशिक भाषेत सही करू शकतील इतके साक्षर असल्यास त्यांना त्यांचा अंगठा आणि बोटांचे ठसे याऐवजी त्यांचा फोटो चिकटविण्याचा पर्याय देण्यात यावा.

३. निवृत्ति वेतनदेय वेतन आणि निवृत्ति वेतन यांचा हिशोब दर्शविणारे पत्रक, आणि.

४. जर अर्ज असमर्थता निवृत्ति वेतनासाठी असेल तर, आवश्यक ते वैद्यकिय प्रमाणपत्र.

(ब) खाते प्रमुखांनी सदर प्रकरणाच्या वस्तुस्थितीचा संपूर्णपणे विचार करून मागितलेले निवृत्ति वेतन स्विकारण्यात यावे किंवा कसे याबाबतीत सदर अर्जावर आपली शिफारस नमूद केली पाहिजे.

**१९.** ज्या महानगरपालिका कर्मचाऱ्याचे वय ५५ वर्षे झालेले नाही अशा महानगरपालिका कर्मचाऱ्याकडून असमर्थता निवृत्तिवेतनासाठी आलेला अर्ज योग्य त्या वैद्यकिय प्राधिकाऱ्यांनी सही केलेल्या वैद्यकिय प्रमाणपत्रासह असला पाहिजे. मात्र अपवादात्मक प्रकरणामध्ये सक्षम प्राधिकारी जिल्हा वैद्यकिय अधिकारी किंवा जिल्हा शल्य चिकित्सक यांनी सही केलेले प्रमाणपत्र स्विकारतील. याबाबतीत जर एखादी गोष्ट वगळण्यात आली असेल तर सक्षम प्राधिकारी नंतरची तारीख असलेले प्रमाणपत्र स्विकारू शकतील.

**२०.** (अ) महानगरपालिका कर्मचाऱ्याने पुढील नोकरीसाठी शारीरिकदृष्ट्या पात्र नसल्याचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर केले असेल तर, सदर वैद्यकिय प्रकरणाच्या संक्षिप्त निवेदनासह असले पाहिजे आणि त्यामध्ये घेतलेल्या वैद्यकिय उपचारांचाही समावेश असला पाहिजे आणि या नियमाच्या पोटकलम (ब) मध्ये केलेल्या तरतुदी सोडून, ते प्रमाणपत्र खालील नमुन्यामध्ये असले पाहिजे.

---

* महानगरपालिका ठराव क्र. ६०९ दि. १७ ऑगस्ट १९६४ अन्वये नियम १८(अ) (२) सुधारण्यात आला व शासकीय ठराव नगर विकास आणि सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. बीएमसी/ ५३६३/११६०९-क दि. ३० एप्रिल १९६५ अन्वये मंजूर करण्यात आला.

''असा दाखला देण्यात येतो की, मी/आम्ही काळजीपूर्वक .................... या खात्यामधील श्री/श्रीमती ...................................... यांची वैद्यकिय दृष्ट्या तपासणी केली आहे. त्यांच्या स्वत:च्या म्हणण्याप्रमाणे त्यांचे वय ....... एवढे आहे, व त्यांचे दृश्य वय अंदाजे .............. एवढे आहे. ते ज्या खात्यात आहेत त्या खात्यामध्ये कोणत्याही प्रकारची नोकरी करण्यास, श्री/श्रीमती .......................................... हे संपूर्णपणे आणि कायम स्वरुपाने ........... यामुळे असमर्थ आहेत असे मला/आम्हाला वाटते. त्यांची ही असमर्थता खालील गोष्टीमुळे झाली असावी असे मला/आम्हाला वाटते.

१. प्रत्यक्ष कारणामुळे, किंवा.

२. जरी ही प्रत्यक्ष असमर्थता नसली तरी असमर्थता त्वरित वाढविण्यास किंवा विकोपास जाण्यास यामुळे मदत झाली आहे. किंवा

३. अनियमित किंवा असंयमी सवयींमुळे प्रत्यक्ष उद्‌भवलेली नाही किंवा त्वरित वाढलेली नाही किंवा विकोपास गेलेली नाही.

(ब) जर ही असमर्थता संपूर्ण आणि कायम स्वरूपाची दिसत नसेल तर ते प्रमाणपत्र सुधारण्यात यावे व सदर प्रकरणामधील वस्तुस्थिती लक्षात घेऊन न्याय्य असेल तर ते प्रमाणपत्र खालील नमुन्यामध्ये दिले जावे.

माझे/आमचे असे मत आहे की, श्री/श्रीमती .................................... हे ................. महिन्यांच्या विश्रांती नंतर नोकरीसाठी शारीरिकदृष्ट्या समर्थ ठरतील आणि सध्या ते ज्या स्वरुपाचे काम करीत आहेत त्या कामापेक्षा कमी त्रासाचे काम करण्यास ते लायक होतील.

(क) महानगरपालिका कर्मचारी ज्या खात्यामध्ये आहे त्या खात्यामध्ये पुढील नोकरी करण्यास संपूर्णपणे व कायम स्वरूपाने अमसर्थ आहे अशा अर्थाच्या पोटकलम अ मध्ये विहित केलेल्या प्रमाणपत्राचा किंवा उपरोक्त पोटकलमामध्ये नमूद केल्याप्रमाणे अंशत: असमर्थतेबद्दलच्या पर्यायी प्रमाणपत्राचा हेतू असा आहे की सदर कर्मचाऱ्याला शक्य असेल तर, कमी वेतनावर सुध्दा नोकरीत ठेवले जावे म्हणजे त्याला निवृत्ति वेतन देण्याचा खर्च टाळता येईल. जर त्याला कमी वेतनावरील नोकरीत देखील ठेवता येत नसेल तर, त्याला निवृत्तिवेतन देण्यात यावे. परंतु उपजिविकेसाठी त्याची असलेली अंशत: समर्थता लक्षात घेऊन, त्याला नियमांखाली अनुज्ञेय असलेले संपूर्ण निवृत्ति वेतन देणे आवश्यक आहे किंवा कसे याचा विचार करण्यात यावा.

(ड) दाखला देणाऱ्या वैद्यकीय प्राधिकाऱ्याला जर अर्जदारामध्ये कोणताही विशिष्ट असा रोग आढळून येत नसेल परंतु सर्वसाधारण अशक्तपणामुळे त्याचे वय ५५ वर्षापेक्षा कमी असूनही पुढील काळातील नोकरीसाठी तो असमर्थ आहे असे जर त्यांना वाटत असेल तर वैद्यकिय प्राधिकाऱ्यांनी आपल्या सदर मतासाठी तपशिलवार कारणे दिली पाहिजेत, आणि त्या प्रकरणी आवश्यकता वाटल्यास सक्षम प्राधिकारी दुसरे वैद्यकिय मत मागवू शकतील.

(इ) ज्या अर्जदाराचे वय ५५ वर्षापेक्षा कमी दर्शविले आहे त्याच्या बाबतीत वृद्धावस्थेमुळे किंवा वाढत्या वयानुसार नैसर्गिक ऱ्हास होण्याच्या कारणामुळे ही असमर्थता निर्माण झाली आहे असे साधे प्रमाणपत्र चालणार नाही. परंतु अर्जदार हा पुढील नोकरीसाठी सर्वसाधारण दौर्बल्यामुळे असमर्थ आहे असा तऱ्हेचा दाखला जेव्हा वैद्यकीय प्राधिकारी देतो त्यावेळेला अर्जदाराचे वय वाजवीहून कमी दाखविले असल्याबद्दलची कारणे त्याने दर्शविली पाहिजेत.

**२१.** वैद्यकीय तपासणी करणाऱ्या वैद्यकिय अधिकाऱ्याने जर विदारण (रप्चर्) किंवा अशा तऱ्हेच्या एखाद्या रोगावर शस्त्रक्रिया करण्याची शिफारस केली असेल व या गोष्टीस जर महानगरपालिका कर्मचारी तयार नसेल तर पुढील नोकरीसाठी विदारण वा अशाच काहीशा रोगामुळे असमर्थ असल्याबद्दलचे वैद्यकिय प्रमाणपत्र प्रश्न उपस्थित केल्याशिवाय स्विकारले जाऊ नये. याबाबतीत वैद्यकिय अहवालामध्ये खालील प्रश्नावर निष्कर्ष असले पाहिजेत.

(अ) महानगरपालिका कर्मचारी सध्या नोकरीसाठी असमर्थ आहे काय ?

(ब) ही असमर्थता नाहीशी करण्यासाठी एखादी शस्त्रक्रिया हे संभाव्य कारण होऊ शकेल असे तज्ञ वैद्यकीय दाखला दर्शवितो आहे काय ?

(क) महानगरपालिका कर्मचाऱ्याने शस्त्रक्रिया करून घेण्याचे नाकारले आहे काय ?

(ड) ही अट जर सर्वसाधारणपणे स्विकारली तर ही, शस्त्रक्रिया करणे धोक्याचे होईल काय ?

**टीप** : एखाद्या शस्त्रक्रियेमुळे त्यांना जो दिलासा मिळेल. तो दिलासा केवळ अज्ञानामुळे त्यांच्याकडून नाकारण्यात येतो, तेव्हा त्यांनी अगोदर जे निवृत्ति वेतन मिळविले आहे ते त्यांच्याकडून काढून घेणे हे न्याय्य होणार नाही. परंतु जे निवृत्ति वेतन द्यावयाचे आहे त्याची रक्कम वैद्यकिय अहवालानुसार बदलण्यात यावी. अशा प्रकारच्या व्यक्तिंना अशा प्रकारे शस्त्रक्रिया करण्याबद्दल पुन्हा एकदा संधी मिळेल व त्यांना त्यांच्यापुढे असलेल्या पर्यायी गोष्टींचा फायदा घेण्याची संधी दिल्याशिवाय त्यांना नोकरीमधून निवृत्त करू नये.

२२. अर्जदाराने, तो वैद्यकीय प्राधिकाऱ्यांच्या पुढे वैद्यकिय तपासणीसाठी जाणार आहे ही गोष्ट खाते प्रमुखांना माहित असल्यासंबंधीचे पत्र सादर केल्याशिवाय पुढील नोकरीसाठी असमर्थ असल्याबद्दलचे वैद्यकिय प्रमाणपत्र देण्यात येऊ नये. नोकरी पुस्तकामध्ये अर्जदाराचे जे वय नमूद केलेले आहे किंवा इतर कार्यालयीन अभिलेखावरून त्याचे जे वय असेल ते वय खाते प्रमुखांनी वैद्यकीय प्राधिकाऱ्यांना कळविले पाहिजे.

२३. (अ) जेव्हा जखम किंवा इजा निवृत्ति वेतन यासाठी अर्ज येतो तेव्हा ज्या खात्यामध्ये अर्जदार नोकरीस आहे त्या खात्याच्या प्रमुखाने कोणत्या परिस्थितीत सदर जखम किंवा इजा झाली यासंबंधीची चौकशी पुराव्यासह केली पाहिजे.

(ब) नियम क्र. १८ मध्ये नमूद केलेल्या दस्तऐवजासह परिशिष्ट १ मध्ये नमूद केलेल्या प्रपत्रामध्ये अर्ज व सदर प्रकरणाच्या परिस्थितीसंबंधीचे निवेदन तसेच त्यावरील आपली शिफारस यासह त्यांनी अर्ज महानगरपालिका आयुक्तांकडे पाठविला पाहिजे.

(क) नंतर महानगरपालिका आयुक्त योग्य त्या वैद्यकीय प्राधिकाऱ्याकडून अर्जदाराची वैद्यकीय तपासणी करण्याची व्यवस्था करतील व ज्या मुद्यावर अहवाल अपेक्षित आहे त्या मुद्यासंबंधीच्या संपूर्ण निवेदनासह ते प्रकरण सदर वैद्यकीय प्राधिकाऱ्याकडे सोपवतील.

(ड) वैद्यकीय प्राधिकाऱ्याचा अहवाल प्राप्त झाल्यावर महानगरपालिका आयुक्त निवृत्ति वेतन प्रमाणित करण्यासाठी तो अर्ज प्रमुख लेखापाल यांच्याकडे पाठवतील.

२४. (अ) नियम क्र. ४४ खाली जेव्हा कुटुंब निवृत्ति वेतनासाठी अर्ज येतो तेव्हा ज्या खात्यामध्ये महानगरपालिका मृत कर्मचारी नोकरीला होता त्या खात्याच्या खाते प्रमुखांनी कोणत्या परिस्थितीत महानगरपालिका कर्मचारी मृत पावला यासंबंधीच्या पुराव्यासह रितसर चौकशी केली पाहिजे. तसेच हक्कदारांची आर्थिक परिस्थिती आणि त्यांचे मृताशी असलेले नाते यासंबंधीदेखील चौकशी केली पाहिजे, आणि अर्जासोबत वैद्यकीय अहवाल सादर केला गेला नसेल तर, स्वविवेकानुसार, अशा तऱ्हेचा वैद्यकीय अहवाल ते मागू शकतील.

(ब) नंतर ते हा अर्ज परिशिष्ट २ मध्ये नमूद केलेल्या प्रपत्रामध्ये सदर प्रकरणांच्या निवेदनासह आणि त्यावरील आपल्या शिफारशीसह प्रमुख लेखापाल यांच्याकडे पाठवतील.

**२५.** (अ) नियम क्र. १८, २३ किंवा २४ या खालील तरतुदीनुसार निवृत्ति वेतनाचे कागदपत्र आल्यानंतर प्रमुख लेखापाल ते कागदपत्र पडताळून त्यासंबंधी आवश्यक असलेल्या तरतुदी पार पाडतील. नोकरी आणि निवृत्ति वेतनाचे हिशेब बरोबर असल्याबद्दल ते दाखला देतील. सदर प्रकरणाला कोणते नियम लागू आहेत आणि निवृत्ति वेतनाच्या हक्कावरील अहवाल यासह हे निवृत्ति वेतनाचे कागदपत्र ते सक्षम प्राधिकाऱ्याकडे मंजुरीसाठी पाठवतील.

(ब) अनुज्ञेय निवृत्ति वेतनाच्या रक्कमेवरील आपल्या अहवालात प्रमुख लेखापाल यांनी नियम क्र. १३ मध्ये दिलेल्या गोष्टींकडे नेहमीच विशेष लक्ष दिले पाहिजे.

*** २६.** (अ) या नियमांन्वये एखाद्या महानगरपालिका कर्मचाऱ्याला जेवढे निवृत्ति वेतन देता येते त्यापेक्षा त्याला दिलेले निवृत्ति वेतन हे जर नंतर जास्त आढळून आले तर त्याला ही जास्त रक्कम परत करण्यास सांगावे.

(ब) प्रमुख लेखापाल यांनी निवृत्ति वेतनासंबंधीचा अहवाल तयार केल्यानंतर निवृत्ति वेतनाच्या रक्कमेमध्ये परत हिशोब करण्यासारखी एखादी घटना घडल्यास ही वस्तुस्थिती ताबडतोब खाते प्रमुखांनी प्रमुख लेखापालांना कळविली पाहिजे. अशा प्रकारची घटना जरी घडली नसली तरीदेखील, महानगरपालिका कर्मचारी निवृत्त होण्याच्या तारखेपासून एक आठवड्याच्या आत ही वस्तुस्थिती प्रमुख लेखापालांना कळविली पाहिजे.

**टीप** : या नियमाच्या प्रयोजनार्थ, परिशिष्ट नऊ मध्ये विहीत केलेले प्रतिज्ञापत्र सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकाऱ्याकडून घेतले पाहिजे.

**२७.** उपदानाची रक्कम हप्त्याने न देता एक रक्कमेने दिली पाहिजे.

**२८.** थकबाकीमध्ये, निवृत्ति वेतन दरमहा दिले पाहिजे.

---

* महानगरपालिका ठराव क्र. ७९० दि. ८ ऑक्टोबर, १९५७ या अन्वये नियम २६ सुधारण्यात आला आणि शासकीय ठराव, स्थानिक स्वराज्य शासन, व सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. बीएमसी/ ५३५९ दि. १४ जानेवारी १९६० अन्वये मंजूर करण्यात आला.

***२९** :- जर १२ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी निवृत्ती वेतन घेण्यात आले नाही तर ते निवृत्ती वेतन देण्याचे बंद होईल. तद्नंतर जर निवृत्ती वेतनधारकाने रक्कम मिळविण्यासाठी अर्ज केला तर प्रमुख लेखापाल निवृत्ती वेतनाचे अधिदान देण्याचे सुरु करतील तथापि, थकबाकीतील निवृत्ती वेतन जर पहिल्यांदाच द्यावयाचे असेल किंवा थकबाकीची रक्कम रु. ५,०००/- पेक्षा जास्त होत असेल तर त्या बाबतींत प्रमुख लेखापाल सक्षम प्राधिकाऱ्यांची मंजुरी घेतल्याशिवाय अधिदान देणार नाहीत.

(प्रभावाचा दि. १-६-१९८६)

**टीप** : महानगरपालिका प्रशासनाकडून चूक झाल्याने किंवा एखादी गोष्ट राहून गेल्यामुळे जर पैसे देण्याचे स्थगित झाले असले तर सक्षम अधिकाऱ्याच्या पूर्व आदेशाशिवाय प्रमुख लेखापाल थकबाकीचे पैसे देऊ शकतील.

***३०** : निवृत्ती वेतन धारकाच्या मृत्यूनंतर त्याला प्रत्यक्ष द्यावयाच्या कोणत्याही थकबाकीची रक्कम, त्याच्या मृत्यूच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत थकबाकीची रक्कम देण्याकरिता अर्ज केला तर थकबाकी नवरा अथवा बायकोला व जर नवरा अथवा बायको नसेल तर त्याच्या वारसदाराना ही रक्कम देण्यात यावी. जर हा अर्ज तद्नंतर आला तर महानगरपालिका आयुक्त यांच्या मंजुरी शिवाय पैसे देण्यात येऊ नयेत.

(प्रभावाची दिनांक १-६-१९८६)

---

* स्थायी समितीचा ठराव क्र. १५७७ दि. १६ मार्च १९८५ प्रशासकांचा (महानगरपालिका) ठराव क्र. १६६२ दि. २७ मार्च १९८५ अन्वये नियम २९ आणि नियम ३० सुधारण्यात आला आणि शासन ठराव क्र. बीएमसी/१३८५/४०१४/युडी-३ दि. १२ मे १९८५ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

**** ३१.** नियम क्र. ३० च्या तरतुदीसापेक्ष, नियम क्र. २६ खालील टिपेमध्ये विहित केलेल्या प्रपत्रामध्ये आवश्यक ते हमीपत्र घेऊन, मृत निवृत्तिवेतनधारकाला द्यावयाच्या थकबाकीची रक्कम त्याच्या वारसदाराना खालीलप्रमाणे देण्यात यावी. :–

(एक) प्रमुख लेखापाल यांना पुरेशी वाटेल त्या प्रमाणात मागणीदारांच्या हक्काविषयी (राईट्स अँड टायटल्स) आवश्यक ती चौकशी प्रमुख लेखापाल यांच्याकडून झाल्यानंतर नेहमीचे कायदेशीर अधिकार पत्र न घेता जर द्यावयाची रक्कम रु. ५००/- पेक्षा जास्त नसेल तर पैसे देण्यात यावेत.

(दोन) ज्यावेळेला द्यावयाची रक्कम रु. ५००/- पेक्षा जास्त असेल तेव्हा मागणीदाराच्या हक्काविषयी महानगरपालिका आयुक्तांचे समाधान झाले असेल व वहिवाटपत्र सादर करण्याचा आग्रह धरल्यामुळे, मागणीदारांना गैरवाजवी विलंब आणि त्रास होईल असे त्यांना वाटले तर महानगरपालिका आयुक्त यांना आवश्यक वाटेल तेवढ्या जामिनदारासह क्षतिपूर्तीबंधपत्र अंमलात आणल्यावर महानगरपालिका आयुक्त यांच्या आदेशान्वये पैसे देण्यात यावेत.

**टीप** :– वर संदर्भित केलेले क्षतिपूर्तिबंधपत्र (इंडेम्निटी बाँड) परिशिष्ट ३ मध्ये दिलेल्या प्रपत्रामध्ये अंमलात आणावे.

(तीन) ज्या वेळेला शंका उत्पन्न होईल तेव्हा जो इसम कायदेशीर अधिकारपत्र सादर करील तो सोडून इतरांना पैसे देण्यात येऊ नयेत.

---

** महानगरपालिका ठराव क्र. ७९० दि. ८ ऑक्टोबर, १९५७ अन्वये नियम ३१ सुधारण्यात आला आणि शासकीय ठराव, स्थानिक स्वराज्य शासन, व सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. ५३५९-क दि. १४ जानेवारी, १९६० अन्वये मंजुर करण्यात आला.

## विभाग तीन

# निवृत्तिवेतनाचे प्रकार

**३२.** महानगरपालिका कर्मचाऱ्यांना किंवा त्यांच्या कुटुंबियांना खालील विविध प्रकारचे निवृत्तिवेतन देता येईल. :–

(१) नियत सेवावधि निवृत्तिवेतन –

जो महानगरपालिका कर्मचारी नियमानुसार आवश्यक असलेल्या वयाला महानगरपालिकेच्या नोकरीमधून सेवानिवृत्त होतो त्याला हे निवृत्तिवेतन देण्यात येते.

(२) पूर्ण सेवानिवृत्तिवेतन (रिटायरिंग पेन्शन) - जो महानगरपालिका कर्मचारी नोकरीमधून स्वेच्छेने सेवानिवृत्त होतो किंवा अर्हकारी सेवेच्या ठराविक मुदतीनंतर परंतु नोकरीमधून सेवानिवृत्त होण्याच्या नियत वयोमानापूर्वी ज्या महानगरपालिका कर्मचाऱ्याला नोकरीमधून सेवानिवृत्त होणे आवश्यक असते त्याला हे निवृत्तिवेतन देण्यात येते.

(३) असमर्थता निवृत्तिवेतन - जो महानगरपालिका कर्मचारी नोकरीमधून सेवानिवृत्त होण्याच्या नियत वयोमानापूर्वीच मानसिक किंवा शारीरिक दौर्बल्यामुळे नोकरीमधून सेवानिवृत्त होतो त्याला हे निवृत्तिवेतन देण्यात येते.

* (४) भरपाई निवृत्तिवेतन - अन्यथा वैद्यकीय प्रमाणपत्र सोडून इतर कारणावर व त्याचा स्वत:चा काहीही दोष नसताना किंवा सावधि पद धारण करणाऱ्या महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या प्रकरणी त्याच्या नेमणुकीचा नियत अवधी समाप्त झाल्यामुळे, नियत वयोमानापूर्वी नोकरीमधून सेवानिवृत्त व्हावे लागल्यामुळे द्यावयाचे निवृत्तिवेतन किंवा नियत सेवावधि निवृत्तिवेतन मिळण्यापूर्वी, ज्या महानगरपालिका कर्मचाऱ्याला नोकरीमधून काढण्यात येते, त्याला हे निवृत्तिवेतन देण्यात येते.

(५) जखम किंवा इजा निवृत्तिवेतन - ज्या महानगरपालिका कर्मचाऱ्याला महानगरपालिकेच्या नोकरीमध्ये असताना जखम किंवा इजा झाली आहे, अशाला हे निवृत्तिवेतन देण्यात येते.

---

* नियम ३२ ची कंडिका ४ म. न. पा. ठराव क्र. १००७ दि. ६ डिसेंबर १९६२ अन्वये सुधारण्यात आली आणि शासकीय ठराव नगर विकास आणि सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. बी. एम. सी. १०६३/२६२६३-सी, दिनांक २६ जुलै १९६३ अन्वये तिला निश्चिती देण्यात आली.

(६) अनुकंपा निवृत्तिवेतन - ज्या महानगरपालिका कर्मचाऱ्याला गैरवर्तणुक, दिवाळे निघाल्याने किंवा अकार्यक्षमता यामुळे नोकरीमधून काढून टाकले आहे, अशाला हे निवृत्ति वेतन देण्यात येते.

(७) कुटुंब निवृत्तिवेतन - जो महानगरपालिका कर्मचारी नोकरीमध्ये असताना मृत झाला आहे किंवा जखमांमुळे ज्याचा मृत्यु झाला आहे किंवा महानगरपालिकेच्या, नोकरीमध्ये असताना संपर्क झाल्यामुळे उद्भवणाऱ्या एखाद्या रोगामुळे जो मृत्यु पावला आहे अशा महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या कुटुंबियांना हे निवृत्तिवेतन देण्यात येते.

## विभाग चार

# विशेष अटी

**३३.** जो महानगरपालिका कर्मचारी महानगरपालिका सेवा नियमावलीखाली निश्चित केलेल्या नियत वयोमानाच्या दिवशी किंवा त्यानंतर नोकरीमधून सेवानिवृत्त होतो त्याला नियत सेवावधि निवृत्तिवेतन देण्यात यावे.

***३४.** जो महानगरपालिका कर्मचारी नियत सेवावधि निवृत्तिवेतनास पात्र नाही त्याला पूर्ण सेवा निवृत्तिवेतन (रिटायरिंग पेन्शन) देण्यात येईल. जर :--

(एक) त्याला २० वर्षांची अर्हकारी सेवा पूर्ण केल्यानंतर विभाग चौदा खालील तरतुदींसापेक्ष नोकरीमधून सेवानिवृत्त होण्याची परवानगी दिलेली असेल. मात्र तो ज्या तारखेला सेवानिवृत्त होऊ इच्छितो त्या तारखेच्या किमान ३ महिने अगोदर त्याने या संबंधात योग्य प्राधिकाऱ्याला लेखी सूचनापत्र द्यावयास, हवे, किंवा

(दोन) त्याला ३० वर्षांची अर्हकारी सेवा पूर्ण केल्यानंतर कोणत्याही वेळी नोकरीमधुन सेवानिवृत्त करणे आवश्यक असेल तर मात्र, तो ज्या तारखेला सेवानिवृत्त होणे आवश्यक असेल तर त्या तारखेच्या किमान ३ महिने अगोदर त्याला या संबंधात योग्य प्राधिकाऱ्याने लेखी सूचनापत्र द्यावयास हवे; किंवा

(तीन) ३० वर्षांची अर्हकारी सेवा पूर्ण केल्यानंतर जर त्याने महानगरपालिकेच्या नोकरीमधून अकार्यक्षमतेमुळे सेवानिवृत्त होणे आवश्यक असेल तर,

**३५.** ज्या महानगरपालिका कर्मचाऱ्याला तो महानगरपालिकेच्या नोकरीसाठी किंवा महानगरपालिकेच्या ज्या विशिष्ट शाखेमध्ये तो काम करीत असेल त्यामध्ये काम करण्यास मानसिक किंवा शारीरिक दौर्बल्यामुळे असमर्थ आहे अशा अर्थाचे नियम क्र. २० मध्ये विहित केलेले वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केल्यावर, महानगरपालिकेच्या नोकरीमधून नियत वयोमानापूर्वी सेवानिवृत्त होण्यास परवानगी दिलेली आहे त्याला नियम क्र. ३६ आणि ३७ च्या तरतुदींसापेक्ष असमर्थता निवृत्तिवेतन देण्यात येईल.

**टिप** - नियम क्र. २० (क) देखील पहावा.

---

* महानगरपालिका ठराव क्रमांक ३१४ दि. २० जुलै, १९७८ अन्वये नियम ३४ सुधारण्यात आला आणि शासकीय ठराव, नगर विकास आणि सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. बीएमसी/ १३७८/ १८५९/युडी-३, दि. १७ नोव्हेंबर, १९७८ अन्वये मंजुर करण्यात आला. दि. १ डिसेंबर, १९७८ पासून त्याचा अंमल देण्यात आला.

**३६.** जो महानगरपालिका कर्मचारी दौर्बल्य सोडून इतर कारणाकरिता महानगरपालिकेच्या नोकरीमधून मुक्त केलेला आहे, त्याने जरी महानगरपालिकेच्या नोकरीसाठी तो असमर्थ असल्याचा वैद्यकीय पुरावा सादर केला तरीही तो (महानगरपालिका कर्मचारी) असमर्थता निवृत्तिवेतनास पात्र असणार नाही.

**३७.** ज्या महानगरपालिका कर्मचाऱ्याची असमर्थता ही त्याच्या थेट अनियमित किंवा असंयमी संवयीमुळे निर्माण झाली आहे त्याला असमर्थता निवृत्तिवेतन दिले जाणार नाही. जर ही असमर्थता थेट या संवयीमुळे निर्माण झाली नसेल तरी ही असमर्थता त्वरित होण्यास किंवा विकोपास जाण्यास त्यामुळे मदत झाली असेल तर या कारणामुळे निवृत्तिवेतनाची रक्कम कमी करता येईल का किंवा, किती प्रमाणात कमी करता येईल याबद्दल निवृत्तिवेतन मंजुर करणारा प्राधिकारी निर्णय घेऊ शकेल.

**३८.** (१) एखाद्या महानगरपालिका कर्मचाऱ्याला त्याचे कायम पद नष्ट करण्यात आल्यामुळे किंवा त्या पदाच्या कामांच्या स्वरुपामध्ये बदल करण्यात आल्यामुळे आणि त्या महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या स्वत:च्या पदाच्या अटींप्रमाणेच ज्या दुसऱ्या पदाच्या अटी निदान तत्सम आहेत असे त्याला नोकरीमधून काढून टाकण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्याला वाटते त्या पदावर त्या महानगरपालिका कर्मचाऱ्याची नेमणूक केल्याखेरीज त्याला नोकरीमधून काढून टाकण्यासाठी निवडले आहे अशा महानगरपालिका कर्मचाऱ्याला खालील पर्याय देण्यात येतील :–

(अ) त्याने अगोदर केलेल्या नोकरीसाठी त्याला अनुकंपा निवृत्तिवेतन किंवा उपदान देता येईल. ते घेण्याची संधी त्याला देण्यात येईल.

(ब) अन्य कार्यालयामध्ये (आस्थापनेमध्ये) कमी वेतनावरही जर त्याला दुसरी नेमणूक देण्यात आली किंवा त्याची बदली करण्यात आली तर ती स्विकारणे आणि निवृत्तिवेतनासाठी त्याची पूर्वीची नोकरी हिशोबात घेण्याचे चालू ठेवणे.

**अनुदेश** : या नियमान्वये महानगरपालिका कर्मचाऱ्यास निवृत्तिवेतन देण्यापूर्वी सदर महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या स्वत:च्या पदासमान असलेल्या दुसऱ्या पदावर त्याला नेमता येईल किंवा कसे याबाबत काळजीपूर्वक विचार करण्यात यावा आणि असे करता येणे शक्य नसेल तर तत्संबंधीची कारणे लेखी नमूद केली पाहिजेत.

* (२) अवधिपद धारण करणाऱ्याची महानगरपालिकेमधील नोकरी नियुक्तिचा कालावधी समाप्त होण्याच्या परिणामी, नियतवयोमानापूर्ण सेवा निवृत्तिवेतन किंवा नियतसेवावधि निवृत्तिवेतन मिळण्यापूर्वी संपुष्टात आली असेल तर त्याला 'भरपाई निवृत्तिवेतन' देण्यात यावे.

**३९.** झालेली जखम वा इजा इतकी गंभीर स्वरुपाची आहे की त्यामुळे निवृत्तिवेतन देणे न्याय्य होईल अशा अर्थाचे, परिशिष्ट ४ मधील प्रपत्रामध्ये नमूद केलेले वैद्यकीय प्राधिकाऱ्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केल्यावर संबंधित महानगरपालिका कर्मचारी झालेली जखम वा इजा याच्या परिणामी पुढील नोकरीसाठी कायम स्वरुपाने असमर्थ झालेला नसला तरीही, सदर महानगरपालिका कर्मचाऱ्यास जखम किंवा इजा निवृत्तिवेतन देण्यात यावे.

**टीप** - वैद्यकीय प्राधिकाऱ्याचे लक्ष परिशिष्ट चार च्या अखेरीस त्याच्या मार्गदर्शनासाठी नमूद केलेल्या सूचनांकडे वेधण्यात येत आहे.

**४०.** जखम किंवा इजा निवृत्तिवेतन हे निवृत्तिवेतनधारकाला त्याच्या हयातभर देणे आवश्यक आहे असे नाही; परंतु सक्षम प्राधिकारी ज्या कालावधीसाठी आदेश देईल त्या कालावधीसाठी ते देण्यात येईल. पहिल्या प्रथम जर ते हंगामी स्वरुपात मंजुर करण्यात आले असेल तर त्यानंतर आवश्यक वाटेल अशा पुढील कालावधीसाठीदेखील ते देण्यात येईल.

**४१.** जो कायम किंवा अन्य महानगरपालिका कर्मचारी त्याची कार्यालयीन कर्तव्ये बजावित असताना किंवा त्याच्या कार्यालयातील स्थानामुळे जखमी झालेला आहे किंवा ज्याला इजा झालेली आहे किंवा त्याची कार्यालयीन कर्तव्ये पार पाडीत असताना त्याच्या आरोग्यास गंभीर स्वरुपाची इजा झालेली आहे अशा महानगरपालिका कर्मचाऱ्याला सक्षम प्राधिकारी अपवादत्मक प्रकरणांमध्ये जखम किंवा इजा निवृत्तिवेतन किंवा उपदान मंजुर करू शकेल.

**४२.** जर एखादा महानगरपालिका कर्मचारी जखम, इजा किंवा विकलांगता यामुळे महानगरपालिकेच्या नोकरीसाठी कायम स्वरुपात असमर्थ झालेला असेल आणि त्यासाठी त्याला नियम क्र. ४१ अन्वये जखम वा इजा निवृत्तिवेतन किंवा उपदान मंजुर करण्यात आलेले असेल तर सेवानिवृत्तिनंतर, असे निवृत्तिवेतन किंवा उपदान याखेरीज आणखी, या नियमांन्वये ज्याला तो पात्र आहे असे इतर कोणतेही निवृत्तिवेतन किंवा उपदान त्याला देण्यात येईल. अशा प्रकरणी नियम ५२ च्या तरतुदी लागू करण्यात येतील.

---

* महानगरपालिका ठराव क्रमांक १००७ दि. ६ डिसेंबर, १९६२ अन्वये उप-नियम ३८(२) अंतर्भूत केलेला आहे व शासकीय ठराव, नगर विकास आणि सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. बीएमसी/१०६३/दि. २६ जुलै, १९६३ अन्वये मंजुर करण्यात आला.

**४३.** जेव्हा एखाद्या महानगरपालिका कर्मचाऱ्याला तो पूर्ण सेवा निवृत्तिवेतनास किंवा नियत सेवावधि निवृत्तिवेतनास पात्र होण्यापूर्वी गैरवर्तणुकीमुळे किंवा दिवाळखोरीमुळे महानगरपालिकेच्या नोकरीमधून सेवानिवृत्ति व्हावे लागते किंवा अकार्यक्षमतेच्या कारणामुळे त्याने महाननगरपालिकेच्या नोकरीमधून सेवानिवृत्ति होणे आवश्यक असते तेव्हा सक्षम प्राधिकारी, जर त्याला हे प्रकरण विशेष विचार करण्यासाठी योग्य वाटले तर, त्या महानगरपालिका कर्मचाऱ्याला अनुकंपा निवृत्तिवेतन मंजुर करेल.

**टीप -** १ नोकरीमधून बडतर्फ करण्यात आलेला महानगरपालिका कर्मचारी अनुकंपा निवृत्तिवेतनासाठी पात्र असणार नाही.

**टीप** - २ - नियम ११ देखील पहावा.

४४. जो कायम किंवा अन्य महानगरपालिका कर्मचारी नियम ४१ मध्ये वर्णन केलेल्या परिस्थितीमध्ये ठार झाला आहे किंवा जो इजेमुळे अथवा रोग जडल्यामुळे मृत्यु पावला आहे अशा महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या कुटुंबास महानगरपालिका, कुटुंब निवृत्तिवेतन किंवा उपदान मंजुर करू शकेल.

४५. नियम क्र. ४४ खाली मंजुर करावयाच्या कुटुंब निवृत्तिवेतनाविषयीच्या अटी महानगरपालिका सर्वसाधारण अथवा विशेष आदेशानुसार विहीत करील, त्याप्रमाणे असतील.

*** ४५ अ :- नवीन नियम**

(१) (अ) नियम १४ ब मध्ये नमूद करण्यात आलेल्या महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, सक्षम प्राधिकारी, महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तिच्या तारखेपर्यंत, किंवा सेवानिवृत्तिच्या तारखेस तो निलंबाधीन असेल तर त्याला निलंबाधीन ठेवले असेल त्या तारखेच्या लगतपूर्वीच्या तारखेपर्यंत, अर्हताकारी सेवेच्या आधारे त्याला अनुज्ञेय झाले असते अशा कमाल निवृत्तिवेतनाइतके, तात्पुरते निवृत्तिवेतन मंजूर करील.

---

* महानगरपालिका ठराव क्र. ९६० दि. २१ डिसेंबर, १९९२ अन्वये नियम क्र. ४५अ चा अंतर्भाव करण्यात आला आणि शासन ठराव क्र. बीएमसी-१३९३/६६७/सीआर /१२५/९३/-युडी-२७ दि. ३१ जानेवारी, २००० अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

(ब) सेवानिवृत्तिच्या तारखेपासून सुरु होणाऱ्या सहा महिन्यांच्या कालावधीकरिता सक्षम प्राधिकारी तात्पुरते निवृत्तिवेतन मंजूर करील. हा कालावधी खात्यांतर्गत किंवा न्यायिक कार्यवाही पूर्ण होईपर्यंत वाढविता येईल आणि असे तात्पुरते निवृत्तिवेतन, ज्या तारखेस सक्षम अधिकाऱ्याने अंतिम आदेश दिले असतील त्या तारखेस आणि त्या तारखेपर्यंत चालू राहिल.

(क) खात्यांतर्गत किंवा न्यायिक कार्यवाही पूर्ण होईपर्यंत आणि त्यावर अंतिम आदेश दिले जाईपर्यंत महानगरपालिका कर्मचाऱ्यास उपदानाचे अधिदान करता येणार नाही.

(२) खात्यांतर्गत किंवा न्यायिक कार्यवाही पूर्ण होईपर्यंत आणि त्या संबंधातील अंतिम आदेश दिले जाईपर्यंत महानगरपालिका कर्मचाऱ्याला मंजूर करण्यात आलेल्या अंतिम सेवानिवृत्ती लाभांशी (फायद्यांशी) समायोजित करण्यात येईल. परंतु अंतिमरित्या मंजूर करण्यात आलेले निवृत्तिवेतन, तात्पुरत्या निवृत्तिवेतनापेक्षा कमी असेल किंवा निवृत्तिवेतन कायमचे किंवा विशिष्ट कालावधीकरिता कमी करण्यात आले असेल किंवा रोखून ठेवण्यात आले असेल तर कोणतीही वसुली करण्यात येणार नाही.

(वरील नियमाचा प्रभाव दि. १-८-१९८७ पासून देण्याचे नियोजिले आहे).

## विभाग पाच

## निवृत्तिवेतनाची रक्कम

* **४६.** या कलमाखाली कोणत्याही बाबतीत स्पष्टपणे अन्यथा या विरुध्द काही नमूद केले नसेल तर, या नियमांच्या तरतुदीनुसार जी अर्हकारी सेवा निवृत्ती वेतनासाठी हिशोबात घेतली जाते; त्या अर्हकारी सेवेच्या पूर्ण सहामाही कालावधींची संख्या व त्याला/तिला निवृत्ती वेतनार्ह वेतनाची रक्कम या गोष्टी लक्षात घेऊन महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या निवृत्ती वेतनाची रक्कम ठरविली जाते.

मात्र निवृत्ती वेतनाच्या प्रयोजनाकरिता अर्हकारी सेवेचा कालावधी मोजण्याकरिता एका वर्षातील तीन महिन्याचा कालावधी वा त्याहून जास्त असलेला कालखंड एक अर्धे वर्ष समजुन धरण्यात यावे.

या तरतुदीस राज्य शासनाने मंजूरी दिल्याच्या तारखेपासून म्हणजेच ३०-६-१९८३ पासून अंमल देण्यात यावा.

** **४७ :** निवृत्तिवेतनाची, कुटुंब निवृत्तिवेतनासह, अंतिमत: गणना केलेली रक्कम तसेच, जर असेल तर तात्पुरत्या निवृत्तिवेतनाची रक्कम ही पुढील उच्च रुपयामध्ये पूर्ण करण्यात यावी. (दिनांक ३१ जानेवारी २००० पासून प्रभाव देण्यात यावा.)

**टीप (१) :** नियम ४४, ४८, ५७, ७६ आणि ७८ खाली मंजूर करण्यात आलेल्या सर्व प्रकारच्या (वर्गाच्या) निवृत्तिवेतनाच्या आणि उपदानाच्याबाबतीत हा नियम लागू आहे. नियम क्रमांक ४३ खाली मंजूर करण्यात आलेले अनुकंपा निवृत्तिवेतन हे सुध्दा, नियम ५४ च्या मर्यादेच्या अधीन राहून, पुर्ण रुपयामध्ये मंजूर करण्यात यावे.

**टीप (२) :** दि. ३१ जानेवारी २००० पासून काढून टाकण्यात आली आहे.

---

* प्रशासकांचा (स्थायी समितिचा) ठराव क्र. १५७७ दि. १६ मार्च १९८५ प्रशासकांचा (महानगरपालिका) ठराव क्र. १६६२ दि. २७ मार्च १९८५ अन्वये नियम ८८ (६) सुधारण्यात आला आणि शासन ठराव क्र. बीएमसी/१३८५/४०१४/युडी-३ दि. १२ मे १९८६ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

** महानगरपालिका ठराव क्र. ९६० दि. २१ डिसेंबर, १९९२ अन्वये नियम क्र. ४७ सुधारण्यात आला आणि शासन ठराव क्र. बीएमसी/१३९३/६६७/सीआर/९३/युडी-२१ अन्वये त्यास निश्चिति देण्यात आली. दि. ३१ जानेवारी, २००० पासून या सुधारणेचा अमंल देण्यात आला.

** ४८ (१) : दहा वर्षाची अर्हकारी सेवा पूर्ण होण्यापूर्वी नियतवयोमान, सेवानिवृत्ती असमर्थता किंवा भरपाई निवृत्तीवेतन यावर सेवानिवृत्त होणाऱ्या महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, अर्हकारी सेवेच्या पूर्ण झालेल्या प्रत्येक सहा महिन्यांच्या कालावधीसाठी, अर्ध्या महिन्याच्या वेतनाएवढी सेवाउपदानाची रक्कम असेल.

**टीप :--** या नियमान्वये अनुज्ञेय असलेल्या सेवा उपदानाच्या रकमेच्या हिशेबाकरिता "वेतन" म्हणजे, महानगरपालिका कर्मचारी सेवानिवृत्तीच्या लगत पूर्वी प्रत्यक्ष घेत असलेले नियम ५ (१) (इ) मध्ये व्याख्या दिलेले वेतन होय. (दि. १-१-८६ पासून प्रभाव दिला जाईल).

**(२) (अ)** : ३३ वर्षापेक्षा कमी नाही एवढी अर्हकारी सेवा पूर्ण केल्यानंतर या नियमांच्या तरतूदींनुसार नियतवयोमान सेवानिवृत्ती, असमर्थता किंवा भरपाई निवृत्तीवेतन यावर सेवानिवृत्त होणाऱ्या महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, निवृत्तीवेतन देय वेतनाच्या ५० टक्के एवढी निवृत्तीवेतनाची रक्कम असेल. परंतु, कमीत कमी प्रतिमाह रु. ३७५/- आणि जास्तीत जास्त प्रतिमाह रु. ४,०००/- एवढी असेल.

**ब)** दहा वर्षे किंवा दहा वर्षापेक्षा जास्त अर्हकारी सेवा पूर्ण केल्यानंतर परंतु, ३३ वर्षाची अर्हकारी सेवा पूर्ण करण्यापूर्वी, या नियमांच्या तरतुदीनुसार, नियत वयोमान, सेवानिवृत्ती असमर्थता किंवा भरपाई निवृत्तीवेतन अनुसार सेवानिवृत्त होणाऱ्या महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, पोट-नियम (अ) अन्वये अनुज्ञेय असलेल्या कमाल निवृत्तीवेतनाच्या रक्कमेच्या प्रमाणानुसार निवृत्तीवेतनाची रक्कम असेल. कारण त्यांनी केलेली अर्हकारी सेवा ही ३३ वर्ष अर्हकारी सेवेइतकी मानावी लागेल. परंतु कमीत कमी प्रतिमाह रु. ३७५/- आणि जास्तीत जास्त प्रतिमाह रु. ४,०००/- एवढी असेल.

**टीप** : टप्पा (मर्यादा) सूत्रानुसार (स्लॅब फॉर्म्युला) ज्यांच्या निवृत्ती-वेतनाचा हिशेब केलेला आहे अशा दिनांक १-१-१९८६ च्या विद्यमान निवृत्तीवेतनधारकांच्या बाबतीत, अर्हकारी सेवेच्या हिशेबात घ्यावयाच्या कालावधीमध्ये व निवृत्तीवेतनार्ह वेतन ह्यामध्ये बदल न करता, निवृत्तीवेतन देय वेतनाच्या ५० टक्क्याने निवृत्तिवेतनाचा पुन्हा हिशेब करण्यात येईल. यामुळे निवृत्तिवेतनामध्ये वाढलेल्या रकमेचे जादा अंशराशिकरण करता येणार नाही.

(दिनांक १-१-१९८६ पासून प्रभाव).

---

* महानगरपालिका ठराव क्र. ३७९ दि. १ सप्टेंबर १९८९ अन्वये नियम ४८ सुधारण्यात आला आणि शासन ठराव क्र. बीएमसी-१३९३/६६७/सीआर /१२५/९३/-युडी-२१ दि. ३१ जानेवारी, २००० अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

**४९.** जो महानगरपालिका कर्मचारी भरपाई निवृत्तिवेतनासाठी पात्र आहे त्याने महानगरपालिकेच्या नोकरीमध्ये दुसरे पद स्विकारले आणि त्यानंतर कोणत्याही वर्गाचे निवृत्तिवेतन मिळविण्यास तो पात्र बनला तर अशा निवृत्तिवेतनाची रक्कम त्याने ते पद स्विकारले नसते तर ज्या भरपाई निवृत्तिवेतनाची तो मागणी करू शकला असता त्या रकमेपेक्षा कमी असता कामा नये.

**५० (दि. १-१-१९८६ पासून वगळण्यात आला आहे).**

*** ५१.** महानगरपालिका कर्मचाऱ्यास नियम क्र. ४१ खाली मंजुर झालेली जखम किंवा इजा निवृत्तिवेतन किंवा उपदान यांची रक्कम सक्षम प्राधिकारी संबंधित प्रकरणाचा सर्व दृष्टीने विचार करून ठरवील त्याप्रमाणे असेल. मात्र खाली विहीत केलेल्या मर्यादेपेक्षा ती रक्कम जास्त असता कामा नये :--

(एक) सदर जखमेमुळ किंवा इजेमुळे जर त्याचा एखादा डोळा किंवा एखादा अवयव गेला असेल किंवा त्या जखमेमुळे किंवा इजेमुळे एखादा अवयव नसल्याप्रमाणे त्याला तत्सम असमर्थता आली असेल तर त्याच्या वेतनाच्या १/३ एवढे निवृत्तिवेतन त्याला देण्यात यावे मात्र ही रक्कम दरमहा रु. १५०/- पेक्षा जास्त असता कामा नये. या प्रमाणात, ज्याचा त्याने उपयोग गमावला आहे अशा प्रत्येक डोळा किंवा अवयव या बाबतीत त्याला निराळे निवृत्तिवेतन देण्यात यावे.

(दोन) सदर जखम किंवा इजा ही वर कंडिका (१) मध्ये नमूद केलेल्या स्वरुपाची नसेल तर ते निवृत्तिवेतन त्याच्या वेतनाच्या १/५ इतके असेल. मात्र ही रक्कम दरमहा रु. ७५/- पेक्षा जास्त असता कामा नये.

(तीन) सदर इजेमुळे त्याच्या प्रकृतीवर परिणाम झाला असेल तर हे निवृत्तिवेतन दरमहा रु. ५०/- पेक्षा जास्त असता कामा नये.

(चार) ही रक्कम जर उपदान म्हणून असेल तर वरील कंडिका (१) (२) किंवा (३) अन्वये संबंधित प्रकरणांमध्ये योग्य असेल तेवढ्या अनुज्ञेय निवृत्तिवेनाच्या रकमेएवढी असेल. परंतु ही रक्कम कोणत्याही प्रकरणी त्याच्या वेतनाच्या २४ पटीपेक्षा जास्त असता कामा नये.

---

* महानगरपालिका ठराव क्र. १३८० दि. ११ जानेवारी, १९६० अन्वये नियम ५१ सुधारण्यात आला आणि व शासकीय ठराव, नगर विकास आणि सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. बीएमसी-५३६०/३०९९१-क, दि. १९ सप्टेंबर १९६० अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

**५२.** ज्या महानगरपालिका कर्मचाऱ्याला जखम किंवा इजा निवृत्तिवेतन किंवा उपदान मंजुर झाले आहे त्या महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या निवृत्तिवेतनासाठी धरण्यात येणाऱ्या अर्हकारी सेवेमुळे जर तो असमर्थता निवृत्तिवेतन मिळण्यास पात्र न होता तो असमर्थता उपदानास पात्र होत असेल तर तो निवड करून, आपल्या अर्हकारी सेवेच्या पूर्ण झालेल्या प्रत्येक वर्षासाठी निवृत्तिवेतनदेय वेतनाच्या १/२ या दराने येणारे निवृत्तिवेतन आपल्या असमर्थता उपदानाऐवजी घेऊ शकेल.

**५३.** ज्या व्यक्तीला कामगार भरपाई अधिनियम, १९२३ लागू आहे. त्याच्या प्रकरणी –

(१) एखाद्या विशिष्ट प्रकरणामध्ये अधिनियमान्वये देय असलेली भरपाई ही अपुरी आहे, असे जर मंजूर करणाऱ्या प्राधिकाऱ्याचे मत झाले तरच नियम क्र. ५१ च्या तरतुदींनुसार जखम अथवा इजा निवृत्तिवेतन अथवा उपदान आणि नियम क्र. ५५ किंवा ७७ खाली कुटुंब निवृत्तिवेतन किंवा उपदान त्याला मंजूर करण्यात यावे; आणि

(२) अधिनियमान्वये देय असलेली भरपाईची रक्कम आणि या नियमांखाली अन्यथा अनुज्ञेय झाली असती ती रक्कम या दोहोंमधील जो फरक येईल त्या फरकापेक्षा कोणत्याही इसमास दिलेली निवृत्तिवेतनाची किंवा उपदानाची रक्कम जास्त असता कामा नये.

***५४ :** नियम ४३ अन्वये एखाद्या महानगरपालिका कर्मचाऱ्याला मंजूर झालेल्या अनुकंपा (कारुण्य) निवृत्तिवेतनाची रक्कम ही, प्रत्येक बाबतीत, सक्षम अधिकारी ठरविल त्याप्रमाणे असेल. मात्र जर सदर महानगरपालिका कर्मचारी हा वैद्यकीय प्रमाणपत्रावर नोकरीतून निवृत्त झाला असता तर त्याला जे असमर्थता सेवा उपदान आणि निवृत्तिवेतन मिळाले असते त्या रकमेच्या २/३ एवढ्या रकमेपेक्षा ही रक्कम जास्त होता कामा नये. आणखी असे की, या नियमान्वये मंजूर करण्यात आलेले निवृत्तिवेतन अथवा उपदान हे, पूर्ण रुपयांमध्ये असेल, आणि नियम ४८ अन्वये विहित केलेल्या किमान निवृत्तिवेतनाच्या रकमेसापेक्ष असेल.

(दिनांक १-१-१९८६ पासून प्रभाव).

---

* महानगरपालिका ठराव क्र. ३१९ दि. १ सप्टेंबर १९८९ अन्वये नियम ५४ सुधारण्यात आला आणि शासकीय ठराव क्र. बीएमसी-१३९३/६६७/सीआर /९३/-युडी-४ दि. ३१ जानेवारी, २००० अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

**५५.** महानगरपालिका मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबास नियम क्र. ४४ खाली जर कुटुंब निवृत्तिवेतन देण्यात आले असेल तर त्या प्रकरणाच्या बाबतीत सर्व दृष्टीने विचार करून ही रक्कम महानगरपालिका ठरवील, मात्र, ही रक्कम त्याच्या वेतनाच्या १/२ रकमेपेक्षा जास्त होता कामा नये, किंवा जर ते उपदान असेल तर ते (रक्कम) महानगरपालिका मृत कर्मचाऱ्याच्या वेतनाच्या २४ पटीपेक्षा जास्त होता कामा नये.

*** नवीन नियम ५५अ :- उपदानाच्या विलंब झालेल्या अधिदानावर व्याज**.

१) अधिदान देय असल्याच्या तारखेपासून तीन महिन्यानंतर जर उपदानाचे अधिदान करण्यात आले असेल व प्रशासकीय चुकीमुळे अधिदानास विलंब झाल्याचे निर्विवादपणे सिध्द झाले तर, तीन महिन्यांच्या पुढील कालावधीच्या बाबतीत, उपदानाच्या रकमेवर खाली नमूद केलेल्या दराने व्याज देण्यात येईल :--

एक) तीन महिन्यांच्या नंतर व एक वर्षापर्यंत : प्रतिवर्षी ७ टक्के.

दोन) एक वर्षाच्या नंतर : प्रतिवर्षी १० टक्के.

मात्र, याबाबतीत विहीत केलेली कार्यपध्दती महानगरपालिका कर्मचाऱ्याने पूर्ण न केल्यामुळे, अधिदानास विलंब झालेला असता कामा नये.

२) उपदानाच्या अधिदानास विलंब झालेले प्रत्येक प्रकरणासंबंधित खाते स्वाधिकारात विचारात घेईल व प्रशासकीय चुकीमुळे उपदानाच्या अधिदानास विलंब झाल्याचे ज्या प्रकरणी खात्याच्या निदर्शनास येईल त्या प्रकरणी संबंधित खाते व्याज देण्याकरिता प्रमुख लेखापालांच्या खात्याकडे शिफारस करील.

३) जर उप-नियम (२) अन्वये केलेली खात्याची शिफारस, प्रमुख लेखापालांच्या खात्याने स्विकारली तर, व्याजाचे अधिदान करण्याकरिता संबंधित खाते मंजूरी देईल.

---

* स्थायी समितीचा ठराव क्र. १७७२ दि. २५ जानेवारी, १९८८ महानगरपालिका ठराव क्र. ८५ दि. ५ मे १९८८ अन्वये नियम ५५ (अ) अंतर्भूत करण्यात आला आणि शासकीय ठराव क्र. बीएमसी-१३८८/३४४५/सीआर/२८५/८८/-युडी-२१ दि.२२ सप्टेंबर १९८९ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

४) प्रमुख लेखापालांच्या खात्याच्या सहमतीसह जिथे व्याजाचे अधिदान केलेले आहे अशा सर्व प्रकरणांमध्ये, संबंधित खाते जबाबदारी निश्चित करील व उपदानाच्या अधिदानामध्ये झालेल्या विलंबासाठी जबाबदार असलेल्या महानगरपालिका कर्मचारी किंवा संबंधित कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करील.

५) महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तिनंतर महानगरपालिकेने घेतलेल्या निर्णयाच्या परिणामी, सेवानिवृत्तिनंतर दिलेल्या उपदानाच्या रकमेमध्ये –

अ) अगोदर दिलेले उपदान ज्या वेतनावर निर्धारित केलेले आहे त्या वेतनापेक्षा जास्त वेतन मंजूर झाले. **किंवा**

ब) संबंधित महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तिच्या दिनांकापूर्वीच्या तारखेपासून सदर नियमांच्या तरतूदी शिथिल करण्यात आल्या अशा कारणांमुळे वाढ झाली तर उपदानाच्या थकबाकीवर व्याज दिले जाणार नाही.

६) उपदानाचे अधिदान ज्या महिन्यामध्ये केलेले आहे त्या महिन्याच्या अगोदरच्या महिन्याच्या अखेरपर्यंत, उपरोक्त उप-नियम (१) मध्ये विहीत केलेल्या दरांनी व्याज देय असेल.

७) ज्या कर्मचाऱ्यांची खात्यांतर्गत किंवा न्यायालयीन चौकशी सुरु आहे त्यांच्या बाबतीत उपदानाचे अधिदान केले जात नाही. तथापि, खात्यांतर्गत/न्यायालयीन चौकशी पूर्ण झाल्यानंतर, जर महानगरपालिका कर्मचारी हा त्याच्यावर ठेवलेल्या आरोपांमधून दोषमुक्त झाला व त्याच्या प्रकरणी, सक्षम प्राधिकाऱ्याने उपदानाचे अधिदान मंजूर केले तर सदर अधिदान हे सेवानिवृत्तिच्या तारखेनंतरच्या लगेचच्या तारखेला देय झाले असे समजावे. तथापि, महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या बाबतीतील खात्यांतर्गत/न्यायालयीन चौकशी ही, त्याच्या मृत्युमुळे मागे घेण्यात आलेली असेल तर त्याबाबतीत व्याज दिले जाणार नाही.

८) उपरोक्त तरतूदी ह्या, सेवेमध्ये असतानाच मृत्यु पावलेल्या महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या बाबतीतही लागू होतील. (प्रभावाचा दिनांक १-६-१९८८ पासून).

निवृत्ति वेतन-१११२६ (म-२)

*** ५५ ब :--**

मासिक निवृत्तिवेतनाच्या विलंब झालेल्या अधिदानावर व्याज.

१) अधिदान देय असलेल्या तारखेपासून सहा महिन्यांच्या पुढे जर निवृत्तिवेतनाच्या अधिदानास विलंब झालेला असेल व अधिदानामधील विलंब हा, प्रशासकीय चुकीमुळे झाल्याचे निर्विवादपणे सिध्द झाले तर सहा महिन्यांच्या पुढील कालावधीच्या बाबतीत निवृत्तिवेतनाच्या रकमेवर प्रति वर्षी १० टक्के दराने व्याज देण्यात येईल. सहा महिन्यांचा कालावधी समाप्त झाल्यानंतरच्या महिन्याच्या एक तारखेपासून व्याज देय होईल. मात्र, सेवानिवृत्ति महानगरपालिका कर्मचाऱ्याने, याबाबतीत विहित केलेल्या कार्यपध्दती पूर्ण न केल्यामुळे अधिदानास विलंब झालेला असता कामा नये.

२) निवृत्तिवेतनाच्या विलंब झालेल्या अधिदानाचे प्रत्येक प्रकरण हे, संबंधित खाते स्वाधिकारात विचारात घेईल. प्रशासकीय चुकीमुळे निवृत्तिवेतनाच्या अधिदानास विलंब झाल्याची संबंधित खात्याची खात्री झाल्यास, सदर खाते, व्याजाचे अधिदान करण्याकरिता प्रमुख लेखापालांच्या खात्याकडे शिफारस करील.

३) उप-नियम (२) अन्वये केलेल्या खात्याच्या शिफारशी ह्या, प्रमुख लेखापालांच्या खात्याने स्विकारल्या तर, निवृत्तिवेतनावरील व्याजाचे अधिदान करण्याकरिता संबंधित खाते मंजूरी देईल.

४) जिथे व्याजाचे अधिदान अधिकृत केलेले आहे, अशा सर्व प्रकरणांमध्ये संबंधित खाते जबाबदारी निश्चित करील व मासिक निवृत्तिवेतनाच्या अधिदानामध्ये झालेल्या विलंबासाठी जबाबदार असलेल्या संबंधित कर्मचारीवृंदाकडून व्याजाची रक्कम वसूल करण्याची उचित कारवाई करील.

५) महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तिनंतर महानगरपालिकेने घेतलेल्या निर्णयाच्या परिणामी, सेवानिवृत्तिनंतर दिलेल्या निवृत्तिवेतनाच्या रकमेमध्ये -

(अ) अगोदर दिलेले निवृत्तिवेतन ज्या वेतनावर निर्धारित केलेले आहे त्या वेतनापेक्षा जास्त वेतन मंजूर झाले. **किंवा**

---

* स्थायी समितिचा ठराव क्र. १७७२ दि. २५ जानेवारी १९८८ महानगरपालिका ठराव क्र. ८५ दि. ५ मे १९८८ अन्वये नियम ५५ (ब) अंतर्भूत करण्यात आला आणि शासन ठराव क्र. बीएमसी/ १३८८/३४४५/सीआर/२८५/८८/-युडी-२१ दि. २२ सप्टेंबर १९८९ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

ब) संबंधित महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तिच्या दिनांकापूर्वीच्या तारखेपासून सदर नियमांच्या तरतूदी शिथिल करण्यात आल्या या कारणांमुळे वाढ झाली तर निवृत्तिवेतनाच्या थकबाकीवर व्याज दिले जाणार नाही.

६) निवृत्तिवेतनाचे अधिदान ज्या महिन्यामध्ये प्रत्यक्ष केलेले आहे त्या महिन्याच्या अगोदरच्या महिन्यापर्यंत, निवृत्तिवेतनाच्या विलंब झालेल्या अधिदानावरील व्याज देय होईल.

७) ज्या कर्मचाऱ्याची खात्यांतर्गत किंवा न्यायालयीन चौकशी सुरु आहे त्याच्या बाबतीत निवृत्तिवेतनाचे अधिदान केले जात नाही. तथापि, खात्यांतर्गत/न्यायालयीन चौकशी पूर्ण झाल्यानंतर जर महानगरपालिका कर्मचारी हा त्याच्यावर ठेवलेल्या आरोपांमधून दोषमुक्त झाला व त्याच्या प्रकरणी, सक्षम प्राधिकाऱ्याने निवृत्तिवेतनाचे अधिदान मंजूर केले तर सदर अधिदान हे, सेवानिवृत्तिच्या तारखेनंतरच्या लगेचच्या तारखेला देय झाले असे समजावे. तथापि, महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या बाबतीतील खात्यांतर्गत/न्यायालयीन चौकशी ही, त्याच्या मृत्युमुळे मागे घेण्यात आलेली असेल तर व्याज दिले जाणार नाही. (प्रभावाचा दिनांक १-६-१९८८ पासून).

***५६** : जेव्हा राहणीमानाच्या खर्चात बेसुमार वाढ होईल त्या कालावधीत या नियमांच्या तरतुदींनुसार मंजूर झालेल्या महिन्याच्या निवृत्तीवेतनामध्ये महानगरपालिका तिला योग्य वाटेल अशा तऱ्हेची तात्पुरती (हंगामी) वाढ (महागाई वाढ), याबाबतीत विहित करण्यात येणाऱ्या शर्तीसापेक्ष मंजूर करील. ही तात्पुरती (हंगामी) वाढ (महागाई वाढ) महानगरपालिका ठरविल त्या मुदतीपर्यंत चालू राहील. नियम क्रमांक ४१ खाली मंजूर केलेल्या जखम किंवा इजा निवृत्तिवेतनामध्ये या नियमांन्वये मंजूर झालेली तात्पुरती (हंगामी) वाढ (महागाई वाढ) अनुज्ञेय होणार नाही. (प्रभाव दिनांक १-१-१९८६ पासून).

---

* महानगरपालिका ठराव क्र. ३७९ दि. १ सप्टेंबर १९८९ अन्वये नियम ५६ सुधारण्यात आला आणि शासकीय ठराव क्र. बीएमसी-१३९३/६६७/सीआर/९३/-युडी-२७ दि. ३१ जानेवारी, २००० अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

## विभाग सहा

# मृत्यू-नि-सेवानिवृत्ति उपदान

*** ५७ :--**(१) ज्या महानगरपालिका कर्मचाऱ्याने अर्हकारी सेवेची पाच वर्षे पूर्ण केलेली आहेत आणि ज्याला सेवानिवृत्तीनंतर नियम ४८ अन्वये सेवा उपदान किंवा निवृत्ति वेतन अनुज्ञेय आहे त्याला, अर्हकारी सेवेच्या पूर्ण झालेल्या प्रत्येक सहा महिन्यांसाठी त्याच्या वेतनाच्या एक चतुर्थांश एवढे परंतु जास्तीत जास्त वेतनाच्या १६ $\frac{१}{२}$ पट, एवढे मृत्यू-नि-सेवानिवृत्ति उपदान मंजूर करण्यात यावे. मात्र, अशा प्रकारे द्यावयाची मृत्यू-नि-सेवानिवृत्ति उपदानाची रक्कम ही, कोणत्याही प्रकरणी, दोन लाख पन्नास हजार रुपयापेक्षा जास्त असता कामा नये.

(प्रभावाचा दिनांक १-४-१९९५ पासून)

(२) जर एखादा कायम किंवा हंगामी स्वरुपाचा महानगरपालिका कर्मचारी सेवेमध्ये असताना मृत्यू पावल्यास, नियम ५८ अन्वये,उपदानाची रक्कम स्विकारण्याचे अधिकार प्रदान केलेले आहेत, अशा व्यक्ती किंवा व्यक्तिंना खाली दर्शविलेल्या प्रमाणात उपदानाचे अधिदान करण्यात यावे, किंवा अशा प्रकारची व्यक्ती नसेल तर उपनियम (३) मध्ये नमुद केलेल्या पध्दतीने कुटुंबातील हयात व्यक्तींना अधिदान करण्यात यावे. मात्र, दि. १-२-१९८९ पूर्वी जर नियमांनुसार उपदानाचे अधिदान केलेले असेल तर, सदर उपदान प्राप्त करणाऱ्या व्यक्तीचे नुकसान (अहित) होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

---

* स्था. स. ठराव क्र. १४५७ दि. ५ फेब्रुवारी १९९२, मृत्युनि-सेवा उपदान एक लाख रुपयांपेक्षा जास्त नाही. प्रभाव दि. १-१-१९८६) म. न. पा. ठराव क्र. ९८० दि. २१ डिसेंबर १९९२ अन्वये, नियम क्र. ५७ सुधारण्यात आला आणि पुढे स्था. स. ठराव क्र. १७९२ दि. २१ मार्च १९९६, म. न. पा. ठराव क्र. २१२ दि. २५ जून १९९६ अन्वये नियम ५७ सुधारण्यात आला आणि शासन निर्णय क्र. बीएमसी/१३९३/६६७/सीआर/१२५/९३-युडी-२१, दि. ३१ जानेवारी २००० अन्वये त्याला निश्चिति देण्यात आली.

| अर्हकारी सेवेची पूर्ण झालेली वर्षे | : | उपदानाचे प्रमाण |
|---|---|---|
| एक) एक वर्षापेक्षा कमी. | : | वेतनाच्या दुप्पट |
| दोन) एक वर्ष किंवा जास्त परंतु पाच वर्षापेक्षा कमी | : | वेतनाच्या सहापट. |
| तीन) पाच वर्ष किंवा जास्त परंतु वीस वर्षापेक्षा कमी. | : | वेतनाच्या बारापट |
| चार) २० वर्षे किंवा जास्त | : | अर्हकारी सेवेच्या पूर्ण झालेल्या पूर्ण प्रत्येक सहा महिन्यांसाठी अर्धे वेतन, परंतु जास्तीत जास्त वेतनाच्या ३३ पट मात्र, उपदानाची रक्कम कोणत्याही प्रकरणी दोन लाख पन्नास हजार रुपयांपेक्षा जास्त होता कामा नये. (प्रभावाचा दिनांक १-४-१९९५). |

**टीप :--नियम** ५ (१) (फ) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरीही, नंतर कायम न केलेली हंगामी क्षमतेमधील सेवा देखील ही या नियमाच्या प्रयोजनार्थ, अर्हकारी सेवा समजण्यात येईल.

(३) एखादा महानगरपालिका कर्मचारी सेवेमध्ये असताना मृत्यु पावल्यास किंवा सेवानिवृत्तिनंतर त्याला उपदानाच्या रकमेचे अधिदान करण्यापूर्वी मृत्यू पावल्यास, नियम ५८ अन्वये उपदानाची रक्कम स्विकारण्याचे अधिकार प्रदान केलेल्या व्यक्ती किंवा व्यक्तींना उपनियम (१) किंवा (२) मध्ये निर्देशित केलेल्या रकमेपेक्षा जास्त नाही, एवढी उपदानाची रक्कम देण्यात यावी.

(एक) नियम ५८ च्या उप नियम (९) च्या (अ) (ब), (क), आणि (ड) मध्ये नमूद केल्याप्रमाणे, जर कुटुंबातील एक किंवा एकापेक्षा अधिक व्यक्ती हयात असतील तर अशा सर्व व्यक्तींना, विधवा मुलगी सोडून, सम प्रमाणात ही रक्कम देण्यात यावी.

(दोन) वर (एक) मध्ये नमूद केल्याप्रमाणे कुटुंबातील व्यक्ती हयात नसतील पण एक किंवा विधवा मुली असतील आणि/किंवा नियम क्र. ५८ च्या उप नियम (९) च्या बाब क्र. (इ), (फ), (ग), (ह) आणि (आय) प्रमाणे कुटुंबातील एक किंवा एकापेक्षा जास्त व्यक्ती हयात असतील तर अशा सर्व व्यक्तिंना हे उपदान सारख्या प्रमाणात वाटून देण्यात यावे.

(४) नियम क्र. ४१ मध्ये नमूद केलेल्या परिस्थितीत जर मृत्यू झाला असेल आणि नियम क्र. ४४ अन्वये कुटुंब निवृत्तिवेतन किंवा उपदान मंजूर करण्यात आले असेल तर या नियमान्वये उपदान देता येणार नाही. मात्र, अपवादात्मक परिस्थितीमध्ये, प्रकरणाच्या सर्व परिस्थितीचा विचार करुन, उप-नियम (१) मध्ये नमूद केलेल्या रकमेपेक्षा जास्त नाही एवढे उपदान महानगरपालिका मंजूर करु शकेल.

(५) नियम ४८ खाली जो म.न.पा. कर्मचारी निवृत्तिवेतन किंवा सेवा उपदान यास पात्र आहे असा कर्मचारी सेवेमधून निवृत्त झाल्यानंतर पाच वर्षाच्या आत मरण पावल्यास, व मृत्यू समयी, उप नियम (१) खाली त्याला मंजूर झालेले उपदान यासह सेवा उपदान किंवा निवृत्तिवेतन या सर्वाची त्याला मिळालेली प्रत्यक्ष रक्कम आणि त्याने अंशराशिकरण केलेल्या निवृत्तिवेतनाच्या कोणत्याही भागांचे अंशराशिकृत मूल्य हे, वेतनाच्या १ २ पटीपेक्षा कमी असेल तर जी तूट पडत असेल तेवढ्या रकमेचे उपदान उप-नियम (३) मध्ये नमूद केलेल्या व्यक्तिस किंवा व्यक्तिंना देण्यात यावे.

(६) या नियमाच्या प्रयोजनार्थ वेतन म्हणजे नियम ५ (१) (इ) मध्ये व्याख्या दिल्याप्रमाणे असणारे व म. न. पा. कर्मचारी सेवानिवृत्तिपूर्वी अगदी लगत अगोदर घेत असलेले वेतन होय. मात्र, म. न. पा. कर्मचाऱ्याच्या नोकरीच्या अखेरच्या दहा महिन्यांच्या कालावधीमध्ये दंड सोडून इतर कारणांकरिता, त्यांचे वेतन जर कमी केले असेल तर नियम क्र. ५ (१) (इ) मध्ये व्याख्या दिल्याप्रमाणे, सक्षम प्राधिकाऱ्यांच्या स्व-विवेकानुसार 'निवृत्तिवेतनार्ह वेतन' हे वेतन म्हणून समजण्यात यावे.

म. न. पा. कर्मचारी सेवानिवृत्तिपूर्वी किंवा त्याच्या मृत्यू लगत अगोदर वेतन व भत्त्यासह रजेवर असल्याने कामावर अनुपस्थित असेल तर, त्याला जे वेतन मिळाले असते ते वेतन उपदानाच्या रकमेच्या हिशेबासाठी धरण्यात यावे मात्र, प्रत्यक्ष न घेतलेल्या वेतनामधील वाढीमुळे उपदानांची रक्कम वाढणार नाही व, तो रजेवर गेला नसता तर उच्च पदावर स्थानापन्न किंवा हंगामी स्वरुपातील त्याची नियुक्ती पुढे चालू राहिली असती असे प्रमाणपत्र दिले असेल तरच, केवळ स्थानापन्नता किंवा हंगामी वेतनाचा फायदा देण्यात यावा.

७) म. न. पा. कर्मचाऱ्याला खालील बाबतीत या नियमान्वये उपदान देता येणार नाही. जर तो :--

अ) जो म. न. पा. कर्मचारी नोकरीतून बडतर्फ झाला आहे किंवा गैरवर्तणूक किंवा दिवाळे निघाल्यामुळे म. न. पा. च्या नोकरीतून ज्याला निवृत्त होण्यास सांगण्यात आले आहे किंवा

ब) अर्हकारी सेवेची ३० वर्षे पूर्ण होण्यापूर्वी अकार्यक्षमतेमुळे ज्याला म. न. पा. च्या नोकरीतून निवृत्त होण्यास भाग पाडले आहे.

अशी तरतूद आहे की, जर असा म. न. पा. कर्मचारी असमर्थतेमुळे वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारावर म. न. पा. च्या नोकरीतून निवृत्त झाला असता तर त्याला जे उपदान मिळाले असते त्या उपदानाच्या रकमेच्या २/३ एवढ्या रकमेपेक्षा जास्त नाही एवढे दयेचे (अनुकंपा) अनुदान त्याला नियम क्र. ४३ अनुसार देण्यात यावे.

(दिनांक १-१-१९८६ पासून सुधारित नियम ५७ प्रभाव्य होईल.)

**५८.** (१) एखाद्या महानगरपालिका कर्मचाऱ्याची कायम पदावर कायम स्वरुपाने नेमणूक झाल्यावर त्याने नियम क्र. ५७ च्या उप-नियम (२) व (४) याखाली मंजूर होणारे कोणतेही उपदान व नियम ५७ चा उप-नियम (१) व नियम ४८ अन्वये त्याला अनुज्ञेय असलेले, मृत्यूपूर्वी त्याला न दिलेले असे कोणतेही उपदान स्वीकारण्याचा अधिकार एक किंवा अधिक व्यक्तींना देण्यासाठी अशा व्यक्तींचे नामनिर्देशन (नॉमिनेशन) केले पाहिजे.

मात्र, अशा तऱ्हेने नामनिर्देशन करण्याच्या वेळी, सदर महानगरपालिका कर्मचाऱ्याला कुटुंब असेल तर, हे नामनिर्देशन त्याच्या कुटुंबामधील व्यक्ति सोडून, इतर कोणत्याहि व्यक्तीच्या किंवा व्यक्तिंच्या नावाने असता कामा नये.

(२) महानगरपालिका कर्मचाऱ्याने जर उप-नियम (१) अन्वये एकापेक्षा जास्त व्यक्तींचे नामनिर्देशन केले असेल तर, उपदानाची सर्व रक्कम अंतर्भूत होईल अशा तऱ्हेने प्रत्येक व्यक्तिस किती रक्कम देण्यात यावी हे त्याने सदर नामनिर्देशन प्रपत्रामध्ये नमूद केले पाहिजे.

(३) महानगरपालिका कर्मचाऱ्याने खालील गोष्टींची तरतूद सदर नामनिर्देशन प्रपत्रामध्ये करावी :--

(अ) एखाद्या कोणत्याही विशिष्ट नामनिर्देशन केलेल्या व्यक्तिच्या बाबतीत, जर ती व्यक्ति महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या अगोदर मृत पावली तर त्या व्यक्तिस रक्कम स्विकारण्यासाठी दिलेला अधिकार महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या कुटुंबामधील ज्या व्यक्तीकडे जाईल त्या व्यक्तीचे नाव त्याने दिले पाहिजे, किंवा जर त्याला कुटुंब नसेल तर, नामनिर्देशन पत्रामध्ये नमूद केलेल्या प्रमाणे ज्या व्यक्तिस हा अधिकार प्राप्त होईल त्या व्यक्तिचे नाव नमूद करावे.

(ब) कोणती आकस्मिक घटना घडल्यास हे नामनिर्देशन रद्द होईल. ती आकस्मिक परिस्थितीही त्याने त्यामध्ये नमूद करावयास हवी.

(४) ज्या महानगरपालिका कर्मचाऱ्याला कुटुंब नसेल त्याने अशा तऱ्हेने केलेले नामनिर्देशन हे नंतर त्याचे लग्न झाल्यावर रद्द म्हणून समजण्यात येईल.

(५) (अ) प्रत्येक नामनिर्देशनपत्र संबंधित प्रकरणाला योग्य असलेल्या परिस्थितीमध्ये, परिशिष्ट-सात मध्ये नमूद केलेल्या अ ते ड या प्रकारच्या प्रपत्रामध्ये असले पाहिजे.

(ब) महानगरपालिका कर्मचाऱ्याला कोणत्याही वेळी खाते प्रमुखांना लेखी सूचनापत्र पाठवून नामनिर्देशन रद्द करता येऊ शकेल. मात्र, महानगरपालिका कर्मचाऱ्याने त्या सुचना पत्रा बरोबरच या नियमान्वये नवीन केलेले नामनिर्देशनपत्र पाठविले पाहिजे.

(६) ज्याच्या बाबत नामनिर्देशनपत्रामध्ये उपनियम (३) च्या कंडिका (अ) खाली विशेष तरतूद केलेली नाही. अशी एखादी नामनिर्देशित व्यक्ती मृत्यू पावल्यावर लगेच किंवा त्या उपनियमाच्या कंडिका (ब) किंवा उप नियम (४) नुसार, ज्या कारणामुळे नामनिर्देशनपत्र, रद्द होते, अशी कोणतीही घटना घडल्यास, त्या महानगरपालिका कर्मचाऱ्याने खाते प्रमुखांना लेखी सूचनापत्र पाठवून रितसर हे नामनिर्देशनपत्र रद्द केले पाहीजे. या नियमानुसार केलेले नवीन नामनिर्देशनपत्र त्या बरोबरच पाठविले पाहीजे.

(७) महानगरपालिका कर्मचाऱ्याने या नियमानुसार केलेले प्रत्येक नामनिर्देशनपत्र व रद्द करण्याकरिता पाठविलेले प्रत्येक सूचना पत्र त्याने खाते प्रमुखांकडे पाठविले पाहिजे. सदर कर्मचाऱ्याकडून नामनिर्देशनपत्र आल्याबरोबरच लगेच खाते प्रमुखाने त्यावर सही करून मिळाल्याची तारीख टाकावी व हे नामनिर्देशनपत्र आपल्या ताब्यात सुरक्षित ठिकाणी ठेवावे.

(८) महानगरपालिका कर्मचाऱ्याने पाठविलेले प्रत्येक नामनिर्देशनपत्र आणि रद्द करण्याकरिता पाठविलेले प्रत्येक सूचना पत्र हे ज्या मुदतीसाठी ग्राह्य असेल त्या मुदतीसाठी ज्या दिवशी हे नामनिर्देशनपत्र खाते प्रमुखाने स्वीकारले असेल त्या तारखेपासून ते अंमलात येईल.

(९) या नियमाच्या प्रयोजनार्थ, कुटुंब या संज्ञेमध्ये महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या खालील नातलगांचा समावेश होईल :--

(अ) महानगरपालिका पुरुष - कर्मचाऱ्याच्या प्रकरणी, पत्नी.

(ब) महानगरपालिका स्त्री - कर्मचाऱ्याच्या प्रकरणी, पती.

(क) पुत्र.

(ड) अविवाहित किंवा विधवा मुली.

* (इ) १८ वर्षाखालील भाऊ व अविवाहित किंवा विधवा बहिणी (सावत्र भाऊ आणि सावत्र बहिणी यासह).

(फ) वडील.

(ग) आई.

** (ह) विवाहीत मुली आणि;

(आय) अगोदर मृत्यू पावलेल्या पुत्राची मुले.

टीप १ - (क) व (ड) यामध्ये सावत्र मुलांचा समावेश आहे.

टीप - २ दत्तक पुत्र किंवा कन्या यांनाही पुत्र किंवा कन्या म्हणून समजण्यात यावे.

मात्र औरस मुलांचा दर्जा प्राप्त होण्यासाठी महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या वैयक्तिक कायद्यानुसार अशा तऱ्हेने मुलाला किंवा मुलीला दत्तक घेणे हे सदर कायद्याने मात्र झालेले असले पाहिजे अन्यथा नाही.

---

** महानगरपालिका ठराव क्र. १३४०, दि. ८ डिसेंबर १९६० अन्वये टीप (ह) सुधारण्यात आली व नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. बीएमसी/५३६१/११४९३-क, दि. २५ एप्रिल, १९६१ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

* महानगरपालिका ठराव क्र. ३४६ दि. १२ ऑक्टोबर, १९६१ अन्वये टीप (ई) सुधारण्यात आली व शासकीय ठराव, नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. बीएमसी/५३६१/-३८३३०-क, दि. ६ फेब्रुवारी, १९६२ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

## * ५८ अ : निवृत्तिवेतनाच्या हयातभरच्या थकबाकीसाठी नामनिर्देशन

१) मुंबई महानगरपालिका निवृत्तिवेतन नियम (१९५३) लागू असलेल्या महानगरपालिका कर्मचारी त्याच्या सेवानिवृत्तीच्या तारखेपूर्वी कोणत्याही वेळी एखाद्या कायम पदावर कायम स्वरुपाने नियुक्ति झाल्याबरोबर त्या महानगरपालिका निवृत्तिवेतन धारकाच्या मृत्युनंतर, नामनिर्देशनाच्या तारखे रोजी, त्या तारखेपूर्वी किंवा तद्नंतर निवृत्तिवेतनाच्या थकबाकीपोटी त्याला/तिला देय असलेल्या सर्व रकमा आणि निवृत्तिवेतन धारकाच्या मृत्युच्या लगत अगोदर अनादेय राहिलेल्या रकमा प्राप्त करण्यासाठी त्याची नामनिर्देशित व्यक्ती म्हणून इतर कोणत्याही व्यक्तिला नामनिर्देशित करु शकतो आणि त्यासाठी तो/ती काम करीत असलेल्या खात्याच्या  खाते प्रमुखांकडे प्रपत्र - एक्स (प्रपत्र फ) मध्ये विहित केलेल्या प्रपत्राच्या तीन प्रतींमध्ये नामनिर्देशन प्रपत्र सादर करु शकतो.

२) उपरोक्त पोट - नियम (१) अन्वये नामनिर्देशन प्रपत्र प्राप्त झाल्यानंतर खात प्रमुख परिशिष्ट-एक्स (प्रपत्र फ) मध्ये कर्मचाऱ्यांच्या नमूद केलेल्या तपशिलांची आस्थापनेच्या अभिलेखांशी पडताळणी करून घेतील आणि खाते प्रमुखांनी यथोचितरित्या साक्षांकित केलेल्या किंवा तसे करण्यासाठी सक्षम असलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याने साक्षांकित केलेल्या नामनिर्देशित प्रपत्राची तिसरी प्रत, संबंधित कर्मचाऱ्याकडून त्याबाबत पोच घेऊन, कर्मचाऱ्याला परत करतील. खाते प्रमुख नामनिर्देशन प्रपत्राची दुसरी प्रत अभिलेखासाठी (जतन करण्यासाठी) स्वत:च्या कार्यालयात ठेवून घेतील तर सदर प्रपत्राची मूळ प्रत सुरक्षित ठेवण्यासाठी प्रमुख लेखापालांच्या खात्याच्या मासिक निवृत्तिवेतन मंजुरी उपविभागाला (मुख्यालय) पाठवतील.

३) महानगरपालिकेच्या नोकरीमधून सेवानिवृत्त झालेला आणि निवृत्तवेतन घेणारा महानगरपालिका निवृत्तिवेतनधारक वरील पोट-नियम (१) नुसार एखाद्या व्यक्तिला त्याची स्वत:ची नामनिर्देशित व्यक्ती म्हणून नामनिर्देशित करू शकतो आणि त्यासाठी निवृत्तिवेतनधारक निवृत्तिवेतन घेत असलेल्या संबंधित निवृत्तवेतन अधिदान मंजुरी लेखा शाखेकडे परिशिष्ट - एक्स (प्रपत्र फ) मध्ये विहित केलेल्या प्रपत्राच्या तीन प्रतीमध्ये नामनिर्देशन प्रपत्र सादर करू शकतो. निवृत्तिवेतन वितरण प्राधिकारी, परिशिष्ट - एक्स (प्रपत्र फ) मध्ये निवृत्तिवेतनधारकाच्या नमूद केलेल्या तपशिलाची उपलब्ध असलेल्या अभिलेखांशी पडताळणी करून घेतील आणि लेखा शाखेच्या प्रभारी प्रमुख सहायक लेखापालांनी यथोचितरित्या साक्षांकित केलेल्या नामनिर्देशन. प्रपत्रची तिसरी प्रत, संबंधित

---

* स्थायी समितिचा ठराव क्र. ७७१ दि. २५ जुलै १९८६ व महानगरपालिका ठराव क्र. ६९२ दि. २५ नोव्हेंबर १९८६ अन्वये नवीन नियम ५८अ अंतर्भूत करण्यात आला.

निवृत्तिवेतनधारकाकडून त्याबाबत पोच घेऊन, निवृत्तिवेतनधारकाला परत करतील. सदर नामनिर्देशन प्रपत्राची दुसरी प्रत अभिलेखासाठी (जतन करण्यासाठी) खात्याला पाठवितील तर सदर प्रपत्राची मूळ प्रत संबंधित लेखा - शाखा सुरक्षित ताब्यात ठेऊन घेईल.

४) महानगरपालिका कर्मचारी / निवृत्तिवेतनधारक कोणत्याही वेळी, खाते प्रमुख किंवा प्रमुख लेखापालाच्या खात्याचे मुख्यालय अथवा निवृत्तिवेतनधारक मासिक निवृत्तिवेतन घेत असलेली लेखा शाखा यथास्थिती, यांना लेखी स्वरूपात सूचना पत्र (नोटीस) पाठवून नामनिर्देशन रद्द करू शकतात. मात्र अशा महानगरपालिका कर्मचाऱ्याने / निवृत्तवेतनधारकाने अशा सूचना पत्रासोबत (नोटीशी) या नियमानुसार केलेले नवीन नामनिर्देशन प्रपत्र पाठविले पाहिजे. संबंधित कर्मचारी/- निवृत्तिवेतनधारकाच्या अगोदर नामनिर्देशित व्यक्ती मृत्यु पावल्यास निवृत्तिवेतनधारकाने वर विहित केलेल्या पद्धतीनेच नामनिर्देशन बदलाचे सूचना पत्र (नोटीस) सादर करावे.

५) नामनिर्देशन प्रपत्रावर किंवा नवीन नामनिर्देशन प्रपत्रावर अथवा नामनिर्देशन बदलाच्या सूचना पत्रावर निवृत्तिवेतनधारकाने स्वाक्षरी केली पाहिजे निवृत्तिवेतनधारक निरक्षर असल्यास दोन साक्षीदारांच्या याबाबतीतील प्रतिज्ञा पत्रावरदेखील स्वाक्षऱ्या घेऊन त्यांच्या उपस्थितीत सदर निवृत्तिवेतनधारकाने उपरोक्त प्रपत्रांवर आपल्या अंगठ्याचा ठसा लावावा.

६) वरील नियमानुसार केलेले प्रत्येक नामनिर्देशन प्रपत्र किंवा नवीन नामनिर्देशन प्रपत्र अथवा नामनिर्देशन बदलाचे सूचना पत्र हे खाते प्रमुख किंवा प्रमुख लेखापालांच्या खात्याचा निवृत्तिवेतन मंजुरी उपविभाग अथवा लेखा शाखा, यथास्थिती, यांना मिळाल्याच्या तारखेपासून प्रभाव्य असेल.

७) या नियमानुसार केलेले व खाते प्रमुख किंवा प्रमुख लेखापालांचे कार्यालय यांनी स्वीकारलेले नामनिर्देशन प्रपत्र हे निवृत्तिवेतनधारकाच्या मृत्युनंतर अनादेय राहिलेली निवृत्तिवेतनाची थकबाकीची रक्कम स्वीकारण्यासाठी नामनिर्देशित केलेल्या व्यक्तिबाबतीत (बाजूने), इतर सर्व व्यक्तिंना वगळून, निर्णायक पुरावा असेल.

८) या नियमातील तरतुदी कुटुंब निवृत्तिवेतनधारकाच्या बाबतीतदेखील योग्य त्या फेरफारांसह लागू होतील आणि त्यामुळे कुटुंब निवृत्तिवेतनधारक या नियमातील तरतुदींनुसार त्याच्या / तिच्या नामनिर्देशित व्यक्तिचे नामनिर्देशन करू शकतील.

## विभाग सात

# कुटुंब निवृत्तिवेतन

*** ५९.** (१) उपनियम (८) मध्ये वर्णन केलेली परिस्थिती सोडून, उप-नियम (२) मध्ये निर्देश केलेल्या रक्कमेपेक्षा जास्त नाही एवढ्या रकमेचे कुटुंब निवृत्ति वेतन, महानगरपालिकेचा एखादा कर्मचारी २० वर्षाची अर्हकारी सेवा पूर्ण झाल्यावर मृत्यू पावल्यास आणि अपवादात्मक परिस्थितीमध्ये २० वर्षांपेक्षा कमी परंतु १० वर्षांपेक्षा कमी नाही इतकी अर्हकारी सेवा झाल्यावर (मृत्यू पावल्यास) त्याच्या कुटुंबियांना खालील मुदतीसाठी मंजूर करता येईल :--

निवृत्ति वेतन १० वर्षांच्या कालावधीसाठी दिले जाईल. मात्र महानगरपालिका कर्मचारी सेवानिवृत्तिनंतर किंवा नोकरीमध्ये असताना मृत्यू पावल्यास, महानगरपालिका मृत कर्मचारी ज्या तारखेला सेवानिवृत्त झाला असेल त्या तारखेपासून किंवा नियमित कालावधीमध्ये तो नियत वयोमानानुसार निवृत्ति वेतनावर सेवानिवृत्त झाला असता त्या (तारखेपासून) पूढे पाच वर्षाच्या कालावधीपेक्षा जास्त, कोणत्याही प्रकरणी, कुटुंब निवृत्ति वेतनाच्या अधिदानाचा कालावधी असता कामा नये.

**(२) प्रति मास रु. १५०/- ही कमाल मर्यादा आणि प्रति मास रु. ४०/- या किमान मर्यादेसापेक्ष व उप-नियम (८) च्या तरतुदीसापेक्ष कुटुंब निवृत्ति वेतनाची रक्कम खालीलप्रमाणे असेल :--

---

* महानगरपालिका ठराव क्र. २६६ दि. १३ मे १९५९ अन्वये आणि शासकीय ठराव, नगर विकास आणि सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. ५३५९/३७२४२ दि. ३ ऑगस्ट, १९६० अन्वये नियम ५९ चा उप-नियम (१) सुधारण्यात आला.

* महानगरपालिका ठराव क्र. ३७५, दि. २४ जून, १९६५ अन्वये नियम ५९ चे उप-नियम (१) व (२) सुधारण्यात आले व शासकीय ठराव, नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. बीएमसी/५८६५/४५९३९-ग, दि. ७ डिसेंबर, १९६५ अन्वये त्यांना निश्चिती देण्यात आली.

** महानगरपालिका ठराव क्र. ४३, दि. ७ मे १९७३ अन्वये आणि शासकीय ठराव, नगर विकास, सार्वजनिक आरोग्य आणि गृहनिर्माण विभाग क्र. बीएमसी-१०७३-५२४५४-क, दि. २४ ऑगस्ट, १९७३ अन्वये नियम ५९ (२) सुधारण्यात आला. दि. १ एप्रिल, १९७२ पासून अंमल देण्यात आला.

(अ) अधिकाऱ्याला नोकरीमध्ये असताना मृत्यू आल्यास, त्याच्या मृत्यूच्या तारखेनंतरच्या तारखेला तो सेवानिवृत्ति झाला असता तर त्याला जे नियत वयोमान निवृत्ति वेतन अनुज्ञेय झाले असते, त्या रक्कमेच्या निम्मे एवढे निवृत्ति वेतन द्यावे.

(ब) नोकरीमधून सेवानिवृत्ति झाल्यानंतर मृत्यू आल्यास जखम किंवा इजा निवृत्तिवेतन किंवा अनुकंपा निवृत्तिवेतन सोडून, त्याला सेवानिवृत्त होताना जे निवृत्तिवेतन मंजूर झाले असेल त्या रक्कमेच्या निम्मे एवढे कुटुंबनिवृत्ति वेतन द्यावे.

मात्र, महानगरपालिका मृत कर्मचाऱ्याला तो नोकरीमधून सेवानिवृत्त होण्याच्या वेळी जे निवृत्तिवेतन मंजूर झाले असेल त्या निवृत्तिवेतनाच्या पूर्ण रक्कमेपेक्षा किंवा तो नोकरीमध्ये असताना मृत्यू पावल्यास, त्याच्या मृत्यूनंतरच्या तारखेनंतर जर तो नियतवयोमानानुसार निवृत्तिवेतनावर सेवानिवृत्त झाला असता तर त्याला जे निवृत्तिवेतन अनुज्ञेय झाले असते त्यापेक्षा कोणत्याही प्रकरणी किमान निवृत्तिवेतन हे जास्त असता कामा नये.

आणखी असे की, एखाद्या महानगरपालिका कर्मचाऱ्याने आपल्या मृत्यूपूर्वी, आपल्या सर्वसाधारण निवृत्तिवेतनाचा काही भाग जर अंशराशिकृत केला असेल तर त्याने मृत्यूपूर्वी सर्वसाधारण निवृत्तिवेतनाचा काही भाग अंशराशिकृत केला आहे ही वस्तुस्थिती लक्षात न घेता, प्रथम कुटुंब निवृत्तिवेतनाच्या रक्कमेचा हिशेब करावा व असा हिशेब केल्यावर जी रक्कम येईल, त्यामधून अंशराशिकरण केलेल्या निवृत्तिवेतनाची रक्कम वजा करावी.

(३) या नियमाच्या प्रयोजनार्थ, 'कुटुंब' या संज्ञेच्या अर्थ नियम क्रमांक ५८ च्या उप-नियम (९) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे घ्यावा.

(४) (खालील व्यक्तींना) या नियमान्वये निवृत्तिवेतन देता येणार नाही :--

(अ) निर्वाह आधारासाठी अशी व्यक्ती सदर मृत महानगरपालिका कर्मचाऱ्यावर अवलंबून होती अशा तऱ्हेचा योग्य तो पुरावा सादर केल्याशिवाय, उप-नियम (५) च्या कंडिका (ब) मध्ये नमूद केलेली व्यक्ति.

(ब) महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या कुटुंबामधील अविवाहित स्त्रीने विवाह केल्यास, अशा स्त्रीस.

(क) महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या कुटुंबामधील विधवा स्त्रीने पुनर्विवाह केल्यास अशा स्त्रीस.

(ड) महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या भावास तो १८ वर्षांचा झाल्यावर.

(इ) महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या कुटुंबापैकी नसलेल्या इसमास.

* (५) उपनियम (६) अन्वये कोणतेही ग्राह्य नामनिर्देशन केलेले नसेल तर :--

(अ) या नियमान्वये मंजूर झालेले निवृत्तिवेतन खालील व्यक्तीस देण्यात यावे :--

(एक) महानगरपालिका मृत कर्मचारी पुरुष असल्यास त्याच्या बाबतीत हयात असलेल्या सर्वात मोठ्या विधवेस किंवा महानगरपालिका मृत कर्मचारी स्त्री असल्यास तिच्या बाबतीत तिच्या पतीस.

**टीप** : वर पोटकलम (अ) (एक) मध्ये आलेले ''हयात असलेली सर्वात मोठी विधवा'' हे शब्द हयात असलेल्या विधवांच्या वयाप्रमाणे न घेता, महानगरपालिका कर्मचाऱ्यांशी लग्न झाल्याच्या तारखेनुसार ज्येष्ठत्व, या अर्थाने घ्यावेत.

(दोन) विधवा किंवा पती नसेल तर यथास्थिती, हयात असलेल्या सर्वात मोठ्या पुत्रास.

(तीन) वर (१) आणि (२) यामधील कोणतीही व्यक्ति नसल्यास, हयात असलेल्या सर्वात मोठ्या अविवाहित कन्येस.

(चार) वरीलपैकी कोणीही नसले तर, सर्वात मोठ्या विधवा मुलीस, आणि

(ब) कंडिका (अ) अन्वये निवृत्तिवेतन देता येत नसेल तर, हे निवृत्तिवेतन खालील व्यक्तींना द्यावे :--

(एक) वडिलांना,

(दोन) वडील नसल्यास आईस.

---

* महानगरपालिका ठराव क्र. २७९, दि. २२ जून, १९५९ अन्वये नियम ५९ (५) सुधारण्यात आला आणि शासकीय ठराव, नगर विकास, आणि सार्वजनिक आरोग्य खाते क्र. बीएमसी/५३५९/क दि. १३ मे, १९६० अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

(तीन) वडील आणि आई नसेल तर, १८ वर्षांखालील सर्वात मोठ्या हयात असलेल्या भावास.

(चार) यापैकी कोणीही नसेल, तर, हयात असलेल्या सर्वात मोठ्या विवाहित बहिणीस.

(पाच) वर १ ते ४ मध्ये नमूद केलेल्या व्यक्तींपैकी कोणीही नसेल तर, हयात असलेली सर्वांत मोठी विधवा बहीण.

* (६) ज्या महानगरपालिका कर्मचाऱ्याने नोकरीची २० वर्षे पूर्ण केली आहेत. त्याने या नियमान्वये त्याला मंजूर होणारे निवृत्तिवेतन हे त्याने नमूद केलेल्या कोणत्याही क्रमानुसार त्याच्या कुटुंबामधील कोणत्याही व्यक्तीस देण्यात यावे, अशी इच्छा दर्शविली तर, त्याने ह्या हेतुसाठी परिशिष्ट सातमधील प्रपत्र ई मध्ये नामनिर्देशन पत्र भरावे. आणि त्यामध्ये त्याच्या कुटुंबातील कोणत्या व्यक्तींना कोणत्या क्रमाने निवृत्तिवेतन देण्यात यावे व कोणत्या मर्यादेपर्यंत ते कार्यक्षम राहील हे नमूद करावे. मात्र निवृत्तिवेतन मंजूर करण्याच्या वेळी, संबंधित व्यक्तींनी उपनियम क्र. (४) मध्ये दिलेल्या आवश्यकता पूर्ण केल्या तरच, अशा नामनिर्देशन पत्रानुसार निवृत्तिवेतन देण्यात यावे. जर सदर उपनियमामध्ये दिलेल्या आवश्यकता संबंधित व्यक्तींनी पूर्ण केल्या नाहीत, तर निवृत्तिवेतन हे त्या मागणी क्रमातील नंतरच्या व्यक्तीस देण्यात येईल. या उप-नियमांतील तरतुदींखाली असलेल्या नामनिर्देशन पत्राच्या बाबतीत नियम ५८ उपनियम (५) (ब), (७) आणि (८) च्या तरतूदी लागू होतील.

(७) (अ) या नियमान्वये मंजूर झालेले निवृत्तिवेतन महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या कुटुंबातील एकापेक्षा जास्त व्यक्तीस एकाच वेळी देण्यात येणार नाही.

(ब) या नियमान्वये मंजूर झालेले निवृत्तिवेतन, प्रापकाच्या मृत्यूमुळे किंवा

---

* स्थायी समिती ठराव क्र. १६०३ दि. २४ नोव्हेंबर, १९५५ अन्वये नियम ५९ (६) सुधारण्यात आला आणि महानगरपालिका ठराव क्र. १००९ दि. ५ डिसेंबर, १९५५ आणि शासकीय ठराव क्र. बीएमसी-५९५५-इ, दि. २० डिसेंबर, १९५५, स्थानिक स्वराज्य शासन आणि सार्वजनिक आरोग्य खाते अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली, आणि महानगरपालिका ठराव क्र. २६६, दि. १३ मे, १९५९ व शासकीय ठराव, नगर विकास आणि सार्वजनिक आरोग्य खाते क्र. ३७२४२-क दि. ३ ऑगस्ट, १९६० अन्वये तो पुढे आणखी सुधारण्यात आला.

लग्नामुळे किंवा इतर कारणांमुळे उपनियम (१) मध्ये नमूद केलेला कालावधी संपण्यापूर्वी, ज्याला ही रक्कम द्यावयाची होती त्याला देता येत नसेल तर हे निवृत्तिवेतन उपनियम (५) मध्ये नमूद केलेल्या मागणी क्रमातील त्या नंतरच्या व्यक्तीस किंवा उपनियम (६) अन्वये केलेल्या नामनिर्देशन पत्रात दाखविलेल्या, या नियमाच्या इतर तरतुदी पूर्ण करणाऱ्या, मागणी क्रमातील नंतरच्या व्यक्तीस, यथास्थिती, देण्यात येईल.

(८) नियम क्रमांक ४४ खाली जर कुटुंब निवृत्तिवेतन मंजूर झाले असेल तर त्या प्रकरणात, या नियमान्वये निवृत्तिवेतन मंजूर करता येणार नाही. मात्र, नियम क्रमांक ४४ नुसार मंजूर झालेले निवृत्तिवेतन जर या नियमान्वये अनुज्ञेय होणाऱ्या निवृत्तिवेतनापेक्षा कमी असेल तर या नियमान्वये अनुज्ञेय होणारे निवृत्तिवेतन आणि नियम क्रमांक ४४ अन्वये मंजूर झालेले निवृत्तिवेतन या दोहोंमधील जो फरक असेल तेवढी रक्कम या नियमान्वये देता येईल.

(९) सर्वसाधारण निवृत्तिवेतन मंजूर करण्याबाबत ज्याप्रमाणे भविष्य काळातील चांगली वागणूक ही अपेक्षित आहे, त्याचप्रमाणे या नियमाखाली मंजूर करण्यात येणाऱ्या प्रत्येक निवृत्तिवेतनाच्या बाबतीतही हे निवृत्तिवेतन घेणाऱ्या व्यक्तीची वागणूक चांगली असली पाहिजे हे अभिप्रेत आहे. ज्याला हे निवृत्तिवेतन द्यावयाचे आहे अशा व्यक्तीस एखाद्या गंभीर स्वरुपाच्या गुन्ह्यामुळे अपराधी ठरविले असेल तर किंवा गंभीर स्वरुपाच्या गैरवर्तणुकीमुळे तो दोषी ठरला असेल तर असे निवृत्तिवेतन किंवा त्याचा कोणताही भाग सक्षम प्राधिकारी, स्वविवेकानुसार, द्यावयाचे नाकारू शकेल किंवा मागे घेऊ शकेल आणि अशा बाबतीत त्याचा निर्णय अंतिम म्हणून समजण्यात येईल.

# विभाग आठ

# निवृत्तीवेतनाचे अधिदान

**६०.** नियम क्रमांक ६१ मध्ये अंतर्भूत होणारी प्रकरणे सोडून, ज्या तारखेपासून निवृत्तीवेतन धारकाची महानगरपालिकेमधील नोकरी संपुष्टात येईल त्या तारखेपासून त्याला निवृत्तीवेतन देण्यास सुरुवात होईल.

मात्र महानगरपालिका कर्मचारी हा नोकरीमधून सेवानिवृत्त झाल्यानंतर, विशेष परिस्थितीत, बऱ्याच कालावधीनंतर त्याला जे निवृत्तीवेतन मंजूर केले असेल ते निवृत्तीवेतन, हे मंजूर करणारा प्राधिकारी अन्यथा काही आदेश देत नसेल तर, मंजुरी दिलेल्या तारखेपासून देण्यात यावे.

**६१.** जखम किंवा इजा निवृत्तीवेतन हे जखम किंवा इजा झाली असेल त्या तारखेपासून देण्यात यावे, आणि नियम क्रमांक ४४ खाली देण्यात येणारे कुटुंब निवृत्तीवेतन हे महानगरपालिका कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्याच्या तारखेपासून देण्यात यावे, मात्र –

(१) जखम किंवा इजा निवृत्तीवेतन यासाठी अर्ज करण्यास बराच विलंब झाला असल्यास, हे निवृत्तीवेतन, अपवादात्मक परिस्थितीत, सक्षम प्राधिकाऱ्याने अन्यथा आदेश दिला नसेल तर, या प्रकरणामधील वैद्यकीय अहवालाच्या तारखेपासून देण्यात येईल, आणि

(२) नियम क्र. ४४ अन्वये देण्यात येणाऱ्या कुटुंब निवृत्तीवेतनासाठी अर्ज करण्यास दीर्घ स्वरुपाचा विलंब झाला असेल तर, महानगरपालिका ठरवील त्या तारखेपासून हे निवृत्तीवेतन देण्यात यावे.

**६२.** मंजूर करणाऱ्या आदेशामध्ये अन्यथा, कोणत्याही प्रकरणामध्ये अशी स्पष्टपणे तरतूद केली नसेल तर, निवृत्तीवेतन निवृत्तीवेतनधारकाच्या मृत्यूच्या दिनांकासह, त्या दिनांकापर्यंत देण्यात यावे.

जॉब - ११११६ (म. २)

*६३. महानगरपालिका आयुक्तांद्वारे वेळोवेळी विहित करण्यात येणाऱ्या कार्यपध्दतीनुसार निवृत्ती वेतनासह उपदानाचे अधिदान करण्यात येईल.

टीप :- निवृत्ती वेतनधारकांच्या सुविधेकरिता दि. १-४-८३ पासून ठराविक बँकेद्वारा निवृत्ती वेतनाचे अधिदान करण्याची महानगरपालिका आयुक्तांद्वारे विहित करण्यात आलेली कार्यपध्दती अधिकृत समजण्यात आलेली आहे.

(प्रभावाचा दि. १-४-१९८३).

**६४.** निवृत्तीवेतन किंवा उपदान या बाबतीतील कोणतीही रक्कम कोणाही व्यक्तीस द्यावयाची असेल आणि अशी व्यक्ती, दंडाधिकारी यांच्या दाखल्यानुसार, वेडी व्यक्ती म्हणून ठरविली गेली असेल, तर त्या बाबतीत, भारतीय अधिनियमामध्ये (इंडियन ल्युनसी ॲक्ट) नमूद केलेल्या पध्दतीप्रमाणे कार्यवाही करावी.

---

* प्रशासकांचा (स्थायी समिती) ठराव क्र. १५७७ दि. १६ मार्च १९८५, प्रशासकांचा (महानगरपालिका) ठराव क्र. १६६२ दि. २७ मार्च १९८५ अन्वये नियम ६३ सुधारण्यात आला आणि शासन ठराव क्र. बीएमसी/१३८५/४०१४/युडी-३ दि. १२ मे १९८६ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

# विभाग नऊ

# अंशराशिकरण

***६५ (अ)**

सेवानिवृत्तिवेतनाच्या एक तृत्तियांशापेक्षा अधिक नसलेला (म्हणजेच, अतिरिक्त सेवानिवृत्तिवेतन किंवा हंगामी वाढ वगळून मूळ सेवानिवृत्तिवेतन) भाग म्हणून ठोस अधिदानासाठी सक्षम प्राधिकारी अंशराशिकरणासाठी मंजूर करू शकतात.

(ब) निवृत्तिवेतनाच्या कोणत्याही भागाचे अंशराशिकरण ही हक्काची बाब नसून दिलेली सवलत आहे, व सक्षम प्राधिकारी कोणत्याही प्रकरणी, कोणतीही कारणे न देता, स्वविवेकानुसार, अंशराशिकरण नाकारू शकतील.

** (क) जो कर्मचारी महानगरपालिकेकडून अंशत: व शासनाकडून अंशत: निवृत्तिवेतन घेत असेल त्याच्या प्रकरणी, वर उप-नियम (अ) अन्वये निवृत्तिवेतनाच्या कमाल रकमेचे जे अंशराशिकरण करता येऊ शकेल ते खालील, निर्बंधासापेक्ष असेल :--

(१) शासनाकडून मिळणाऱ्या निवृत्तिवेतनाच्या भागाची अंशराशिकरण केलेली रक्कम आणि महानगरपालिकेकडून मिळणाऱ्या निवृत्तिवेतनाच्या भागाची अंशराशिकरण केलेली रक्कम या दोहोंची एकूण रक्कम खालील रक्कमेपेक्षा जास्त होता कामा नये –

(एक) ज्या कर्मचाऱ्याचे निवृत्तिवेतन, शासकीय सुधारित निवृत्तिवेतन नियमानुसार विनियमित केलेले आहे त्याच्या प्रकरणी, एकूण निवृत्तिवेतनाच्या एकतृतीयांश इतकी रक्कम.

---

* स्थायी समितीचा ठराव क्र. १८५४ दि. १२ मार्च १९८६, महानगरपालिका ठराव क्र. २४५ दि. १४ जुलै १९८६ अन्वये नियम ६५ (अ) सुधारण्यात आला आणि शासन ठराव क्रमांक बीएमसी/ १३८६/१९५५/सीआर-४७३/८६/युडी-३ दिनांक ३ जानेवारी १९८९ अन्वये निश्चिती देण्यात आली.

** स्थायी समिती ठराव क्र. १६०३, दि.२४ नोव्हेंबर, १९५५ अन्वये कंडिका (क) अंतर्भूत करुन नियम ६५ सुधारण्यात आला, आणि महानगरपालिका ठराव क्र. १००९ दि. ५ डिसेंबर, १९५५ आणि शासकीय ठराव, स्थानिक स्वराज्य शासन आणि सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. बीएमसी/५९५५-ई, दि. २० डिसेंबर १९५५ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

**परिशिष्ट आठ** मधील सूचनांकडे वैद्यकीय मंडळाचे मार्गदर्शना करिता लक्ष वेधण्यात येत आहे.

(दोन) ज्या कर्मचाऱ्याचे निवृत्तिवेतन शासकीय जुन्या निवृत्तिवेतन-नियमांनुसार विनियमित केलेले आहे, त्याच्या प्रकरणी, महानगरपालिकेकडून मिळणाऱ्या निवृत्तिवेतनाच्या एकृतृतीयांश इतकी रक्कम अधिक शासनाकडून मिळणाऱ्या निवृत्तिवेतनाच्या १/२ एवढी रक्कम.

(क) (२) - वगळण्यात आला.

*६६ अ

परिशिष्ट 'पाच' किंवा 'पाच अ' मधील ज्याप्रमाणे बाब असेल त्याप्रमाणे-विहित नमुन्यामध्ये अंशराशिकरणासाठी अर्ज करावे लागतील व अर्जदाराला सेवानिवृत्तिवेतनाच्या अंशराशिकरण करु इच्छिणाऱ्या भागाचा निर्देश करावा लागेल आणि अंशराशिकरण करावयाच्या त्याच्या इच्छेप्रमाणे एक तृत्तियांश सेवानिवृत्तिवेतनाच्या कमाल मर्यादा किंवा अशा कमी मर्यादेचा निर्देश करावा लागेल. अंशराशिकरण करावयाच्या सेवानिवृत्तिवेतनाचा भाग अपूर्णांकात रुपयाचा भाग आला, तर अंशराशिकरणासाठी असा रुपयाचा भाग दुर्लक्षित करण्यात येईल.

**(ब)** अंशराशिकरणासाठीचा अर्ज खातेप्रमुखांमार्फत सादर केला पाहिजे, खातेप्रमुख खालील माहितीसह सदर अर्ज प्रमुख लेखापाल यांच्याकडे पाठवतील :

(१) निवृत्तिवेतन पट क्रमांक, (२) जन्म दिनांक, (३) निवृत्तिवेतनाची रक्कम, (४) अगोदरच अंशराशिकरण केलेली रक्कम, असेल तर, (५) निवृत्तिवेतनाचा प्रकार, आणि, (६) सेवानिवृत्तिचा दिनांक,

**(क)** प्रमुख लेखापाल हे नियम क्रमांक ६९ मध्ये विहित केलेल्या पध्दतीनुसार, अंशराशिकरणानंतर, अधिदान करावयाची ठोक रक्कम काढतील व या बाबतीत आवश्यक असलेल्या त्यांच्या प्रमाणपत्रासह सदर कागदपत्र सक्षम प्राधिकाऱ्याकडे पाठवतील.

---

* स्थायी समितीचा ठराव क्र. १८५४ दि. १२ मार्च १९८६, महानगरपालिका ठराव क्र. २४५ दि. १४ जुलै १९८६ अन्वये नियम ६६ (अ) सुधारण्यात आला आणि शासन ठराव क्रमांक बीएमसी/१३८६/१९५५/सीआर-४७३/८६/युडी-३ दिनांक ३ जानेवारी १९८९ अन्वये निश्चिती देण्यात आली.

**टिप** :-- वैद्यकीय मंडळाचे त्यांच्या मार्गदर्शनाकरिता परिशिष्ट आठ मध्ये नमूद केलेल्या सूचनांकडे लक्ष वेधण्यात येत आहे.

जॉब - ११११६ (म. २)

* **६७ अ**

नियत वयोमानानुसार निवृत्तिवेतन, अथवा, पूर्णसेवा निवृत्तिवेतन (मुदतपूर्व स्वेच्छा सेवानिवृत्ति योजनेखालील स्वेच्छा निवृत्तिवेतनासह) अथवा भरपाई निवृत्तिवेतन किंवा खात्यांतर्गत अथवा न्यायिक कार्यवाही पूर्ण होऊन त्याबाबत अंतिम आदेश दिल्यानंतर संपूर्णपणे अथवा, अंशत: निवृत्तिवेतन अनुज्ञेय असलेल्या म. न. पा. कर्मचाऱ्याने, त्याच्या सेवासमाप्तीच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत अथवा, न्यायिक किंवा खात्यांतर्गत कार्यवाही चालू असलेल्या कर्मचाऱ्याच्याबाबतीत अंतिम आदेश दिल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत परिशिष्ट पाचमध्ये विहित केलेल्या प्रपत्रामध्ये अंशराशिकरणासाठी अर्ज केल्यास, नियम ७० (अ) अन्वये आवश्यक असलेली वैद्यकीय तपासणी त्याला लागू होणार नाही. त्याचप्रमाणे, मुंबई महानगरपालिका भविष्य निर्वाह निधी नियम अथवा, मुंबई महानगरपालिका निवृत्तिवेतन नियम (१९५३) चा विकल्प पूर्वलक्षी प्रभावाने निवडण्याची अनुमति देण्यात आलेल्या व नियतवयोमानानुसार निवृत्तिवेतन किंवा, (नियत वयोमानापूर्वी नोकरीमधून सेवानिवृत्त झाल्याने द्यावयाचे निवृत्तिवेतन) अथवा, भरपाई निवृत्तिवेतन अनुज्ञेय असलेल्या आणि विकल्पाची निवड केल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत परिशिष्ट पाच मध्ये विहित केलेल्या प्रपत्रामध्ये निवृत्तिवेतनाच्या अंशराशिकरणासाठी अर्ज केलेल्या म. न. पा. कर्मचाऱ्याबाबतीत देखील उपरोक्त वैद्यकीय तपासणी लागू होणार नाही. वैद्यकीय मंडळाला केलेला कोणताही संदर्भ वैद्यकीय तपासणी आणि त्यासंबंधीचे परिणाम त्याच्या/तिच्या प्रकरणी लागू होणार नाहीत. वरील तरतूद ही, खालील शर्तीसापेक्ष असेल.

(एक) वर संदर्भित केलेल्या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारच्या निवृत्तिवेतनासाठी पात्र असणाऱ्या कर्मचाऱ्यांना/निवृत्तिवेतन धारकांना हा नियम लागू होणार नाही.

---

* स्थायी समितीचा ठराव क्र. १८५४ दि. १२ मार्च १९८६, महानगरपालिका ठराव क्र. २४५ दि. १४ जुलै १९८६ अन्वये नियम ६७ वगळण्यात आला आणि नियम ६७ (अ) सुधारण्यात आला आणि शासन ठराव क्र. बीएमसी/१३८६/१९५५/सीआर/४७३/८६/युडी-३ ३ जानेवारी १९८९ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली महानगरपालिका ठराव क्रमांक ९६० दि. २१ डिसेंबर १९९२ अन्वये सुधारण्यात आला आणि शासन ठराव क्रमांक बीएमसी/१३९३/६६७/सीआर-१२५/९३/युडी-२७ दि. ३१ जानेवारी २००० अन्वये निश्चिती देण्यात आली.

(दोन) ज्या महानगरपालिका कर्मचाऱ्याविरुध्द सेवानिवृत्तिच्या तारखेपूर्वी खात्यांतर्गत/न्यायालयीन कारवाई आयोजिलेली असेल/चालू असेल अथवा, ज्याच्याबाबतीत असे आरोप तपासणीसाठी असतील अशा कर्मचाऱ्याशी किंवा ज्याच्या बाबतीत अशा प्रकारची कारवाई चालू असण्याच्या कालावधीमध्ये, त्याच्या तात्पुरत्या निवृत्तिवेतनाच्या किंवा निवृत्तिवेतनाच्या भागांचे (हिश्शांचे) अंशराशिकरण करण्यास तो पात्र असणार नाही.

(तीन) या नियमान्वये निवृत्तिवेतनाच्या अंशराशिकरणासाठी अर्ज सेवानिवृत्तिच्या तारखेनंतर परंतु, सेवानिवृत्तिच्या तारखेपासून, एक वर्षाच्या आत अथवा, खात्यांतर्गत किंवा न्यायिक कार्यावाही चालू असलेल्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत अंतिम आदेश दिल्याच्या तारखेपासून किंवा, मुंबई महानगरपालिका निवृत्तिवेतन नियम (१९५३) च्या विकल्पाची निवड केल्याच्या तारखेपासून यथास्थिती, एक वर्षानंतर नाही (एक वर्षाच्या आत), करावयाचा आहे.

अंशराशिकरण निर्विवाद बनेल, म्हणजेच सेवानिवृत्त महानगरपालिका कर्मचाऱ्याने अंशराशीकरणासाठीचा अर्ज ज्या तारखेला ज्या कार्यालयात नोंदला असेल त्या दिवसापासून कर्मचारी अंशराशिकरणाचे मूल्य स्वीकारण्यास पात्र बनेल या नियमान्वये ज्या महानगरपालिका कर्मचाऱ्याने निवृत्तिवेतनाच्या अंशराशिकरणासाठी अर्ज केला असेल त्याला आपला अर्ज रद्द करण्याचा विकल्प (पर्याय) असणार नाही.

(चार) जो नियतवयोमानानुसार निवृत्त होणार आहे व निवृत्तिवेतन प्रदान आदेश निर्गमित करतेवेळी निवृत्तिवेतनाच्या अंशराशिकृत मूल्यांचे अधिदान व्हावे असे इच्छितो असा महानगरपालिका कर्मचारी, सेवानिवृत्तिच्या तारखेपूर्वी निवृत्तिवेतनाच्या काही भागाच्या अंशराशिकरणासाठी अर्ज करण्यास पात्र असेल.

मात्र,

(अ) महानगरपालिका कर्मचारी फक्त नियतवयोमानानुसारच्या निवृत्तिवेतनावर निवृत्त झालेला असला पाहिजे.

(ब) नियतवयोमानाच्या तारखेच्या कमीत कमी तीन महिने अगोदर अर्ज पोहोचेल अशा रीतीने तो अर्ज खाते प्रमुखाला सादर करण्यात आला पाहिजे.

(क) वर (ब) मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्राप्त न झालेला अर्ज हा, निवृत्तिवेतन प्रदान आदेश निर्गमित करण्याच्यावेळी अधिदान करण्याच्या प्रयोजनार्थ, स्वीकारण्यात येणार नाही.अशाप्रकारे उशीरा प्राप्त झालेला अर्ज हा निवृत्तिवेतन प्रदान आदेश निर्गमित करण्याच्यावेळी अधिदान करण्याच्या प्रयोजनार्थ स्वीकारण्यात यावा किंवा कसे हे, संपूर्णपणे प्रमुख लेखापाल/ संयुक्त प्रमुख लेखापालांच्या स्वेच्छानिर्णयावर अवलंबून राहिल.

(ड) महानगरपालिका कर्मचारी नियत वयोमानाच्या तारखेपूर्वी मृत्यू पावला किंवा त्याने निवृत्तिवेतन मिळण्याचा हक्क सेवानिवृत्तीपूर्वी गमावला तर, निवृत्तिवेतनाचे अंशराशिकृत मूल्य प्रदान करण्याचे कोणतेही दायित्व महानगरपालिकेवर असणार नाही.

(इ) या नियमान्वये ज्या महानगरपालिका कर्मचाऱ्याने निवृत्तिवेतनाच्या अंशराशिकरणासाठी अर्ज केला असेल त्याला आपला अर्ज रद्द करण्याचा विकल्प असणार नाही.

(या सुधारणेचा प्रभाव दि. १ एप्रिल १९९० पासून अंमलात येईल.)

*६८. (१) अंशराशिकरणाला मंजूरी मिळाल्यानंतर, खाली नियम क्रमांक ७० मध्ये विहित केल्याप्रमाणे वैद्यकीय प्राधिकाऱ्याने अंशराशिकरणासाठी अर्जदार लायक आहे अशा तऱ्हेचा दाखला दिल्यावर, अर्जदाराला अंशराशिकरणानंतर जी ठोक रक्कम द्यावयाची आहे त्याबाबतची प्रमुख लेखापालांच्या प्रमाणपत्राची एक प्रत देण्यात यावी. तसेच त्याचबरोबर त्याला आदेशाच्या तारखेपासून ३ महिन्यांच्या आत, किंवा जर त्याने नोकरीमधून सेवानिवृत्त होण्याच्या तारखेपूर्वी अंशराशिकरणासाठी अर्ज केला असेल तर त्या तारखेपूर्वी ३ महिन्यांच्या आत परंतु कोणत्याही प्रकरणी नोकरीमधून सेवानिवृत्त होण्याच्या प्रत्यक्ष तारखेपूर्वी नाही अशा रितीने उक्त वैद्यकीय प्राधिकाऱ्यांसमोर तपासणीसाठी हजर राहण्याचा आदेश देण्यात यावा. जर विहित कालावधीत वैद्यकीय तपासणी झाली नाही तर अंशराशिकरणासाठी दिलेली प्रशासकीय मंजूरी कालबाह्य होईल. जर विहित मुदतीत अर्जदार उक्त वैद्यकीय प्राधिकाऱ्यापुढे वैद्यकीय तपासणीसाठी हजर राहिला नाही, तर सक्षम प्राधिकारी आपल्या स्वविवेकानुसार प्रशासकीय मंजुरीचे आणखी ३

---

* स्थायी समितीचा ठराव क्र. १८५४ दि. १२ मार्च १९८६, महानगरपालिका ठराव क्र. २४५ दि. १४ जुलै १९८६ अन्वये नियम ६८ सुधारण्यात आला आणि शासन ठराव क्र. बीएमसी/ १३८६/ /१९५५/सीआर - ४७३/८६/युडी-दिनांक ३-जानेवारी १९८९ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

महिन्यांच्या कालावधीसाठी, निवृत्तीवेतनाच्या अंशराशिकरणासाठी नवीन अर्ज न मागविता, नूतनीकरण करु शकेल. वैद्यकीय तपासणी होण्याच्या पूर्वी कोणत्याही क्षणी लेखी सूचनापत्र देऊन अर्जदार आपला अर्ज परत घेऊ शकेल. परंतु, तो वैद्यकीय प्राधिकाऱ्यापुढे हजर झाल्यावर त्याला ही संधी मिळणार नाही. मात्र, वैद्यकीय प्राधिकाऱ्याने असा आदेश दिला की, अंशराशिकरणाच्या हेतूसाठी त्याचे जे प्रत्यक्ष वय आहे त्यापेक्षा जास्त वय स्वीकारण्यात येईल तर त्या बाबतीत ज्या दिवशी अंशराशिकरणानंतर द्यावयाच्या सुधारित रक्कमेबाबतचा आदेश मिळेल त्या तारखेपासून दोन आठवड्याच्या आत लेखी सूचनापत्र पाठवून अर्जदार अर्ज परत घेऊ शकेल किंवा जर ही रक्कम, मंजूर करणाऱ्या आदेशामध्ये अगोदरच नमूद केलेली असेल तर वैद्यकीय प्राधिकाऱ्यांचा निष्कर्ष त्याला ज्या तारखेला कळविण्यात येईल त्या तारखेपासून दोन आठवड्याच्या आत तो आपला अर्ज मागे घेऊ शकेल. जर अर्जदाराने वर विहित केलेल्या दोन आठवड्याच्या आत आपला अर्ज लेखी कळवून परत घेतला नाही तर त्याला देऊ केलेली रक्कम त्याने स्वीकारली आहे असे समजण्यात येईल.

(२) कंडिका (३) मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींसापेक्ष आणि या नियमाच्या कंडिका (१) च्या परंतुकाखाली अर्ज परत घेण्याच्या तरतुदींसापेक्ष, हे अंशराशिकरण निर्विवाद बनेल. म्हणजेच ज्या तारखेला वैद्यकीय प्राधिकारी वैद्यकीय प्रमाणपत्रावर सही करील त्या तारखेपासून अंशराशित मुल्य मिळविण्यासाठी सेवा निवृत्त महापालिका कर्मचारी हक्कदार बनेल. शारिरीक अस्वास्थ्य असलेल्या प्रकरणी अंशराशिकरण निर्विवाद बनेल म्हणजे (एक) सादर करण्यात आलेली महानगरपालिका कर्मचाऱ्याची अंशराशिकरणाची लेखी स्वीकृती कार्यालयाने नोंदल्याच्या दिनांकापासून (दोन) अंशराशिकरणाचा अर्ज मागे घेण्याचा कालावधी. तो कालावधी संपल्याशिवाय अंशराशिकृत मुल्य मिळणार नाही.

(३) वैद्यकीय तपासणीच्या वेळी त्या संबंधात त्याला विचारलेल्या कोणत्याही लेखी वा तोंडी प्रश्नांना उत्तर देतांना जर अर्जदाराने त्याला माहीत असतांना कोणतेही असत्य विधान केले किंवा हेतुपुरस्सर कोणतीही महत्वाची गोष्ट लपवून ठेवली तर प्रत्यक्ष पैसे देण्यापूर्वी कोणत्याही वेळी सक्षम प्राधिकारी आपली मंजुरी रद्द करु शकेल. आणि अशा प्रकारचे विधान किंवा वस्तुस्थिती हेतुपुरस्सर दडविणे हे नियम १४ (अ) (ब) च्या प्रयोजनार्थ गंभीर स्वरुपाची गैरवर्तणूक म्हणून समजण्यात येईल.

*६९. वरील नियम ६७ अ आणि ६८ मधील संदर्भित केलेली, अंशराशिकरणावरील अधिदानाच्या ठोस रक्कमेची परिगणना महानगरपालिकेने वेळोवेळी विहित केलेल्या प्रचलित मूल्यांच्या तक्त्यानुसार केली जाईल. परिशिष्ट सहामध्ये समाविष्ट केलेला तक्ता बदल करेपर्यंत कायम राहील. या नियमासाठी हानी पोचलेल्या जीविताच्या प्रकरणी, प्रमाणन वैद्यकिय प्राधिकाऱ्याने निर्देश केल्याप्रमाणे त्याचे वय असे धरले जाईल की, ते प्रत्यक्ष वयापेक्षा कमी वय असणार नाही. अंशराशिकरण निर्विवाद बनण्याच्या दिनांकापूर्वी, जर प्रचलित मूल्यांचा तक्ता बदलला, तर बदललेल्या तक्त्यानुसार अधिदान केले जाईल. परंतु पूर्वी अस्तित्वात असलेल्या तक्त्यापेक्षा बदललेला तक्ता हा कमी फायदेशीर असला तर बदलण्याची सूचना मिळाल्याच्या दिनांकापासून चौदा दिवसांच्या आत लेखी सूचना पाठवून अर्ज मागे घेण्याची अर्जदाराला मुभा राहिल.

*६९ (अ) नवीन नियम (१) - ज्या प्रकरणी, प्रमुख लेखापाल सेवानिवृत्तिवेतनावरील अंशराशित मूल्य परस्पर बँकेत जमा करत असतील अशा प्रकरणी, एखादा अर्जदार मान्यताप्राप्त बँकेच्या शाखेकडून मासिक सेवानिवृत्तिवेतन प्राप्त करीत असेल, तर अंशराशिकरणामुळे सेवानिवृत्तिवेतनावरील रक्कमेची घट, सेवानिवृत्तिवेतनाचे अंशराशित मूल्य बँकेत भरल्याच्या दिनांकापासून परिणामकारक होईल.

(२) जिथे महापालिका कोषागारातून अंशराशिकरणाची रक्कम द्यावयाची असेल अशा प्रकरणांमध्ये अंशराशिकरणामुळे सेवानिवृत्तिवेतनाच्या रक्कमेमधील घट सेवानिवृत्तिवेतनाचे अंशराशित मूल्य मिळाल्याच्या दिनांकापासून परिणामकारक होईल.

७०. (अ) प्रशासकीय मंजुरीने निवृत्तिवेतनाचे अंशराशिकरण निर्विवाद बनण्यापूर्वी नियम ८ अन्वये स्थापित झालेल्या वैद्यकीय मंडळाने अर्जदाराची परीक्षा घेणे आवश्यक आहे.

(ब) वैद्यकीय मंडळ निवृत्तिवेतनधारकाची कडक वैद्यकीय परीक्षा करेल आणि त्यास त्याचे वय, प्रकृती व सवयी यासारखी विमा कंपनीला जीविताची हमी देण्याकरिता पुरवायची माहिती देण्यास भाग पाडील व खालील पध्दतीनुसार अहवाल देईल. तसेच त्याच्या उपस्थितीत, निवृत्तिवेतनधारकाची सही, आणि डाव्या हाताच्या अंगठ्याचा व बोटांचे ठसे घेईल.

---

* स्थायी समितीचा ठराव क्र. १८५४ दि. १२ मार्च १९८६, महानगरपालिका ठराव क्र. २४५ दि. १४ जुलै १९८६ अन्वये नवीन नियम ६९ सुधारण्यात आला आणि नवीन नियम ६९ अ (१), ६९अ (२) अंतर्भूत करण्यात आले. आणि शासन ठराव क्र. बीएमसी/१३८६/१९५५/सीआर-४७३/८६/युडी दि. ३ जानेवारी १९८९ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

स्थळ -------------------------------

दिनांक -------------------------------

निवृत्तिवेतनाच्या अंशराशिकरणाकरिता अर्जदाराच्या वैद्यकीय परीक्षेकरिता घालून दिलेल्या सूचनांप्रमाणे (*) आम्ही,

श्री -----------------------------------------------------------

सेवानिवृत्त -----------------------------------------------------------

यांना काळजीपूर्वक तपासले आहे, आणि आम्ही अशा मताचे आहोत की,

***टिप** :-- वैद्यकीय मंडळाचे त्यांच्या मार्गदर्शनाकरिता परिशिष्ट आठ मध्ये नमूद केलेल्या सूचनांकडे लक्ष वेधण्यात येत आहे.

(१) एक तर श्री ------------------------------- प्रकृतीने चांगले आहेत/नाहीत व त्यांचे आयुष्यमान भविष्यात सरासरी बरे आहे. / अंशराशिकरणाकरिता ते योग्य नाहीत.

किंवा, (अंशराशिकरणाकरिता योग्य आहे अशा अद्यापि ज्याचा विचार करावयाचा आहे अशा एखाद्या दुर्बल आयुष्याच्या प्रकरणी) श्री. ------------------------------- हे ------------------------------- ने ग्रस्त असल्यामुळे अंशराशिकरणाकरिता त्यांचे वय त्यांच्या जन्मदिनांकाच्या सालापासून घेण्यात यावे.

(२) संबंधित खातेप्रमुखांनी पुरविलेल्या ओळखचिन्हांच्या तपशिलांच्या संदर्भानुसार आम्ही श्री. ----------------------------------------------- यांना ओळखले आहे.

ओळखचिन्हे

(१) -----------------------------------------------------------------

(२) -----------------------------------------------------------------

(३) ----------------------------------------------------------------

सही : ------------------------------

महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या डाव्या हाताच्या अंगठ्याचा, तसेच बोटांचे ठसे.

वैद्यकीय मंडळाचा सभासद     वैद्यकीय मंडळाचा सभासद     अध्यक्ष वैद्यकीय मंडळ

(क) एखाद्या अर्जदाराच्या प्रकरणी असमर्थता निवृत्तिवेतन मंजूर केलेले आहे वा करावयाचे आहे किंवा त्याच्या प्रत्यक्ष वयामध्ये अतिरिक्त वर्षाच्या आधारावर निवृत्तिवेतनाच्या काही भागांचे पूर्वी अंशराशिकरण केलेले आहे (किंवा, अंशराशिकरणाची स्वीकृती नाकारलेली आहे.) किंवा, वैद्यकीय आधारावर अंशराशिकरण नाकारलेले आहे. अशा प्रकरणी, प्रमाणपत्रावर सही होण्यापूर्वी पूर्वीच्या वैद्यकीय अहवालांच्या किंवा विधानांच्या प्रती वैद्यकीय मंडळाला सादर करावयास हव्यात.

(ड) वैद्यकीय मंडळाच्या परीक्षेकरिता नियम आठमधील नियमांन्वये निश्चित केले जाणारे शुल्क अर्जदाराने स्वत: भरावयास हवे.

(इ) संबंधित खातेप्रमुखांनी (निवृत्तिवेतनधारकाला वैद्यकीय परीक्षेकरिता पाठविताना) निवृत्तिवेतनधारकाच्या ओळखचिन्हांचा तपशील वैद्यकीय मंडळाला पुरवावयास हवा.

(फ) वैद्यकीय मंडळाच्या शिफारशीनुसार एखाद्या निवृत्तिवेतनधारकाला अंशराशि-करणाकरिता योग्य नसल्यामुळे अंशराशिकरण एकदा नाकारल्यानंतर किंवा, वैद्यकीय मंडळाने शिफारस केलेल्या त्याच्या प्रत्यक्ष वयाच्या अतिरिक्त वर्षांच्या आधारावर जर त्याने एकदा अंशराशिकरणाची स्वीकृती नाकारली तर मूळ निष्कर्षाच्या सुधारणेसाठी जर त्यानंतर त्याला स्वत:ला वैद्यकीय परीक्षेला हजर व्हायचे असेल तर स्वत:च्या खर्चाने, सक्षम प्राधिकाऱ्यांच्या स्वेच्छेने, केवळ एकदाच पुनर्परीक्षेकरिता परवानगी दिली जाईल. मात्र पहिल्या व दुसऱ्या वैद्यकीय परीक्षेच्या मधील कालावधी हा एक वर्षापेक्षा कमी असता कामा नये.

(ग) वैद्यकीय मंडळ खाते प्रमुखांकडे विनाविलंब मूळ वैद्यकीय प्रमाणपत्र पाठवील. खाते प्रमुख, ते प्रमाणपत्र प्रशासकीय मंजुरीसह पुढे प्रमुख लेखापालांकडे पाठवतील. वैद्यकीय मंडळ प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत अर्जदारालादेखील पाठवील.

(ह) हानी न पोचलेल्या जीविताच्या प्रकरणी, प्रमुख लेखापाल तात्काळ योग्य अंशराशित मूल्याचे अधिदान व त्यानुसार निवृत्तिवेतनाच्या घटीकरिता व्यवस्था करतील. वैद्यकीय मंडळाच्या उपस्थितीत घेतलेली व निवृत्तिवेतनाच्या आदेशाबरोबर मिळालेली सही, अंगठा व बोटांचे ठसे ते पडताळतील.

**७१.** ज्याने निवृत्तिवेतनाचा काही भाग अंशराशित केलेला आहे असा निवृत्तिवेतनधारक अंशराशिकरण निर्विवाद बनल्याच्या दिवशी वा नंतरच्या दिवशी परंतु अंशराशित मूल्य मिळण्यापूर्वी मृत्यू पावला तर हे मूल्य त्याच्या वारसांना देण्यात येईल.

**७२.** अंशराशिकरणाकरिता एकदा अर्ज केल्यानंतर, ते मंजूर केल्यानंतर आणि अंमलात आल्यानंतर ते मागे घेता येणार नाही. म्हणजेच, निवृत्तिवेतनाचा अंशराशित भाग, त्याच्या भांडवली मूल्याच्या परताव्यावर पूर्वस्थितीत आणता येणार नाही.

*** ७२ (अ) नवीन नियम**

नियत क्रमांक ७२ मध्ये काहीही अंतर्भुत असले तरीही, ज्या निवृत्तिवेतनधारकाने आपल्या निवृत्तिवेतनाच्या भागाचे अंशराशिकरण केलेले आहे व त्याने निवृत्तिवेतनाचे अंशराशिकरण केल्याच्या तारखेपासून दिनांक १ एप्रिल १९८५ रोजी किंवा त्यापूर्वी १५ वर्षाचा कालावधी संपलेला आहे त्याच्याबाबतीत, निवृत्तिवेतनाच्या अंशराशिकरण केलेल्या भागाची दिनांक १ एप्रिल १९८५, रोजी पुनर्स्थापना होईल. ज्यांनी दि. १ एप्रिल १९८५ नंतर निवृत्तिवेतनाच्या भागाचे अंशराशिकरण केलेले आहे किंवा जे, अंशराशिकरण करतील त्यांच्या बाबतीत, निवृत्तिवेतनाचे अंशराशिकरण केल्याच्या तारखेपासून १५ वर्षे पूर्ण झाल्यावर, त्यांच्या निवृत्तिवेतनाचे अंशराशिकरण केलेल्या भागाची पुन:स्थापना करण्यात येईल.

(दिनांक १-४-१९८५ पासून प्रभाव्य).

---

* स्थायी समितीचा ठराव क्र. १४९७ दि. ५ फेब्रुवारी, १९९२ महानगरपालिका ठराव क्र. ९६० दि. २१ डिसेंबर १९९२ अन्वये नवीन नियम ७२ (अ) अंतर्भूत करण्यात आला आणि शासन ठराव क्र. बीएमसी/ १३९३/ ६६७/सीआर/ १२५/ ९३-युडी-२१, दि. ३१ जानेवारी २००० अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

# विभाग दहा

# अग्निशामक दल कर्मचारी

**७३.** अग्निशामक सेवेमध्ये प्रत्यक्ष कार्यक्षेत्र विभागासाठी असणाऱ्या महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, या विभागातील नियमांनुसार निवृत्तिवेतन देण्यात येईल. महानगरपालिका कर्मचाऱ्यांना निवृत्तिवेतन देण्याचे नियमन करणारे इतर सर्व नियम, जर या विभागातील नियमांशी विसंगत नसतील तर किंवा त्यांच्या विषयात किंवा संदर्भात याविरुध्द काहीही नसेल तर, अग्निशामक दल सेवेतील या कर्मचाऱ्यांना देखील लागू आहेत.

टीप :-- अग्निशामक दलातील एखादा विशेष प्रकारचा कर्मचारी अग्निशामक दल सेवेच्या कार्यक्षेत्र विभागावर आहे किंवा नाही अशा बाबतीत शंका उत्पन्न झाल्यास हा प्रश्न महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे पाठविण्यात यावा. या बाबतीत महानगरपालिका आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील.

**७४.** या नियमांच्या तरतुदीखाली ज्या सर्व हेतूंसाठी महानगरपालिका वैद्यकीय परीक्षकांकडून वैद्यकीय प्रमाणपत्र आवश्यक असते त्यासाठी, अग्निशामक दल सेवेमधील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत अग्निशामक दल शल्यचिकित्सक यांनी सही केलेले वैद्यकीय प्रमाणपत्र घेण्यात यावे.

**७५.** नियम क्र. ३४ मध्ये नमूद केलेल्या इतर अटींसापेक्ष, अग्निशामक दलातील जो कर्मचारी, नियतवयोमानानुसार मिळणाऱ्या निवृत्तिवेतनास पात्र नाही त्याला त्याची अर्हकारी सेवेची २० वर्षे पूर्ण झाल्यानंतर, नियतवयोमानापूर्वीचे निवृत्तिवेतन देण्यात यावे.

* **७६ (१)** : अर्हकारी सेवेची १० वर्षे पूर्ण होण्यापूर्वी नियत वयोमान, सेवा-निवृत्ती, असमर्थता किंवा भरपाई निवृत्तीवेतन यावर सेवानिवृत्त होणाऱ्या अग्निशमन दल खात्यातील महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, नियम ४८ (१) च्या तरतुदीनुसार सेवा-उपदानाची रक्कम विनियमित करण्यात येईल.

---

* स्थायी समिती ठराव क्र. ४२ दि. १९ एप्रिल, १९८९ महानगरपालिका ठराव क्र. ३१९ दि. १ सप्टेंबर १९८९ अन्वये नियम ७६ सुधारण्यात आला आणि शासन ठराव क्र. बीएमसी/१३९३/६६७/सीआर/१२५/९३-युडी-२१ दि. ३१ जानेवारी २००० अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

(दिनांक १-१-१९८६ पासून अंमल देण्यात आला).

**(२)** (अ) अर्हकारी सेवेची २१½ वर्ष पूर्ण झाल्यानंतर, या नियमांच्या तरतुदीच्या अनुसार नियतवयोमान, सेवानिवृत्ती, असमर्थता किंवा भरपाई निवृत्तीवेतन यावर सेवानिवृत्त होणाऱ्या अग्निशामक दल खात्यातील महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, निवृत्तीवेतनार्ह वेतनाच्या ५० टक्के निवृत्तिवेतनाची रक्कम असेल. परंतु ती कमीत कमी प्रतिमास रु. ३७५/- व जास्तीत जास्त प्रतिमास रु. ४,०००/- एवढी असेल.

(ब) अर्हकारी सेवेची २१ वर्षाहून कमी परंतु १० वर्षे किंवा त्याहून जास्त सेवा पूर्ण झाल्यानंतर, या नियमांच्या तरतुदींच्या अनुसार नियतवयोमान , सेवानिवृत्ती, असमर्थता किंवा भरपाई निवृत्तीवेतन यावर सेवानिवृत्त होणाऱ्या अग्निशामक दल खात्यामधील महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या बाबतीत निवृत्ती वेतनाची रक्कम पोटनियम (अ) अन्वये अनुज्ञेय असलेल्या कमाल निवृत्तीवेतन रकमेच्या प्रमाणात असेल. परंतु ती, कमीत कमी प्रतिमास रु. ३७५/- व जास्तीत जास्त प्रतिमास रु. ४,०००/- एवढी असेल.

**टीप** : टप्पा सुत्रानुसार (स्लॅब फॉर्म्यूला) ज्यांच्या निवृत्ती वेतनाचा हिशेब केलेला आहे अशा दिनांक १-१-१९८६ च्या निवृत्तीवेतन धारकांच्या बाबतीत, अर्हकारी सेवेच्या हिशेबात घ्यावयाच्या कालावधीमध्ये व निवृत्तीवेतनार्ह वेतनामध्ये बदल न करता, निवृत्तीवेतनार्ह वेतनाच्या ५० टक्क्याने निवृत्तिवेतनाचा पुन्हा हिशेब करण्यात येईल. अशाप्रकारे निवृत्तिवेतनामध्ये वाढलेली रक्कम निवृत्तिवेतनाच्या जादा अंशराशिकरणाकरिता धरता येणार नाही.

(दिनांक १-१-१९८६ पासून प्रभाव्य.)

***७७.** (अ) अग्निशामक दलातील कर्मचारी आपले कर्तव्य बजावीत असता ठार झाला किंवा आपले काम करीत असताना त्याला झालेल्या जखमांमुळे तो मृत्यू पावला तर त्याबाबतीत नियम क्र. ४४ अन्वये त्याच्या कुटुंबाला जर कुटुंब निवृत्तिवेतन मंजूर केले तर त्याची रक्कम खालीलप्रमाणे असेल :--

---

* महानगरपालिका ठराव क्र. ३६९, दि. १५ जुलै, १९७१ अन्वये नियम ७७ (अ) सुधारण्यात आला आणि शासकीय ठराव क्र. नगर विकास आणि सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. बीएमसी/५३७१/४७९४६ क. दि. ७ जानेवारी, १९७२ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली. महानगरपालिका ठराव क्र. ४३, दि. ७ मे १९७३ अन्वये तो पुढे आणखी सुधारण्यात आला आणि शासकीय ठराव, नगर विकास, सार्वजनिक आरग्य विभाग क्र. बीएम्सी/१०७३/५२४५४/क, दि. २४ ऑगस्ट १९७३ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली. दि. १ एप्रिल १९७२ पासून या सुधारणेचा अंमल देण्यात आला.

| हुद्दा | प्रति मास निवृत्तीवेतन | |
|---|---|---|
| | विधवेसाठी | २० वर्षापर्यंतच्या प्रत्येक मुलासाठी |
| | रु. | रु. |
| प्रमुख अग्निशमन अधिकारी | ३०० | ९० |
| उप प्रमुख अग्निशमन अधिकारी | २०० | ६० |
| विभागीय अधिकारी | १६० | ५० |
| सहाय्यक विभागीय अधिकारी | १५० | ४५ |
| स्थानक अधिकारी | १३० | ४० |
| सहाय्यक स्थानक अधिकारी | ७० | २५ |
| दुय्यम अधिकारी | ५० | २० |
| यंत्र चालक | ४० | १५ |
| प्रमुख अग्निशामक जोडारी | ४० | १५ |
| प्रमुख अग्निशामक | ४० | १५ |
| प्रमुख अग्निशामक मोटर जोडारी | ४० | १५ |
| प्रमुख अग्निशामक जोडारी - द्वितीय | ४० | १५ |
| प्रमुख अग्निशामक कातारी - द्वितीय | ४० | १५ |
| प्रमुख अग्निशामक लोहार - प्रथम | ४० | १५ |
| अग्निशामक जोडारी - द्वितीय | ४० | १५ |
| अग्निशामक रंगारी - द्वितीय | ४० | १५ |
| अग्निशामक सुतार | ४० | १५ |
| अग्निशामक मोची | ४० | १५ |
| अग्निशामक, अग्निशामक परिचर | ४० | १५ |

(ब) (एक) विधवेला तिच्या हयातभर निवृत्तिवेतन देण्यात येईल. मात्र सदर विधवेने पुनर्विवाह केल्यास तिला देण्यात येणारे निवृत्तिवेतन बंद करण्यात येईल.

(दोन) मुलाला मिळणारे निवृत्तिवेतन सदर मुलाला २१ वर्षे होईपर्यंत किंवा अर्थाजन करण्यास सुरुवात करे पर्यंत किंवा कन्येच्या बाबतीत तिचे लग्न होईपर्यंत, वयाच्या २४ व्या वर्षापर्यंत यापैकी जी मुदत लवकरची असेल, तोपर्यंत देण्यात येईल.

**टीप :--** अग्निशामक दलातील कर्मचारी आपले कर्तव्य बजावीत असताना ठार झाला किंवा आपले काम करीत असताना त्याला झालेल्या जखमांमुळे तो मृत्यू पावला तर त्या मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबाला वर निर्धारित केलेली तरतूद फायदेशीर ठरत नसेल; परंतु त्या तुलनेत नियम क्र. ८८ च्या तरतुदी अन्वये निर्धारित केलेले कुटुंब निवृत्तिवेतन फायदेशीर होत असेल तर महानगरपालिका आयुक्त त्या मृत महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या कुटुंबाच्या संमतीने नियम क्र. ८८ अन्वये त्या कुटुंबाला अनुज्ञेय होणारे निवृत्तिवेतन मंजूर करू शकतील.

*__७८ (१)__ : नियम ५७ मध्ये नमूद केलेल्या इतर शर्ती आणि मर्यादा (निर्बंध) यांच्यासापेक्ष नियम ७६ अन्वये, उपदान किंवा निवृत्तीवेतन अनुज्ञेय असलेल्या महानगरपालिका अग्निशामक दल खात्यामधील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, मृत्यू-नि-सेवा-निवृत्ति उपदानाची रक्कम ही, नोकरीच्या पहिल्या १० वर्षासाठी, अर्हकारी सेवेच्या पूर्ण केलेल्या प्रत्येक सहा महिन्यांकरिता वेतनाच्या 1/4 दराने मंजूर करण्यात येईल आणि नंतरच्या ११ 1/2 वर्षासाठी अशा प्रत्येक कालावधीकरिता (सहामाही) वेतनाच्या 1/2 दराने देण्यात येईल.

**(२)** कर्मचाऱ्याचा सेवेमध्ये असताना मृत्यू झाल्यास, नियम ५७ (२) मध्ये नमूद केल्याप्रमाणे किंवा वर उपनियम (१)मध्ये दर्शविल्याप्रमाणे, यापैकी जी कर्मचाऱ्याच्या हिताची (फायद्याची) पध्दत असेल त्याप्रमाणे,मृत्यू-नि-सेवानिवृत्ति उपदान अनुज्ञेय होईल.

(दिनांक १-१-१९८६ पासून प्रभाव देण्यात येईल.)

---

* स्थायी समिती ठराव क्र. ४२ दि. १९ एप्रिल, १९८९ महानगरपालिका ठराव क्र. ३१९ दि. १ सप्टेंबर १९८९ अन्वये नियम ७८ सुधारण्यात आला आणि शासन ठराव क्र. बीएमसी/१३९३/६६७/सीआर/१२५/९३-युडी-२१ दि. ३१ जानेवारी २००० अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

*७९.(अ) नियम क्र. ५९ मध्ये नमूद केलेल्या इतर अटींसापेक्ष, त्या नियमाखाली अग्निशामक दलातील कर्मचाऱ्याची १५ वर्षे अर्हकारी सेवा झाल्यानंतर जर तो मृत्यू पावला तर त्याच्या कुटुंबाला कुटुंब निवृत्तिवेतन देण्यात यावे. मात्र अपवादात्मक परिस्थितीत, कर्मचाऱ्याची १५ वर्षापेक्षा कमी, परंतु १० वर्षापेक्षा कमी नाही एवढ्या कालावधीकरिता अर्हकारी सेवा झाल्यानंतर जर तो मृत्यू पावला तर त्याच्या कुटुंबाला कुटुंब निवृत्तिवेतन देण्यात यावे.

(ब) नियम क्र. ५९ च्या उप नियम क्र. ६ च्या प्रयोजनाकरिता, अग्निशामक दलातील ज्या कर्मचाऱ्याने १५ वर्षे अर्हकारी सेवा पूर्ण केली आहे, त्याने परिशिष्ट सातमधील (इ) प्रपत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे नामनिर्देशन पत्र करावे.

---

* महानगरपालिका ठराव क्र. १६५९ दि. १६ फेब्रुवारी, १९६८ अन्वये नियम ७९ (अ) सुधारण्यात आला आणि शासकीय ठराव, नगर विकास, सार्वजनिक आरोग्य आणि गृहनिर्माण विभाग क्र. बीएमसी/५३६८/२६८७९-क, दि. १२ जुलै, १९६८ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली आणि दि. १ एप्रिल, १९५७ पासून त्याचा अंमल देण्यात आला.

# विभाग अकरा

## सेवानिवृत्ताने परत नोकरी करणे.

**८०.** या विभागामध्ये कोणत्याही बाबतीत एतद्विरुध्द अन्यथा स्पष्टपणे तरतूद केली नसेल तर, ज्या महानगरपालिका कर्मचाऱ्याने सेवानिवृत्तिनंतर निवृत्तिवेतन स्वीकारले आहे आणि जर त्याला महानगरपालिकेच्या नोकरीत परत घेण्यात आले तर त्याला दुसऱ्या निवृतीवेतनासाठी त्याची नवीन सेवा अर्हकारी सेवा म्हणून गणण्यास त्याला परवानगी देण्यात येऊ नये. नवीन नोकरी ही जर निवृत्तिवेतनासाठी अर्हकारी सेवा होत असेल तर निवृत्तिवेतन काढण्यासाठी पूर्वी केलेली नोकरी आणि नवीन नोकरी ही एकत्रित केली पाहिजे व ही सर्व नोकरी एकच नोकरी म्हणून धरण्यात यावी.

**८१.** या विभागातील नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरीसुध्दा, ज्या महानगरपालिका कर्मचाऱ्याला जखम किंवा इजा निवृत्तिवेतन नियम ५१ नुसार मंजूर करण्यात आले आहे, त्याने परत नोकरी धरण्याच्या कालावधीमध्ये, किंवा त्याची नोकरी पुढे चालू ठेवण्याच्या कालावधीमध्ये, अशा सेवानिवृत्त महानगरपालिका कर्मचाऱ्याला सदर निवृत्तिवेतन देण्याचे चालू ठेवावे आणि ते निवृत्तिवेतन देण्याबाबतच्या असलेल्या अटीवरच फक्त ते निवृत्तिवेतन अवलंबून राहील.

**८२.** जी व्यक्ती भरपाई उपदानासह महानगरपालिकेच्या नोकरीमधून सेवानिवृत्त झाली आहे किंवा जी असमर्थता उपदानासह नोकरीमधून सेवानिवृत्त झाली आहे परंतु, महानगरपालिकेच्या नोकरीमध्ये त्याच शाखेमध्ये किंवा दुसऱ्या शाखेमध्ये परत नोकरीकरिता घेण्यास जी आरोग्यदृष्टया लायक झाली आहे अशा व्यक्तीला खालील अटींवर परत नोकरीत घेण्यात यावे :--

(१) ती व्यक्ती आपले उपदान आणि जर असेल तर, मृत्यू-नि-सेवानिवृत्ती उपदान ठेवून घेऊ शकेल. त्या प्रकरणी, पुढील निवृत्तिवेतनासाठी तिची पूर्वीची नोकरी हिशेबात घेतली जाणार नाही किंवा त्या व्यक्तीने ते परत करावे, आणि या नियमांन्वये त्या व्यक्तीची पूर्वीची सेवा निवृत्तिवेतनाकरिता अर्हकारी सेवा म्हणून धरावी.

(२) त्या व्यक्तीने आपले उपदान आणि मृत्यू-नि-सेवानिवृत्ति उपदान, जर असेल तर, परत करण्याचे ठरविले तर नोकरीवर परत घेतल्यावर ताबडतोब त्याप्रमाणे आपला हेतू जाहीर केला पाहिजे. परंतु परत करावयाची रक्कम आपल्या वेतनाच्या एक - तृतीयांश या रकमेपेक्षा कमी नाही एवढ्या मासिक हप्त्याने परत केली पाहिजे. संपूर्ण रक्कम परत केली जाईपर्यंत, पूर्वीची नोकरी निवृत्तिवेतनाकरिता हिशेबात धरण्याचा हक्क अंमलात येणार नाही.

(३) जर त्या व्यक्तीने आपले उपदान आणि जर असेल तर, मृत्यू-नि-सेवानिवृत्ति उपदान ठेवून घेण्याचे ठरविले तर त्याला आपल्या दुसऱ्या नोकरीच्या कालावधीसाठी उपदान किंवा निवृत्तिवेतन आणि मृत्यू-नि-सेवानिवृत्ति उपदान मिळू शकेल. मात्र :--

(एक) अशा उपदानाची रक्कम किंवा अशा निवृत्तिवेतनाचे परिशिष्ट सहामध्ये विहित केलेल्या सारीणीनुसार काढलेले विद्यमान मूल्य जेव्हा पूर्वीच्या उपदानामध्ये मिळविले जाईल तेव्हा ती रक्कम उपदानाच्या रक्कमेपेक्षा किंवा नोकरीवर परत घेतल्यावर पूर्वीचे उपदान जर परत केले असते तर देय असलेल्या निवृत्तिवेतनाच्या सध्याच्या मूल्यापेक्षा जास्त होता कामा नये, आणि,

(दोन) अशा मृत्यू-नि-सेवानिवृत्ती उपदानाची रक्कम जेव्हा पूर्वीच्या मृत्यू-नि-सेवानिवृत्ती उपदानाची रक्कम जेव्हा पूर्वीच्या मृत्यू-नि-सेवानिवृत्ती उपदानाच्या रक्कमेमध्ये मिळविली जाईल तेव्हा ती रक्कम, नोकरीमध्ये परत घेतल्यानंतर, पूर्वीच्या मृत्यू-नि-सेवानिवृत्ती उपदानाची रक्कम जर परत करण्यात आली असती तर जी रक्कम देता आली असती त्या रक्कमेपेक्षा जास्त होता कामा नये.

**८३.** (अ) जी व्यक्ती महानगरपालिकेच्या नोकरीमधून भरपाई निवृत्तिवेतनासह सेवानिवृत्त झाली आहे किंवा जी नोकरीमधून असमर्थता निवृत्तिवेतनासह सेवानिवृत्त झाली आहे; परंतु महानगरपालिकेच्या नोकरीमध्ये त्याच शाखेमध्ये किंवा दुसऱ्या शाखेमध्ये नोकरीत परत घेण्यास शारीरिक दृष्टया लायक झाली आहे अशा व्यक्तीस नोकरीत परत घेता येईल व अशा रितीने तिला परत नोकरीत घेतल्यानंतर :--

(एक) ती व्यक्ती आपले निवृत्तीवेतन आणि मृत्यू-नि-सेवानिवृत्ती उपदान ठेवून घेऊ शकेल. त्या प्रकरणामध्ये, तिच्या दुसऱ्या नोकरीच्या कालावधीसाठी, निवृत्तिवेतनाचे फायदे ठरविताना तिची पूर्वीची नोकरी हिशेबात घेतली जाणार नाही, किंवा

(दोन) त्या व्यक्तीने निवृत्ति-वेतन घेण्याचे बंद करावे आणि मृत्यू-नि-सेवानिवृत्ती उपदानाची रक्कम परत करावी व पुढील निवृत्तिवेतनासाठी पूर्वीची नोकरी अर्हकारी सेवा म्हणून हिशेबात घ्यावी.

(ब) जर त्या व्यक्तीने मृत्यू-नि-सेवानिवृत्ती उपदानाची रक्कम परत करण्याचे ठरविले आणि निवृत्तिवेतन घेण्याचे बंद करण्याचे ठरविले तर नोकरीमध्ये परत घेतल्यानंतर ताबडतोब तिने आपला असा हेतू जाहीर केला पाहिजे, पण तिच्या वेतनाच्या एक-तृतीयांश इतक्या रक्कमेपेक्षा कमी नाही एवढ्या मासिक हप्त्याने सदर रक्कम परत केली पाहिजे. जोपर्यंत संपूर्ण रक्कम परत केलेली नाही तोपर्यंत पूर्वीची नोकरी निवृत्तिवेतनासाठी हिशोबात धरण्याचा हक्क अंमलात येणार नाही. जे निवृत्तिवेतन मध्यंतरी घेतले असेल ते परत करण्याची आवश्यकता नाही.

(क) जर त्या व्यक्तीने आपले निवृत्तीवेतन आणि मृत्यू-नि-सेवानिवृत्ती उपदान ठेवून घेण्याचे ठरविले तर त्या व्यक्तीचे निवृत्तिवेतन तिला नोकरीमध्ये परत घेतल्यानंतर त्या कालावधीमध्ये संपूर्णत: किंवा अंशत: स्थगित करावयाचे किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार त्या व्यक्तीची नेमणूक करणाऱ्या प्राधिकाऱ्याला राहील. नोकरीच्या दुसऱ्या कालावधीसाठी अनुज्ञेय असलेले निवृत्तिवेतन, किंवा उपदान आणि मृत्यू-नि-सेवानिवृत्ती उपदान, जर असेल तर, ती ते मिळवू शकेल. मात्र, हे फायदे खालील निर्बंधावर अवलंबून असतील, म्हणजे, (एक) नोकरीचे दोन्ही कालावधी जर एकत्र केले असतील तर ती व्यक्ती नोकरीमधून अंतिमत: सेवानिवृत्त झाल्यानंतर तिला जे निवृत्तिवेतन अनुज्ञेय झाले असते त्या निवृत्ति वेतनाचे मूल्य आणि पूर्वीच्या नोकरीसाठी अगोदरच मंजूर झालेल्या निवृतिवेतनाचे मूल्य यामधील फरकापेक्षा उपदानाची रक्कम किंवा निवृत्तिवेतनाचे विद्यमान मूल्य जास्त असता कामा नये, आणि (दोन) नोकरीचे दोन्ही कालावधी जर एकत्र करण्यात आले असतील तर ती व्यक्ती नोकरीमधून अंतिमत: सेवानिवृत्त झाल्यानंतर तिला जे मृत्यू-नि-सेवानिवृत्ती उपदान अनुज्ञेय झाले असते त्याची रक्कम आणि पूर्वीच्या नोकरीसाठी अगोदरच मिळालेल्या मृत्यू-नि-सेवानिवृत्ती उपदानाची रक्कम यामधील फरकापेक्षा मृत्यू-नि-सेवानिवृत्ती उपदानाची रक्कम जास्त असता कामा नये.

**टीप** : (१) या नियमाच्या प्रयोजनासाठी परिशिष्ट सहामध्ये विहित केलेल्या सारिणीनुसार विद्यमान मूल्य काढण्यात येईल.

(२) एका वर्षापेक्षा जास्त नाही एवढ्या मुदतीच्या हंगामी विश्वसनीय नोकरीसाठी जर निवृत्तिवेतनधारकाला परत नोकरीत घेण्यात आले असेल तर त्या बाबतीत त्याला संपूर्ण निवृत्तिवेतन घेऊ देण्यात यावे.

**८४.** महानगरपालिका कर्मचाऱ्याला कामावर परत घेतल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत जर त्याने नियम ८३ मध्ये दिलेल्या पर्यायाची, म्हणजे निवृत्तिवेतन घेण्याचे बंद करणे आणि पुढील निवृत्तिवेतनासाठी आपल्या पूर्वीची नोकरी हिशोबात घेणे, निवड केली नाही तर त्याची नेमणूक करणाऱ्या प्राधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय यानंतर असे त्याला करता येणार नाही.

**८५.** (अ) जी व्यक्ती नियत वयोमानानुसार किंवा पूर्णसेवा निवृत्तिवेतन घेत आहे तिला सार्वजनिक हेतू आणि निव्वळ हंगामी स्वरुपाची नेमणूक या गोष्टी वगळून परत नोकरीत घेता येणार नाही किंवा नोकरीत पुढे चालू ठेवता येणार नाही. अशा व्यक्तीला जर नोकरीमध्ये परत घेण्यात आले तर त्या व्यक्तीला दुसऱ्या नोकरीच्या बाबतीत कोणतेही निवृत्तिवेतन अथवा उपदान घेण्यास परवानगी देण्यात येऊ नये.

(ब) निवृत्तिवेतनधारकाला ज्या पदावर परत नेमण्यात आले आहे त्या पदावर नेमणूक करण्यास सक्षम असलेला प्राधिकारी, त्या निवृत्तिवेतनधारकाला संपूर्णत: किंवा अंशत: निवृत्तिवेतन स्थगित करता येईल किंवा कसे हे ठरवील.

**८६.** (अ) जो निवृत्तिवेतनधारक महानगरपालिकेच्या नोकरीमध्ये परत घेतला गेला आहे, त्याच्या प्रकरणी, आणि अशा तऱ्हेने नोकरीत परत घेतल्यानंतर ज्याने आपल्या निवृत्तिवेतनाचा काही भाग अंशराशिकृत केला आहे त्याच्या बाबतीत जर अंशराशिकरण झाले नसते तर जी रक्कम त्याला मिळाली असती ती रक्कम वजा अंशराशिकृत केलेली रक्कम, एवढी रक्कम या विभागातील नियमाखाली त्याला निवृत्तीवेतनाची रक्कम म्हणून मिळण्यास तो पात्र ठरेल.

(ब) ज्या निवृत्तिवेतनधारकाने नोकरीत परत येण्यापूर्वी आपल्या निवृत्तिवेतनाचा काही भाग अंशराशिकृत केला आहे त्याच्या बाबतीत, त्याला नोकरीत परत घेतल्यानंतरच्या कालावधीमध्ये किंवा नोकरीत पुढे चालू ठेवल्यानंतर त्या कालावधीमध्ये निवृत्तिवेतन स्थगित करावयाचे किंवा नाही व किती प्रमाणात ते स्थगित करण्यात यावे हे ठरविताना केवळ अन-अंशराशिकृत निवृत्तिवेतन लक्षात न घेता त्याच्या निवृत्तिवेतनाची मूळची रक्कम लक्षात घेतली पाहिजे.

** **८७.** (अ) ज्या निवृत्तिवेतनधारकाला हा नियम लागू आहे त्याची नोकरीमधून सेवानिवृत्त होण्याच्या तारखेपासून दोन वर्षाच्या आत, कोणतीही खाजगी नोकरी करण्याची इच्छा असेल तर, अशा तऱ्हेची नोकरी स्विकारण्यासाठी त्याने महानगरपालिका आयुक्तांची पूर्व मंजूरी घेतली पाहिजे. ज्या निवृत्तिवेतन धारकाने अशा तऱ्हेची पूर्व मंजूरी न घेता खाजगी नोकरी स्विकारली आहे त्याच्या बाबतीत तो अशा रितीने जोपर्यंत त्या नोकरीत आहे अशा कोणत्याही कालावधीसाठी किंवा महानगरपालिका आयुक्त ज्या दीर्घ मुदतीसाठी आदेश देतील त्या मुदतीसाठी, त्याला निवृत्तिवेतन देता येणार नाही.

मात्र, ज्या महानगरपालिका कर्मचाऱ्याला तो सेवानिवृत्तिपूर्वीच्या रजेवर असताना त्या कालावधीमध्ये विशिष्ट प्रकारची खाजगी नोकरी स्वीकारण्यास योग्य त्या प्राधिकाऱ्याने मंजूरी दिली असेल तर त्याच्या बाबतीत, तो नोकरीमधून सेवानिवृत्त झाल्यानंतर, अशा खाजगी नोकरीमध्ये अशा तऱ्हेने काम करण्याचे पुढे चालू ठेवण्यास नंतर परवानगी घेण्याची आवश्यकता नाही.

**टीप** : जे निवृत्तिवेतनधारक सेवानिवृत्त होण्यापूर्वी अगदी अगोदर स्थायी समितीच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली होते त्यांच्या बाबतीत या नियमान्वये महानगरपालिका आयुक्तांना जे अधिकार दिले आहेत ते अधिकार स्थायी समिती अंमलात आणील.

(ब) नोकरीमधून सेवानिवृत्त होण्यापूर्वी अगदी अगोदर जो निवृत्तीवेतनधारक अभियांत्रिकी संवर्गामध्ये असेल्या पदावर होता किंवा मालमत्ता कर आकारण्यास पात्र असलेल्या मालमत्तांचे मूल्य व निरीक्षण करण्यासंबंधी असलेल्या पदावर किंवा अशा तऱ्हेने या करांची वसुली करण्यासंबंधी असलेल्या पदांवर किंवा दुकाने व इतर तत्सम व्यापारी संस्था यांच्या निरीक्षणासंबंधी असलेल्या पदांवर किंवा भांडारखरेदी संबंधीच्या पदावर किंवा अनुज्ञापत्र देण्यासंबंधीच्या

** महानगरपालिका ठराव क्र. ४९१ दि. ६ सप्टेंबर, १९७६ आणि महानगरपालिका ठराव क्र. ७५५ दि. २६ नोव्हेंबर, १९७६ अन्वये नियम ८७ मध्ये सुधारणा करण्यात आली आणि शासकीय ठराव, नगर विकास आणि सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. बीएमसी/१८७६/६८१४/युडी-क, दि. २८ मार्च, १९७७ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

पदावर होता अशा प्रत्येक निवृत्तिवेतनधारकाला आणि जे निवृत्तिवेतनधारक ज्या पदांचे कमाल वेतन प्रति मास रु. १,०००/- किंवा त्यापेक्षा जास्त आहे अशा पदांवर होते, त्या सर्व निवृत्तिवेतनधारकांना हा नियम लागू आहे.

**टीप** : कंडिका (अ) मध्ये उल्लेखिलेला दोन वर्षाचा कालावधी, ज्या महानगरपालिका कर्मचाऱ्याला नोकरीमधून सेवानिवृत्त झाल्यानंतर त्याच पदावर किंवा वरील वर्णनाच्या दुसऱ्या पदावर, खंडितकालाशिवाय, नोकरीमध्ये परत घेण्यात आले आहे, त्याच्या प्रकरणी, तो कर्मचारी नोकरीमधून अंतिमत: जेव्हा सेवानिवृत्त होईल त्या तारखेपासून धरण्यात यावा.

(क) या नियमामध्ये 'खाजगी नोकरी' म्हणजे एखाद्या कंपनीमध्ये काम करणारा एजंट, किंवा संस्थेमध्ये काम करीत असलेला एजंट म्हणून किंवा खाजगी व्यवसाय उद्योगधंदे आणि तत्सम उद्योग यामध्ये नोकरीत असलेला कर्मचारी अशी कोणत्याही प्रकारची नोकरी होय व यामध्ये अशा कंपनीमध्ये संचालक म्हणून केलेली नोकरी किंवा अशा एखाद्या संस्थेमध्ये भागीदार म्हणून केलेली नोकरी याचा देखील समावेश होतो.

(ड) सेवानिवृत्त महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या बाबतीत,या नियमाच्या प्रयोजनार्थ, वाणिज्य किंवा खाजगी सेवांमध्ये एखाद्या संस्थेचा - स्वतंत्रपणे किंवा भागीदार म्हणून सल्लागार किंवा (संमंत्रक) म्हणून व्यवसाय करणे याचाही अंतर्भाव करावा :--

(एक) व्यावसायिक अर्हता नसेल परंतु व्यवसाय स्थापण्याच्या किंवा चालवून नेण्याच्या संदर्भातील बाबी त्याच्या कार्यालयीन ज्ञानावर किंवा अनुभवावर अवलंबित असतील, किंवा

(दोन) व्यावसायिक अर्हता असेल परंतु ज्या व्यवसायांच्या बाबीमध्ये त्याच्या कार्यालयीन हुद्यामुळे त्याच्या अशिलांना अवाजवी प्रमाणात जास्त फायदा मिळत असेल, किंवा

(तीन) महानगरपालिका कार्यालयांशी किंवा महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांशी संपर्क वा संबंध येईल अशा प्रकारचे काम स्वीकारले असेल तर.

**टीप** : सर्वसाधारणपणे खालील गोष्टी (कसोटी) लक्षात घेऊन, नोकरीमधून सेवानिवृत्त झाल्यावर खाजगी नोकरी स्वीकारण्यासाठी परवानगीकरिता केलेल्या विनंतीवर निर्णय घेण्यात यावा :--

(एक) महानगरपालिका कर्मचारी नोकरीत असताना नियोजित मालकाशी त्याने अशा तऱ्हेचा काही व्यवहार केला होता का, की ज्यामुळे त्याने सदर मालकावर नोकरीत असताना काही अनुग्रह दाखविला आहे, अशी शंका उत्पन्न होते काय ?

(दोन) त्याने नोकरीत असताना जे कार्यालयीन ज्ञान आणि अनुभव मिळविला आहे, तो अनुभव व ते ज्ञान, यामुळे नियोजित मालकाचा, गैरफायदा (अवाजवी) होईल अशा तऱ्हेची त्याची खाजगी नोकरी आहे काय ?

(तीन) त्याची नोकरी अशा प्रकारची आहे काय की ज्यामुळे त्याचा संघर्ष महानगरपालिकेच्या हितसंबंधाशी होईल ?

(चार) नियोजित व्यवसाय हा संपूर्णपणे प्रसिध्द अशा स्वरुपाचा आहे काय ?

(पाच) परवानगी देण्यात आली नाही तर त्यामुळे खरोखरच त्रास होईल अशा स्वरुपाची कोणतीही अपवादात्मक परिस्थिती आहे काय ?

# विभाग बारा*

# सुधारित कुटुंब निवृत्तिवेतन योजना

*(या योजनेच्या शीर्षकामधील बदलाचा अंमल दि. १-१०-१९७७ पासून दिलेला आहे.

** **८८. (१)** या विभागामधील नियमांना सुधारित कुटुंब निवृत्तिवेतन नियम असे संबोधण्यात यावे. (नावामधील बदल दि. १-१०-१९७७ पासून अंमलात आला आहे.)

*** **८८ (२) :** म. न. पा. च्या नोकरीत असताना किंवा, सेवानिवृत्तिनंतर मृत्यू झाल्याच्या प्रकरणी मृत्यूच्या वेळी सेवानिवृत्त म. न. पा. कर्मचाऱ्याला भरपाई असमर्थता, अनुकंपा, पूर्ण सेवा निवृत्तिवेतन, किंवा नियतवयोमानानुसार निवृत्तिवेतन मिळत असेल तर, कुटुंब निवृत्तिवेतन अनुज्ञेय होईल. नोकरीत असताना मृत्यू आल्याच्या प्रकरणी, मृत्यूच्या दिनांकाला म. न. पा. च्या नोकरीत किमान एक वर्षाचा कालावधी पूर्ण केलेल्या सर्व हंगामी व कायम म. न. पा. कर्मचाऱ्यांना कुटुंब निवृत्तिवेतन अनुज्ञेय होईल. मात्र नियम २ च्या उप-नियम (२) मध्ये संदर्भित केलेल्या कर्मचाऱ्यांच्या प्रकरणी, या योजने अन्वये कुटुंब निवृत्तिवेतन अनुज्ञेय होणार नाही.

---

* महानगरपालिका ठराव क्र. १५१४ दि. ९ फेब्रुवारी १९८१ अन्वये विभाग बारा च्या संज्ञेमध्ये (शिर्षकामध्ये) सुधारणा करण्यात आली आणि दि. १ ऑक्टोबर १९७७ पासून अंमल देण्यात आला.

** महानगरपालिका ठराव क्र. १४, दि. २५ एप्रिल १९७८ अन्वये नियम ८८ (१) सुधारण्यात आला आणि शासकीय ठराव, नगरविकास आणि सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. बीएमसी/ १३७८/१८५९/युडी-३, दि. ३१ मार्च, १९७८ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

*** प्रशासकांचा (स्थायी समिती) ठराव क्र. १५७७ दि. १६ मार्च १९८५, प्रशासकांचा (महानगरपालिका) ठराव क्र. १६६२ दि. २७ मार्च १९८५ अन्वये नियम ८८(२) सुधारण्यात आला आणि शासन ठराव क्र. बीएमसी/१३८८/५५६१/सीआर-४८८-८८ नि.वे.-२१ दि. १८-९-८९ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली. स्थायी समिती ठराव क्र. १४९७ दि. ५-२-९२ म.न.पा. ठराव क्र. ९८० दि. २१-१२-९२ अन्वये नियम ८८(२) मध्ये सुधारणा करण्यात आली आणि शासन ठराव क्र. बीएमसी-१३९३/६६७/सीआर-१२५/९३/युडी-२१ दि. ३१-१-२००० अन्वये निश्चिती देण्यात आली.

आणखी अशी तरतूद आहे की, नोकरीत असताना मृत्यू आल्याच्या प्रकरणी, मृत्यूच्या दिनांकाला, म. न. पा. च्या नोकरीत एक वर्षाची सलग सेवा पूर्ण न केलेल्या सर्व हंगामी अथवा, कायम म. न. पा. कर्मचाऱ्यांना देखील कुटुंब निवृत्तिवेतन अनुज्ञेय होईल. मात्र संबंधित मृत म. न. पा. कर्मचाऱ्याची, नोकरीमधील नियुक्तीच्या लगतपूर्वी अथवा, त्याच्या मृत्यूच्या तारखेच्या पूर्वी, उचित वैद्यकीय प्राधिकाऱ्याने वैद्यकीय तपासणी केली असली पाहिजे, आणि म. न. पा. च्या नोकरीसाठी प्राधिकाऱ्याने त्याला 'पात्र' म्हणून घोषित केले असले पाहिजे.

**टीप :-** ज्या महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांना, ही सुधारणा अंमलात येण्याच्या पूर्वी, अनुकंपा-निवृत्तिवेतन मिळत आहे/होते त्या कुटुंबालादेखील, ही सुधारणा अंमलात येण्याच्या तारखेपासून, या नियमान्वये कुटुंब निवृत्तिवेतन अनुज्ञेय होईल.

*८८ (३) : (अ) या नियमाच्या तरतुदींसापेक्ष, मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबाला खाली दर्शविलेल्या प्रमाणात कुटुंब निवृत्तिवेतन अनुज्ञेय होईल :--

| महानगरपालिका कर्मचाऱ्याचे वेतन | मासिक कुटुंब निवृत्तिवेतन |
|---|---|
| एक) रु. १५००/--पर्यंत | वेतनाच्या ३०% परंतु कमीत कमी रु. ३७५/-- |
| दोन) रु. १५००/– व जास्त | वेतनाच्या २०% परंतु कमीत कमी रु. ४५०/-- |
| तीन) रु. ३०००/– व जास्त | वेतनाच्या १५% परंतु कमीत कमी रु. ६००/-- आणि जास्तीत जास्त रु. १२००/– |

* ब) एक) श्रमिक भरपाई अधिनियम १९२३ (१९२३ चा ८ वा) लागू न होणारा महानगरपालिका कर्मचारी सात वर्षाहून कमी नाही इतकी सलग (अखंडित) सेवा केल्या नंतर सेवेत असताना मृत्यू पावला तर, त्याला मिळालेल्या वेतनाच्या ५०% रक्कम, किंवा पोटनियम (३) खंड (अ) नुसार, अनुज्ञेय असणाऱ्या कुटुंब निवृत्तिवेतनाच्या दुप्पट रक्कम, यांपैकी जी कमी असेल त्या रकमेएवढा त्या कुटुंबाला प्रदेय होणाऱ्या कुटुंब निवृत्तिवेतनाचा दर असेल आणि अशी अनुज्ञेय रक्कम, महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या मृत्यूच्या दिनांकानंतरच्या दिनांकापासून सात वर्षाचा कालावधी किंवा मृत महानगरपालिका कर्मचारी हयात राहिला असता तर तो ज्या दिनांकास ६५ वर्षे वयाचा झाला असता त्या दिनांकापर्यंतचा कालावधी, यापैकी कमी असेल त्या कालावधीसाठी प्रदेय होईल.

दोन) महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या सेवा निवृत्तिनंतर मृत्यू झाल्यास, पोटकलम (ब) (एक) अनुसार, निर्धारित केलेले कुटुंब निवृत्तिवेतन सात वर्षाचा कालावधी किंवा सेवानिवृत्त महानगरपालिका कर्मचारी हयात राहिला असता तर ज्या दिनांकास तो ६५ वर्षे वयाचा झाला असता त्या दिनांकापर्यंतचा कालावधी, यापैकी कमी असेल त्या कालावधीसाठी, प्रदेय राहील.

मात्र, कोणत्याही परिस्थितीत, या खंडाच्या उपखंड (दोन) अनुसार, निर्धारित केलेली कुटुंब निवृत्तिवेतनाची रक्कम महापालिका सेवेतून निवृत्त झाल्यानंतर प्राधिकृत केलेल्या निवृत्तिवेतनाहून अधिक होता कामा नये.

आणखी असे की, सेवानिवृत्तिनंतर प्राधिकृत केलेली निवृत्तवेतनाची रक्कम पोटनियम (३) खालील अनुज्ञेय कुटुंब निवृत्तिवेतनाच्या रकमेहून कमी असेल तेव्हा, या कलमाखाली निर्धारित केलेली कुटुंब निवृत्तवेतनाची रक्कम पोटनियम (३) (अ) खालील अनुज्ञेय कुटुंब निवृत्तिवेतनाच्या रकमेइतकी मर्यादित असेल.

**टीप :-** दि. १-१-१९७५ पूर्वी नियम ८८ (३) (अ) अनुसार अनुज्ञेय असलेली कुटुंब निवृत्तिवेतनाची रक्कम ही, कर्मचाऱ्याच्या निवृत्तिवेळी मंजूर केलेल्या निवृत्तिवेतनाच्या रकमेपेक्षा जास्त असेल तर, मंजूर केली जाणारी कुटुंब निवृत्तिवेतनाची रक्कम ही, त्या रकमेपेक्षा कमी असता कामा नये.

**स्पष्टीकरण :–** या खंडाच्या प्रयोजनासाठी, सेवानिवृत्तिनंतर मंजूर केलेल्या निवृत्तिवेतनामध्ये, महानगरपालिका कर्मचाऱ्याने मृत्यूपूर्वी अंशराशिकरण केलेला असेल तो निवृत्तिवेतनाचा भाग समाविष्ट असतो.

* (क) (एक) श्रमिक भरपाई अधिनियम १९२३ (१९२३ चा ८ वा) लागू होणारा महानगरपालिका कर्मचारी, सात वर्षाहून कमी नाही इतकी सलग (अखंडित) सेवा केल्यानंतर सेवेत असताना मृत्यू पावला तर, त्याच्या कुटुंबाला प्रदेय असलेल्या कुटुंब निवृत्तिवेतनाचा दर हा, त्याला मिळालेल्या वेतनाच्या ५०% रक्कम किंवा कु. नि. वे. च्या दीडपट रक्कम, यापैकी जी कमी असेल ती देय होईल.

---

* स्थायी समितिचा ठराव क्र. ४२ दि. १९ एप्रिल १९८९, महानगरपालिका ठराव क्र. ३१९, दि. १ सप्टेंबर १९८९ अन्वये नियम ८८ (३) ३(ब) (दोन) (क) (दोन) सुधारण्यात आला आणि शासन ठराव क्र. बीएमसी/१३९३/६६७/सीआर - १२५/९३/-युडी-२१ दि. ३१ जानेवारी २००० अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

(दोन) उपखंड (१) अनुसार अशा प्रकारे निश्चित केलेले कुटुंब निवृत्तिवेतन खंड (ब) (एक) मध्ये उल्लेखिलेल्या कालावधीकरिता प्रदेय असेल.

मात्र, पूर्वोक्त अधिनियमाखाली भरपाई प्रदेय नसेल तेव्हा, खाते प्रमुख, मृत महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे कुटुंब पूर्वोक्त अधिनियमाखालील कोणतीही भरपाई मिळण्यास पात्र नाही. अशा अर्थाचे प्रमाणपत्र प्रमुख लेखापालांच्या कार्यालयाकडे पाठवितील आणि त्या कुटुंबाला, कलम (ब) (एक) मध्ये उल्लेखिलेल्या प्रमाणात व कालावधीसाठी कुटुंब निवृत्तिवेतन दिले जाईल.

(ड) पोटकलम (ब) (एक) आणि (दोन) मध्ये नमूद केलेला कालावधी समाप्त झाल्यानंतर त्या पोटकलमान्वये कुटुंब निवृत्तिवेतन घेणाऱ्या कुटुंबाला पोट-नियम (अ) अन्वये अनुज्ञेय असलेल्या दराने कुटुंब निवृत्तिवेतन मिळेल.

**टीप १ :-** या हेतूकरीता असलेले वेतन म्हणजे मुंबई महानगरपालिका निवृत्तिवेतन नियम (१९५३) च्या नियम ५ (१) (इ) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेले, जे सेवेत असताना मृत्यू पावलेल्या व्यक्तिला तिच्या मृत्यूच्या दिनांकाला मिळत असलेले अथवा कर्मचारी नोकरीमधून सेवानिवृत्त होण्याच्या लगोलग अगोदर घेत असलेले वेतन होय. जर ती व्यक्ती नोकरीत असताना मृत्यू पावल्याच्या दिनांकाला किंवा, सेवानिवृत्तीच्या लगोलग अगोदर रजेवर असल्यामुळे कामावर गैरहजर असली (असाधारण रजेच्या समावेशासह) किंवा नोकरीतून तिला निलंबित केले असेल किंवा ती व्यक्ती रजेविना अनुपस्थित असेल तर, वेतन म्हणजे ती व्यक्ती रजेवर जाण्यापूर्वी, तिला नोकरीमधून निलंबित करण्यापूर्वी, किंवा रजेविना अनुपस्थित राहण्यापूर्वी लगोलग जे वेतन घेत असेल ते वेतन होय. (दि. १-७-१९८५ रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्तझालेल्या अथवा, मृत्यू पावलेल्या आणि दि. १-७-१९८५ पूर्वी लगोलग अगोदर रजेवर असलेल्या, महानगरपालिकेच्या वेतनश्रेण्यांमधील महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्याबाबतीत 'वेतन' या संज्ञेमध्ये नियम ५ (१) (इ) (तीन) मध्ये व्याख्या केलेल्या वेतन घटकांचा देखील समावेश होईल. आणि दि. १-१-१९८६ रोजी किंवा त्यानंतर सेवा निवृत्त झालेल्या अथवा, मृत्यू पावलेल्या आणि दि. १-१-१९८६ पूर्वी लगोलग अगोदर रजेवर असलेल्या, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतन श्रेण्यांमधील महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्याबाबतीत, 'वेतन' या संज्ञेमध्ये, नियम ५ (१) (इ) (चार) व (पाचमध्ये) व्याख्या केलेल्या वेतन घटकांचा समावेश होईल.)

*** टीप - २ :** वरीलप्रमाणे गणना करून आलेली कुटुंब निवृत्तीवेतनाची रक्कम पुढील रुपयांत पूर्णांकात करावी. (शासनाने या सुधारणेस निश्चिती दिल्याच्या दिनांकानंतरच्या महिन्याच्या पहिल्या तारखेपासून ह्या टीपेचा अंमल दिला जाईल.)

*** टीप - ३ :** उपरोक्त टीप -२ मध्ये संदर्भित केल्याप्रमाणे शासकीय ठरावाच्या तारखेपूर्वीच्या कालावधीतील कुटुंब निवृत्तीवेतनाची रक्कमदेखील शासनाच्या ठरावाच्या तारखेनंतरच्या महिन्याच्या पहिल्या तारखेपासून पुढील रुपयात पूर्णांकांत करावी.

(महानगरपालिकेच्या वेतनश्रेण्यांमधील महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्याबाबतीत दिनांक १-७-१९८५ पासून प्रभाव देण्यात येईल. आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्यांमधील महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्याबाबतीत दि. १-१-१९८६ पासून प्रभाव देण्यात येईल.)

**८८. (४)** ह्या योजनेच्या प्रयोजनार्थ, महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या खालील नातेवाईकांचा 'कुटुंब' ह्या संज्ञेमध्ये समावेश होईल.

(अ) महानगरपालिका पुरुष कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, 'पत्नी'

(ब) महानगरपालिका स्त्री कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, 'पती'

(क) अज्ञान मुलगे (पुत्र) आणि

(ड) अविवाहित अज्ञान कन्या

**टीप (१)** सेवानिवृत्त होण्यापूर्वी कायदेशीररित्या दत्तक घेतलेल्या मुलांचा (क) आणि (ड) ह्यामध्ये समावेश होतो.

** **टीप (२)** सेवानिवृत्तीनंतर केलेला विवाह देखील, महानगरपालिकेमध्ये सुधारित कुटुंब निवृत्तीवेतन योजना लागू केल्याच्या दिनांकापासून, म्हणजेच १-१-१९६४ पासून, या प्रयोजनार्थ मान्य समजण्यात येईल.

---

* महानगरपालिका ठराव क्र. १५१४ दि. ९ फेब्रुवारी, १९८१ अन्वये नियम ८८(३) ची टीप २ व टीप ३ चा समावेश केलेला आहे, आणि शासकीय ठराव, नगर विकास क्र. बीएमसी/ १३८१/११/युडी-३ दि. १० फेब्रुवारी १९८३ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

* * स्थायी समिती ठराव क्र. ९४५ दि. १४ ऑक्टोबर १९९२ महानगरपालिका ठराव क्र. ८८९, दि. २१ डिसेंबर १९९२ अन्वये नियम ८८ (४) ची टीप (२) सुधारण्यात आली आणि शासकीय ठराव क्र. बीएमसी/१३९३/६६७/सीआर-१२५/९३-युडी २१ दि. ३१ जानेवारी २००० अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

*** ८८ (५)** निवृत्ती वेतन खाली दर्शविल्याप्रमाणे देता येईल.

अ) विधवा/विधुर यांच्या बाबतीत, मृत्यू किंवा पुनर्विवाह यांमधील जी अगोदरची तारीख असेल तोपर्यंत.

ब) मुलाच्या बाबत तो २१ वर्षाचा होईपर्यंत.

क) अविवाहित मुलीच्या बाबत ती २४ वर्षाची होईपर्यंत किंवा तिचे लग्न होईपर्यंत यामधील जी अगोदरची तारीख असेल तोपर्यंत. (वरील सुधारीत नियम (ब) व (क) दिनांक २९-३-१९७८ म्हणजेच शासनाने अंमल दिलेल्या तारखेपासून अंमलात येईल.) मात्र जर महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या मुलाला वा मुलीला जे शारीरिकदृष्ट्या अपंग वा असमर्थ वा मानसिक रुग्ण आहेत की, ज्यामुळे मुलाच्या बाबत २१ वर्षे पूर्ण झाल्यानंतर आणि अविवाहित मुलीच्या बाबत २४ वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्याला/तिला उपजिविकेकरिता कमाई करणे कठीण असल्यामुळे अशा मुलाला वा मुलीला खालील अटीसापेक्ष कुटुंब निवृत्ती वेतन देण्यात येईल.

(एक) जर महानगरपालिका कर्मचाऱ्याचा अपंग प्रकारचा मुलगा वा मुलगी, जर दोन मुलापैकी एक वा अधिक मुलांमधील असेल तर बाब क्र. (सहा) मध्ये क्रम निश्चित केल्यानुसार प्रारंभी निवृत्ती वेतन हे अज्ञान मुलाला देण्यात येईल, शेवटचे अज्ञान मुल २१ वा २४ वर्षे वयाचे होईपर्यंत, यथास्थिती, देण्यात येईल आणि त्यानंतर मुलगा वा अविवाहित मुलगी जो /जी मानसिक रुग्ण, मानसिक दृष्ट्या दुर्बल वा शारिरीकदृष्ट्या अपंग वा असमर्थ असेल अशांना कुटुंब निवृत्ती वेतन लागू होईल आणि त्याला/तिला हयातभर देण्यात येईल.

(दोन) मानसिक रुग्ण वा दुर्बल, शारिरीकष्ट्या अपंग वा असमर्थ असा मुलगा वा मुलगी जर एकापेक्षा अधिक असतील तर कुटुंब निवृत्ती वेतन हे खालील क्रमानुसार देण्यात येईल. म्हणजेच :--

(अ) प्रथमत: मुलास देण्यात येईल आणि जर एकापेक्षा जास्त मुले असतील तर मोठ्याचा मृत्यू झाल्यानंतर लहान मुलास कुटुंब निवृत्ती वेतन दिले जाईल.

---

* प्रशासकांचा (स्थायी समिती) ठराव क्र. १५७७ दि. १६ मार्च १९८५, प्रशासकांचा (महानगरपालिका) ठराव क्र. १६६२ दि. २७ मार्च १९८५ अन्वये नियम ८८(५) सुधारण्यात आला आणि शासन ठराव क्र. बीएमसी/१३८५/८८(६) दि. १२ मे १९८६ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली आणि स्थायी समिती ठराव क्र. ९४५ दि. १४ ऑक्टोबर १९९२ आणि २१ डिसेंबर १९९२ नुसार सुधारित करण्यात आला व शासन ठराव क्र. बीएमसी/१३९३/६६७/सीआर-१२५/९३ युडी-२१, दि. ३१ जानेवारी २००० अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

(ब) नंतर मुलीस देण्यात येईल आणि जर एकापेक्षा अधिक मुली असतील तर मोठ्या मुलीच्या मृत्युनंतर लहान मुलीस कुटुंब निवृत्ती वेतन देण्यात येईल.

(तीन) अशा मुलाला वा मुलीला तो/ती अज्ञान आहे असे समजून पालकामार्फत कुटुंब निवृत्ती वेतन देण्यात येईल.

(चार) अशा मुलाला वा मुलीला कुटुंब निवृत्ती वेतन हयातभर देण्याआधी मंजूर करणाऱ्या प्राधिकाऱ्यांचे समाधान झाले पाहिजे की, अपंगत्व हे अशा तऱ्हेने आहे की त्यामुळे त्याला/तिला उपजिवीकेकरिता कमाई करण्यास असमर्थ आहे आणि याला आधार म्हणून ज्या कर्मचाऱ्यांचे कुटुंब मुंबई बाहेर राहते त्यांच्या बाबत सिव्हिल सर्जनद्वारा साक्षांकन केलेले आणि वैद्यकीय अधिकाऱ्याद्वारा दिल्या गेलेल्या आणि मुंबईत राहाणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालयातून दिला गेलेला व मुलाच्या/मुलीच्या अचूक मानसिक व शारिरीक वस्तुस्थिती संबंधीचा असल्याद्वारे त्याला दुजोरा दिला असला पाहिजे.

(पाच) अशा मुलाचे/मुलीचे पालक म्हणून ज्या व्यक्तींना कुटुंब निवृत्ती वेतन मिळते त्यांनी वरील बाब क्रमांक ४ मध्ये विहित केलेल्या संबंधित वैद्यकीय प्राधिकाऱ्याद्वारे, तो/ती अजून मानसिक रुग्ण वा शारिरिकदृष्ट्या अपंग वा असमर्थ आहे असा साक्षांकित केलेला दाखला प्रत्येक तीन वर्षाने सादर केला पाहिजे.

**स्पष्टीकरण :**

(अ) दि. २-७-१९९१ पासून वगळण्यात आला.

(ब) या उपनियमाखाली, मुलीचे लग्न झाल्याच्या तारखेपासून ती कुटुंब निवृत्ती वेतनाकरिता अपात्र ठरेल.

(क) त्याने/तिने उपजिवीकेकरिता अर्थार्जन करण्यास सुरुवात केली तर त्याला/तिला देण्यात येणारे कुटुंब निवृत्त वेतन बंद करण्यात येईल.

(ड) अशा प्रकरणी प्रमुख लेखापालांना प्रत्येक महिन्याला -

(१) त्याने/तिने अजून त्याच्या/तिच्या उपजिवीकेकरिता अर्थार्जन करण्यास सुरवात केलेली नाही आणि

(२) मुलीच्या बाबत तिने अजून विवाह केलेला नाही अशी प्रमाणपत्रे पालकाने सादर करणे हे त्यांचे कर्तव्य राहील.

(सहा) जर मुलगा आणि अविवाहित मुलगी हयात असताले तर या उपनियमाखाली लहान मुलगा २१ वर्षाचा होईपर्यंत अविवाहित मुलीला हयातभर कुटुंब निवृत्तीवेतन मिळणार नाही आणि त्यानंतर कुटुंब निवृत्ती वेतन मिळू शकेल.

(नियम ८८ (५) च्या वरील परंतुकास दि. १२-८-१९७६ पासून म्हणजेच ज्या तारखेपासून राज्य शासनाने अमंल दिला आहे तेव्हांपासून अंमल देण्यात येईल.)

* **८८ (६)** या योजनेखाली देण्यात येणारे निवृत्ती वेतन महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या कुटुंबातील एकापेक्षा अधिक माणसाना एकाच वेळी देता येणार नाही, ते प्रथमत: विधवेला/ विधुराला आणि त्यानंतर मुलाला त्याच्या वयाच्या २१ व्या वर्षापर्यंत आणि अविवाहित मुलीच्या बाबत ती २४ वर्षाची होईपर्यंत देण्यात येईल.

****८८ (७)** विधवेच्या/विधुराच्या पुनर्विवाहाची अथवा मृत्यूची घटना घडल्यास, मुलाला किंवा अविवाहित मुलीला, यथास्थिती, त्याने/तीने अनुक्रमे वयाची २१ वर्षे वा २४ वर्षे पूर्ण करेपर्यंत, निवृत्तिवेतन देण्यात यावे. ज्या प्रकरणी अज्ञान मुलाला/मुलीला कुटुंब निवृत्तिवेतनाची रक्कम प्रदेय आहे, त्या प्रकरणी त्या मुलाच्या/मुलीच्या पालकाने महानगरपालिका आयुक्तांनी विहीत केलेल्या प्रपत्रांमध्ये पालकत्वसंबंधिचे क्षतिपूर्ति बंधपत्रक (हमीपत्र) आणि शपथपत्र सादर केल्यानंतर, त्या अज्ञात मुलाच्या/मुलीच्या वतीने कुटुंबनिवृत्तिवेतनाची रक्कम त्या पालकाला देण्यात येईल. तथापि वादग्रस्त प्रकरणांमध्ये कायेदेशीर पालकांमार्फत रक्कम दिली जाईल.

**टीप -१ :-** या नियमाच्या प्रयोजनार्थ अठरा वर्षे वयाच्या खालील मुलगा/अविवाहित मुलगी ही अज्ञान मुले म्हणून समजण्यात येईल.

---

* प्रशासकांचा (स्थायी समितिचा) ठराव क्र. १५७७ दि. १६ मार्च १९८५ प्रशासकांचा (महानगरपालिका) ठराव क्र. १६६२ दि. २७ मार्च १९८५ अन्वये नियम ८८ (६) सुधारण्यात आला आणि शासन ठराव क्र. बीएमसी/१३८५/८८(६) दि. १२ मे १९८६ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

** स्थायी समितिचा ठराव क्र. १४९७, महानगरपालिका ठराव क्र. ९८० दि. २१ डिसेंबर १९९२ अन्वये नियम ८८ (७) सुधारण्यात आला आणि शासन निर्णय क्र. बीएमसी/१३९३/६६७/ सीआर - १२५/९३/-युडी-२१ दि. ३१ जानेवारी २००० अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

**टीप - २** : हिंदू अथवा ख्रिस्ती आईच्या बाबतीत स्वाभविक (नैसर्गिक) पालक म्हणून क्षतिपूर्ती बंधपत्र (हमीपत्र) अथवा शपथपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही.

* **८८ (८)** वगळण्यात आला आहे.

**८८ (९)** या योजनेखालील कुटुंब निवृत्तिवेतनाला पात्र असलेले विधवा/विधुर इतर कोणत्याही नियमाखालील कुटुंब निवृत्तिवेतनाला पात्र ठरणार नाहीत.

**८८ (१०)** निवृत्तिवेतनाचे जरी अंशराशिकरण केले असेल तर त्याचा कुटुंब निवृत्तिवेतनाच्या रकमेवर काही परिणाम होणार नाही. कारण कुटुंब निवृत्तिवेतनाचा दर, त्याला मंजूर झालेल्या निवृत्तिवेतनावर आधारित नसून महानगरपालिका कर्मचारी त्याच्या सेवानिवृत्तीच्या पूर्वी अगदी आधी जे वेतन घेत होता, त्यावर आधारित असतो.

** **८८ (११)** पती/पत्नी अथवा दत्तक घेतलेल्या मुलांसह अज्ञान मुले यांच्याशिवाय असलेल्या, सेवानिवृत्त होणाऱ्या किंवा नोकरीमध्ये असताना निधन पावणाऱ्या महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या बाबतीत, अविवाहितांच्या बाबतीतल्याप्रमाणे, दोन महिन्यांचे वेतन उपदानामधून वजा केले जाणार नाही.

---

* महानगरपालिका ठराव क्र. १२९० दि. ९ ऑक्टोबर १९७८ अन्वये नियम ८८ (८) वगळण्यात आला आणि शासकीय ठराव नगरविकास आणि सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. बीएमसी/१३७९/१३८५/युडी-३ दि. २४ जुलै १९७९ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली आहे. दि. १ ऑक्टोबर १९७७ पासून अंमल दिलेला आहे.

** महानगरपालिका ठराव क्र. ४७७ दि. ९ ऑगस्ट १९७१ अन्वये नियम ८८ (११) सुधारण्यात आला आणि शासकीय ठराव नगरविकास आणि सार्वजनिक आरोग्य आणि गृहनिर्माण विभाग क्र. बीएमसी/१०७१/५५३२८/-क दि. ७ जानेवारी १९७२ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली आहे. दि. ७ जानेवारी १९७२ पासून अंमल दिलेला आहे.

जॉब - ११११६ (म. २)

***८८ (१२)** या योजनेमुळे सुधारित कुटुंब निवृत्तिवेतन योजनेखाली येणाऱ्या महानगरपालिका कर्मचाऱ्याला त्याच्या/तिच्या वेतनाच्या अथवा निवृत्तीवेतनाच्या जोडीला कुटुंब निवृत्तिवेतन घेण्यास प्रतिबंध होणार नाही. जे महानगरपालिकेचे कर्मचारी होते असे आईवडिल दोघेही मृत्यू पावल्यास, हयात असलेल्या मुलाला अथवा मुलांना मृत माता-पित्याच्या बाबतीतील दोन्ही कुटुंब निवृत्तिवेतन ही, खाली नमूद केलेल्या मर्यादांसापेक्ष अनुज्ञेय होतील :–

**म्हणजे :--**

१) जर हयात असलेले-ही मूल अथवा मुले हे/ही नियम क्र. ८८ (३) च्या पहिल्या परंतुकामध्ये उल्लेखिल्याप्रमाणे विशेष दराने (म्हणजे सात वर्षापेक्षा कमी नाही. एवढी सलग सेवा करुन सेवेत असताना मृत्यु पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत कुटुंब निवृत्तिवेतनाच्या वाढीव दराने) दोन कुटुंब निवृत्तिवेतन मिळण्यास पात्र असेल/असतील तर दोन्ही निवृत्तिवेतनांच्या रकमेवर प्रति मास रु. २४००/– (महागाई भत्ता वगळून) एवढी मर्यादा असेल.

२) जर दोन्हीपैकी एक कुटुंब निवृत्तिवेतन हे नियम ८८ (३) च्या पहिल्या परंतुकामध्ये उल्लेखिलेल्या दराने (वर (१) मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे) देण्याचे थांबविण्यात आले आणि त्याऐवजी, नियत ८८ (३) मध्ये नमूद केलेल्या नेहमीच्या दराने निवृत्ति वेतन प्रदेय असेल तर दोन्ही निवृत्तिवेतनांच्या रकमेवर प्रति मास रु. २४००/–(महागाई भत्ता वगळून) एवढी मर्यादा असेल.

३) जर दोन्ही कुटुंब निवृत्तिवेतनचे ही नियम क्र. ८८ (३) मध्ये नमूद केलेल्या नेहमीच्या दरांनी प्रदेय असतील तर दोन्ही निवृत्तिवेतनाच्या रकमेवर प्रति मास रु. १२००/- (महागाई भत्ता वगळून) एवढी मर्यादा असेल. (या सुधारणेचा प्रभाव महानगरपालिकेच्या वेतनश्रेण्यांमधील महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या बाबतीत दि. १-७-१९८५ पासून देण्यात येईल आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्यांमधील महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या बाबतीत दि. १-१-१९८६ पासून देण्यात येतील).

---

* स्थायी समितिचा ठराव क्र. १४९७, महानगरपालिका ठराव क्र. ९८० दि. २१ डिसेंबर १९९२ अन्वये नियम ८८ (१२) सुधारण्यात आला आणि शासन निर्णय क्र. बीएमसी/१३९३/६६७/सीआर - १२५/९३/-युडी-२१ दि. ३१-१-२००० अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

*** ८८ (१३)** विभाग सात मधील कुटुंब निवृत्तीवेतनाच्या तरतुदींनी नियमित होणाऱ्या आणि नियम ४ (ड) (दोन) (अ) अन्वये पर्यायाची निवड न केल्यामुळे सुधारित कुटुंब निवृत्तिवेतन योजना, १९६५ खाली आणल्या गेलेल्या एखाद्या महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या अभिवेदनावर महानगरपालिका आयुक्त त्याला परत विभाग सात मध्ये असलेल्या कुटुंब निवृत्तिवेतनाचे फायदे घेण्याची अनुज्ञा देतील. आणि या योजनेखाली कुटुंब निवृत्तिवेतनाचा फायदा घेण्याचा त्याचा हक्क नाहीसा करतील.

(दि. १३-७-१९६८ पासून अंमलबजावणी)

**** नियम ८९ वगळण्यात आला.** (दि. ३१जानेवारी २००० पासून)

9 “ “

---

* महानगरपालिका ठराव क्र. ३४० दि. ५ जुलै, १९७१ अन्वये नियम ८८(१३) चा अंतर्भाव करण्यात आला, आणि दि. १३ जुलै १९६८ पासून म्हणजे ज्या दिनांकापासून नियम ४ड अंमलात आला त्या दिनांकापासून अंमल दिलेला आहे व शासकीय ठराव, नगर विकास, सार्वजनिक आरोग्य आणि गृहनिर्माण विभाग क्र. बीएम्सी/५३७१/५६३१८-क, दि. ७ जानेवारी, १९७२ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

* महानगरपालिका ठराव क्र. ९६० दि. २१-१२-९२ अन्वये नियम ८९ वगळण्यात आला आणि शासन निर्णय क्र. बीएमसी/१८९३/६६७/सीआर-१२५/९३ युडी-२१दि. ३१ जानेवारी २००० अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

जॉब - ११११६ (म. २)

# नवीन तरतूद * विभाग चौदा

महानगरपालिका कर्मचाऱ्यांकरिता मुदतपूर्व स्वेच्छेने सेवानिवृत्त होण्याची योजना (कृपया नियम क्र. ३४ (१) पहावा).

महानगरपालिका कर्मचाऱ्यांना अर्हकारी सेवेची २० वर्षे पूर्ण झाल्यानंतर अर्हकारी सेवेत जेथे लागू असेल तेथे पाच वर्षापर्यंतची विशेष सवलत देऊन यथाप्रमाणातील निवृत्तिवेतन आणि उपदानावर, खालील तरतुदीसापेक्ष स्वेच्छेने सेवानिवृत्त होण्याची परवानगी देता येईल :--

(अ) अर्हकारी सेवा २० वर्षाहून कमी झालेली नाही अशा महानगरपालिका कर्मचाऱ्यास सेवानिवृत्त व्हावयाचे असेल तर सेवानिवृत्त होण्याच्या दिनांकापूर्वी कमीत कमी ३ महिन्यांची लेखी सूचना योग्य त्या प्राधिकाऱ्याला देऊन त्याला सेवेमधून स्वेच्छेने सेवानिवृत्त होता येईल. ही योजना अगदी स्वेच्छाकारी असल्यामुळे पुढाकार घेणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्याच हाती आहे. त्या उलट या योजनेखाली महानगरपालिका कर्मचाऱ्यांना स्वत:हून सेवानिवृत्त करण्याचा हक्क महानगरपालिकेकडे राहत नाही.

(ब) या योजनेखाली सेवानिवृत्त होणाऱ्या महानगरपालिका कर्मचाऱ्यांना, 'पूर्णसेवा निवृत्तिवेतना' (रिटायरिंग पेन्शन) चा फायदा अनुज्ञेय होईल.

---

* महानगरपालिका ठराव क्र. ३४ दि. २० जुलै १९७८ अन्वये **विभाग चौदा** चा अंतर्भाव करण्यात आला आणि शासकीय ठराव, नगर विकास सार्वजनिक आरोग्य आणि गृहनिर्माण विभाग क्र. बीएमसी/१३७८/१८५९/युडी-३ दि. १७ नोव्हेंबर १९७८ अन्वये निश्चिती देण्यात आली. दि. १ डिसेंबर १९७८ पासून अंमल दिलेला आहे.

(क) योग्य प्रकरणामध्ये तीन महिन्यांपेक्षा कमी कालावधीची सूचनासुध्दा योग्य ते प्राधिकारी स्वीकारतील.

(ड) जर एखादा महानगरपालिका कर्मचारी देय नसलेल्या रजेवर असताना, कामावर रुजू न होता स्वेच्छेने सेवानिवृत्त होण्याच्या योजनेखाली सेवानिवृत्त झाला तर देय नसलेल्या रजेच्या सुरुवातीच्या दिनांकापासून त्याची सेवानिवृत्ती सुरू होईल, आणि अशा देय नसलेल्या रजेच्या बाबतीत दिलेले रजा वेतन, कंडिका (इ) आणि महानगरपालिका सेवा नियमावलीच्या प्रकरण अकरा, विभाग आठ खालील, सेवेत नवीन प्रवेश करणाऱ्यांसाठी असलेल्या सुधारित रजा नियमांच्या नियम ९ खालील टीपेप्रमाणे वसूल केले जाईल.

(इ) या योजनेच्या अनुषंगाने स्वेच्छेने सेवानिवृत्तीची सूचना देण्यापूर्वी महानगरपालिका कर्मचाऱ्याने योग्य प्रशासकीय प्राधिकाऱ्याशी संदर्भ करुन आपली निवृत्तीवेतनाकरिता अर्हकारी सेवा २० वर्षे पूर्ण झाली आहे, याबद्दल स्वत:ची खात्री करुन घ्यावी.

(फ) स्वेच्छेने सेवानिवृत्तीसाठी दिलेली सूचना नंतर केवळ योग्य प्राधिकाऱ्याच्या मान्यतेनेच मागे घेता येईल. मात्र, अशी मागे घेण्याची विनंती सूचनेचा कालावधी संपण्यापूर्वी केली पाहिजे.

(ग) जर सूचनेचा कालावधी संपल्यानंतरचा दिनांक, संबंधित महानगरपालिका कर्मचाऱ्याला लागू असलेल्या विद्यमान नियमांच्या म्हणजेच महानगरपालिका सेवा नियमावलीच्या नियम २०५ खाली स्वेच्छेने सेवानिवृत्त होण्याच्या दिनांकापेक्षा अगोदरचा असेल तर २० वर्षे अर्हकारी सेवा पूर्ण केल्यानंतर स्वेच्छेने सेवानिवृत्त होण्याच्या सूचनेचा योग्य प्राधिकाऱ्याने स्वीकार करणे आवश्यक आहे. सर्वसाधारणत: असा स्वीकार खालील बाबी सोडून सर्व बाबतीत केला जाईल :--

(एक) ज्या बाबतीत संबंधित महानगरपालिका कर्मचाऱ्याविरुध्द मोठी शिक्षा देण्यासाठी शिस्तभंगाची कारवाई अनिर्णित आहे किंवा करण्याचा विचार आहे आणि प्रकरणाच्या परिस्थितीनुसार संबंधित प्राधिकाऱ्याच्या मते नोकरीमधून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे अशा तऱ्हेची शिक्षा व्हावी अशी बाब आहे.

किंवा

(दोन) ज्या बाबतीत संबंधित महानगरपालिका कर्मचाऱ्याविरुध्द न्यायालयात दावा दाखल करण्याचा विचार आहे किंवा केलेला आहे, अशा बाबतीत जर स्वेच्छेने सेवानिवृत्तीची सूचना स्वीकारायची असेल तर त्याला सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता मिळवावी लागेल. जरी महानगरपालिका कर्मचाऱ्याने दिलेल्या स्वेच्छेने सेवानिवृत्तीच्या सूचनेला योग्य प्राधिकाऱ्याची स्वीकृती आवश्यक असली तरी ज्या महानगरपालिका कर्मचाऱ्याने अशी सूचना दिली असेल त्याने, जर सूचनेचा कालावधी संपण्यापूर्वी सक्षम प्राधिकाऱ्याने त्याविरुध्द आदेश काढलेला नसेल तर, ती स्वीकारलेली आहे असे गृहीत धरावे व सदर सेवानिवृत्ती सूचना पत्रानुसार सुरू होईल.

* (ह) या योजनेखाली स्वेच्छेने सेवानिवृत्त होणाऱ्या महानगरपालिका कर्मचाऱ्याला यथाप्रमाण निवृत्तीवेतन देतांना, त्याने प्रत्यक्षात केलेल्या अर्हकारी सेवेत भर म्हणून पाच वर्षापर्यंतची विशेष सवलत दिली जाईल तथापि, अशी पाच वर्षापर्यंतची विशेष सवलत देणे हे खालील अटींसापेक्ष असेल.

एक) कोणत्याही परिस्थितीत, विशेष सवलतीचा फायदा दिल्यानंतर, एकूण अर्हकारी सेवा तेहतीस वर्षाच्या अर्हकारी सेवेपेक्षा जास्त होता कामा नये आणि,

दोन) विशेष सवलतीचा फायदा दिल्यानंतर संबंधित महापालिका कर्मचाऱ्याची अर्हकारी सेवा महापालिका सेवा नियमावलींच्या नियम २०५ खालील नियत वयोमानानुसार निवृत्त होण्याच्या नेहमीच्या दिनांकापुढे जाता कामा नये.

तीन) **नवीन नियम** : महापालिका सेवा नियमावलींच्या नियम २०५ खाली तीन महिन्यांच्या सूचनेसह वयाच्या पंचावन्नाव्या वर्षी एखादा महापालिका कर्मचारी सेवानिवृत्त होत, असेल किंवा, बृहन्मुंबई महानगरपालिका सेवानिवृत्तिवेतन नियमावलींच्या नियम ३४ नुसार, तीस वर्षांच्या अर्हकारी सेवेनंतर, सेवानिवृत्त होत असेल, तर वरील (१) व (२) मध्ये उदृत केलेल्या त्याच अटींसापेक्ष त्याची अर्हकारी सेवा पाच वर्षांपेक्षा जास्त होणार नाही अशा प्रकारेदेखील वाढविण्यात यावी.

---

* स्थायी समिती ठराव क्र. १८४२ दि. १२ मार्च १९८६ महानगरपालिका ठराव क्र. ११२२ दि. २७ मार्च १९८६ अन्वये नविन तरतूद विभाग १४(ह) (एक) आणि (दोन) सूधारण्यात आला, आणि शासन निर्णय क्र. बीएमसी/१३८६/१९५५/सीआर-४७३/८६/यूडी-३ दि. ३ जानेवारी १९८९ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

**टीप** :- कर्मचाऱ्यांना खालील कारणास्तव सेवानिवृत केले असेल तर अशा म.न.पा. कर्मचाऱ्यांना योग्य त्या प्राधिकरणाद्वारे वरील संदर्भित पाच वर्षांपर्यंतचा विशेष सवलतीचा लाभ अनुज्ञेय असणार नाही.

अ) सार्वजनिक हिताच्या दृष्टीकोनातून महापालिका सेवा नियमावली नियम २०५ नुसार,

ब) तीस वर्षांची अर्हकारी सेवा पूर्ण केल्यानंतर म.न.पा. निवृत्ती वेतन नियम बृहन्मुंबई महानगरपालिका सेवानिवृत्तिवेतन नियमावलीं (१९५३) मधील नियम ३४ नुसार.

(आय्) या योजनेखाली देण्यात येणारी विशेष सवलत निवृत्तीवेतन आणि उपदानाची परिगणना करण्याकरिता अर्हकारी सेवेत फक्त भर म्हणून असेल. तिचा सेवानिवृत्तीच्या दिनांकाच्या संदर्भाने परिगणना केलेल्या प्रत्यक्ष 'वेतना'वर आधारित असलेल्या निवृत्तिवेतन आणि उपदानाची परिगणना करण्याच्या उद्देशार्थ कोणत्याही काल्पनिक वेतननिश्चितीकरिता लाभ घेण्यास स्वेच्छेने सेवानिवृत्त होणारा महानगरपालिका कर्मचारी पात्र ठरणार नाही.

(जे) विशेष सवलत देऊन देण्यात येणाऱ्या निवृत्तीवेतनाची रक्कम मुंबई महानगरपालिका निवृत्तिवेतन नियम (१९५३) च्या नियम १३ खालील तरतुदींसापेक्ष असेल. निवृत्तिवेतनसुध्दा मुंबई महानगरपालिका निवृत्तिवेतन नियम (१९५३) च्या नियम १४ खालील तरतुदींसापेक्ष असेल.

* के) मुदतपूर्व स्वेच्छा निवृत्तीची सुचना देणारा महानगरपालिका कर्मचारी सरासरीवेतन, पुर्ण वेतन वा अर्ध वेतनावरील त्याच्या खाती जमा असलेल्या रजेपैकी, सुचना कालावधी संपण्यापुर्वी रजेसाठी अर्ज करु शकतो व त्याला सुचनेच्या कालावधीतही रजा मंजूर होउ शकते आणि तो सुचनेचा कालावधी संपण्याच्या दिनांकाच्या (दुसऱ्या दिवशी महापालिका सेवतुन सेवा निवृत्त होईल.)

(एल) या योजनेखाली स्वेच्छेने सेवानिवृत्त होणाऱ्या महानगरपालिका कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन नियमांमधील निवृत्तिनंतरच्या व्यावसायिक खाजगी नोकरीविषयक तरतुदी बंधनकारक राहतील. तथापि, त्यांच्या बाबतीत निवृत्तीनंतरच्या व्यावसायिक खाजगी नोकरीसाठी महानगरपालिका सेवा नियमावलीच्या नियम २०५ किंवा मुंबई महानगरपालिका निवृत्तिवेतन नियम (१९५३) च्या नियम ३४ (दोन) आणि (तीन) यामधील तरतुदींप्रमाणे सेवानिवृत्त होणाऱ्या महानगरपालिका कर्मचाऱ्यापेक्षा उदारतेने अनुज्ञा दिल्या जातील.

---

* स्थायी समिती ठराव क्र. १८४२ दि. १२ मार्च १९८६ महानगरपालिका ठराव क्र. ११२२ दि. २७ मार्च १९८६ अन्वये नविन तरतूद विभाग १४ (के) सूधारण्यात आला, आणि शासन निर्णय क्र. बीएमसी/१३८६/१९५५/सीआर-४७३/८६/यूडी-३, दि. ३ जानेवारी १९८९ अन्वये त्याला निश्चिती देण्यात आली.

## परिशिष्ट एक

**(नियम क्र. १७ पहावा)**

**प्रपत्र एक**

---

कुटुंब निवृत्तिवेतनाच्या प्रयोजनार्थ महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या "कुटुंबाचे" तपशील :--

---

कर्मचाऱ्याचे नांव :--

खाते –

| नाव | महानगरपालिका कर्मचाऱ्याशी नाते | जन्म दिनांक | विवाहित वा अविवाहित |
|---|---|---|---|

(१) ————————————————-——————————

२) ————————————————————————————

(३) ————————————————————————————

(४) ————————————————————————————

(५) ————————————————————————————

(६) ————————————————————————————

कर्मचाऱ्याची स्वाक्षरी किंवा डाव्या हाताच्या
अंगठ्याचा ठसा.

जॉब - ११११६ (म. २)

# परिशिष्ट एक

**(नियम क्र. १७ पहावा)**

**प्रपत्र दोन**

## निवृत्तिवेतन आणि / किंवा उपदान याकरिता

(१) कर्मचाऱ्याचे नाव
(ठळक अक्षरामध्ये,
(आडनावाने सुरूवात
करून संपूर्ण नांव).

(२) पदनाम.

(३) सध्याचा पत्ता.

(४) इसवी सनाप्रमाणे
जन्मदिनांक (सेवा अभिलेखा-
मध्ये नोंद केल्याप्रमाणे).

(५) नोकरीमध्ये रुजू
झाल्याचा दिनांक.

(६) महानगरपालिकेच्या
नोकरीमध्ये प्रथम कायम
झाल्याचा दिनांक

(७) नोकरी सोडल्याचा/
समाप्तीचा दिनांक.

(८) नोकरीच्या समाप्तीचे कारण

(९) अर्हकारी सेवा वर्ष ........... महिने .......... दिवस. ..................

(१०) (एक) नियम ५ (१) (इ)
मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे.
(दोन) नियम ८८ मध्ये
व्याख्या केल्याप्रमाणे

(११) अनुज्ञेय असलेले निवृत्तिवेतन
किंवा उपदान यांचा प्रकार.

(१२) निवृत्तिवेतनार्ह वेतन रु. पै.

(१ ३) निवृत्तिवेतनाची अनुज्ञेय रक्कम रु. पै.

(१ ४) निवृत्तिवेतनधारकाच्या मृत्यूच्या प्रकरणामध्ये कुटुंब निवृत्ति-वेतनाची अनुज्ञेय होणारी रक्कम. रु.

(१ ५) निवृत्तीवेतन सुरू होण्याचा दिनांक.

(१ ६) कुटुंब निवृत्तिवेतनाच्या मागणीदारांची नावे. (त्यांचा जन्म दिनांक आणि निवृत्तिवेतनधारकाशी नाते यासह
(१)
(२)
(३)
(४)

(१ ७) इतर कोणतेही अभिप्राय.

**खाते प्रमुख.**

**खाते प्रमुखांचे अभिप्राय.**

(१) कर्मचाऱ्याचे चारित्र्य आणि मागील वर्तणूक यासंबंधी ........................................................

(२) कोणत्याही निलंबन किंवा पदावनतीचे स्पष्टीकरण ........................................................

(३) अगोदरच प्राप्त झालेले कोणतेही निवृत्तिवेतन किंवा उपदान, याविषयी ........................................................

(४) निवृत्तिवेतनदावा स्वीकारावा किंवा कसे यासंबंधी खाते प्रमुखांचे विशिष्ट मत ........................................................

(५) इतर कोणतेही अभिप्राय ........................................................

वरील तपशिलासंबंधी माझे समाधान झालेले असल्यामुळे मी रु ....................... (अक्षरी रु. .........................) एवढे निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतन / उपदान आणि रु. ..................... (अक्षरी रु. ................................) एवढे मृत्यू-नि-सेवानिवृत्ति उपदान देण्याकरिता, प्रमुख लेखापालांची त्याला अनुज्ञेयता असलेल्या प्रमाणपत्रासापेक्ष, शिफारस केलेली आहे.

**खाते प्रमुख**

असा दाखला देण्यात येत आहे की ............ वर्षे ............... महिने ............ दिवस एवढी अर्हकारी सेवा योग्य रितीने सिध्द झाली आहे आणि निवृत्तिवेतन नियमाच्या नियम क्रमांक .............. अन्वये दरमहा रु. ............. यापेक्षा जास्त नाही एवढे निवृत्तिवेतन / उपदान आणि नियम क्र. ............. खाली उपदान रु. ............... एवढे अनुज्ञेय आहे. वरील हिशेब योग्य रितीने पडताळून पाहिले आहेत. निवृत्तिवेतन दि. ............. पासून सुरू होईल. निवृत्तिवेतन नियमांच्या नियम क्र. १ ३ कडे लक्ष वेधण्यात येत आहे.

पुढे असा दाखला देण्यात येत आहे की, निवृत्तिवेतनधारकाच्या मृत्यूच्या प्रकरणामध्ये, रु. ............. एवढे कुटुंब निवृत्तिवेतन मृत्यूच्या दिनांकानंतरच्या दिनांकापासून अनुज्ञेय होईल.

**प्रमुख लेखापालांकरिता,**

प्रमुख लेखापालांनी प्रमाणित केल्याप्रमाणे निवृत्तिवेतन/उपदान/कुटुंब निवृत्तिवेतन, निवृत्तिवेतन नियमांच्या तरतुदींसापेक्ष, मंजूर केले आहे.

**मंजूरी देणारा प्राधिकारी.**

जॉब - ११११६ (म. २)

## अखेरच्या दहा महिन्यांमध्ये घेतलेले ‘वेतन’ दर्शविणारे विवरणपत्र

| महिना | वर्ष | | | वर्ष | | | वर्ष | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | दिवसांची संख्या | रु. | पै. | दिवसांची संख्या | रु. | पै. | दिवसांची संख्या | रु. | पै. |
| जानेवारी | | | | | | | | | |
| फेब्रुवारी | | | | | | | | | |
| मार्च | | | | | | | | | |
| एप्रिल | | | | | | | | | |
| मे | | | | | | | | | |
| जून | | | | | | | | | |
| जुलै | | | | | | | | | |
| ऑगस्ट | | | | | | | | | |
| सप्टेंबर | | | | | | | | | |
| ऑक्टोबर | | | | | | | | | |
| नोव्हेंबर | | | | | | | | | |
| डिसेंबर | | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | | |

निवृत्तिवेतनार्ह वेतन रु. ................

## "अर्हकारी सेवे" चा अभिलेख

| आस्थापना | नेमणुकीचे स्वरुप | सुरुवातीचा दिनांक | समाप्तीचा दिनांक | कर्तव्याचा एकूण कालावधी | | | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | वर्ष | महिने | दिवस | |
| | | | | | | | |

टीप – निलंबन कालावधी, व जर असेल तर, त्यातील माफ न केलेला कालावधी, रजेशिवाय अनुपस्थित असल्याचा कालावधी आणि परकीय सेवेमधील ज्या कालावधीकरिता निवृत्तिवेतनाबद्दलचे अंशदान भरले नसेल तो कालावधी अभिप्रायांकरिता असलेल्या स्तंभात स्वतंत्रपणे दाखविण्यात यावा.

# नोकरीच्या अखेरच्या १० महिन्यांमधील रजा इत्यादींचा अभिलेख

| अ | | | | | | ब | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रजा | | | | | | कामावरील दुसरी कुठलीही अनुपस्थिती | | | | | |
| रजेचे स्वरुप | पासून | पर्यंत | वर्ष | महिने | दिवस | रजेचे स्वरुप | पासून | पर्यंत | वर्ष | महिने | दिवस |
| | | | | | | | | | | | |

खाते प्रमुख

## परिशिष्ट एक

### प्रपत्र तीन

खाते

## ज्ञाप

दिनांक ........................

प्रति,

श्री / श्रीमती .........................................

.........................................................

.........................................................

**विषय : स्व. श्री / श्रीमती .......................**

**यांच्याबाबतीतील कुटुंब निवृत्तिवेतनाच्या अधिदानासंबंधी**

मला खेदपूर्वक समजले आहे की, श्री / श्रीमती ......................................... खाते ................................ यांचे निधन झालेले आहे. मुंबई महानगरपालिका निवृत्तिवेतन नियमांच्या (१९५३) नियम क्र. ८८ च्या तरतुदीनुसार तुम्हाला कुटुंब निवृत्तिवेतन अनुज्ञेय होईल हे कळविण्यात येत आहे.

त्याप्रमाणे कुटुंब निवृत्तिवेतन मिळण्याकरिता खालील कागदपत्रांसह सोबत जोडलेल्या प्रपत्र चारच्या दोन प्रतींमध्ये तुम्ही रीतसर दावा सादर करावा असे मी सुचवित आहे.

(१) मृत्यू प्रमाणपत्र.

(२) जर अज्ञान मुलांना निवृत्तिवेतन अनुज्ञेय असेल तर पालकत्वाचा दाखला.

(पदनाम)

जॉब - ११११६ (म. २)

# परिशिष्ट एक

**प्रपत्र – चार**

**अर्जाचा नमुना (सुधारित कुटुंब निवृत्तिवेतन योजना, १९६५)**

.......................................................... या कार्यालयामधील / खात्यामधील स्व. श्री. / श्रीमती .........................................................................यांच्या कुटुंबाचा कुटुंब निवृत्तिवेतनाकरिता अर्ज.

(१) अर्जदाराचे नाव ......................................................................
(ठळक अक्षरांमध्ये, आडनावाने सुरुवात करुन)

(२) महानगरपालिका मृत कर्मचारी / निवृत्तिवेतनधारकाशी नाते ................................

(३) विवाहाचा दिनांक ....................................

(४) मृत कर्मचाऱ्याच्या हयात नातलगांची नावे आणि वय

| | नाव | जन्मदिनांक (इसवी सनाप्रमाणे) |
|---|---|---|
| विधवा / विधुर | | |
| पुत्र | | |
| (१) | | |
| (२) | | |
| (३) | | |
| अविवाहित कन्या | | |
| (१) | | |
| (२) | | |
| (३) | | |

(५) स्व. श्री. / श्रीमती यांची / यांचे विधवा पत्नी / विधुर पती / यांच्या अज्ञान मुलांचे पालक श्री./श्रीमती यांच्या वर्णनाची यादी.

(अ) जन्मदिनांक (इसवी सनाप्रमाणे) (ब) उंची

(क) हात किंवा चेहऱ्यावर, जर असतील तर वैयक्तिक खुणा

---

टीप :–कुटुंब निवृत्तिवेतनाच्या अर्जासोबतच्या वर्णनाची यादी स्तंभ क्र. (५) आणि स्वाक्षरी किंवा डाव्या हाताचा अंगठा व बोटांचे ठसे या संबंधीची माहिती दोन प्रतींमध्ये (दोन स्वतंत्र तक्त्यामध्ये) सादर करावयास हवी. त्या प्रती २ राजपत्रित अधिकारी किंवा अर्जदार ज्या ठिकाणी राहत असेल त्या शहर, गाव किंवा परगाण्यामधील मान्यवर व्यक्तीने साक्षांकित केलेल्या असल्या पाहिजेत.

जॉब - ११११६ (म. २)

(ड) डाव्या हाताचा अंगठा आणि बोटांचे ठसे.

| करंगळी | अनामिका | मध्यमा | तर्जनी | अंगठा |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | | | |

अर्जदाराचा संपूर्ण पत्ता ..................................................................

..................................................................

साक्षीदार –

(१)

अर्जदाराची स्वाक्षरी किंवा
डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा

## कार्यालयाने भरावयाचे

(१) महानगरपालिका कर्मचाऱ्याचे नाव ......................................

(२) पित्याचे नाव (किंवा, महानगरपालिका विवाहित महिला कर्मचाऱ्याच्या बाबतीत पतीचे नाव.) ......................................

(३) पदनाम ......................................

